शनिवार । ८ जुलै १९७८
७५ पैसे

# माणूस

जगजीवनबाबूंची वाट
रोखण्याच्या नादात
ते स्वतःचीच वाट हरवून बसले !
राजकारणी व्यक्तीला महत्त्वाकांक्षा असावी
धोके पत्करण्याची हिंमतही असावी.
पण हे सारे करताना
ज्या पक्षाच्या आधारावर
आपण उभे आहोत
त्याच्यावर घाव घालण्याचा कृतघ्नपणा
आपण करीत नाही ना
याचे भानही असावे

## मोइतचा जहागिरदार आपले हे भान विसरला

( दिल्ली वार्ता : मुखपृष्ठ : २ )



**साप्ताहिक माणूस**

वर्ष अठरावे–अंक सहावा

८ जुलै १९७८

मूल्य ७५ पैसे

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

◘

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

◘

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

◘

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

◘

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

◘

दूरध्वनी : ४४३४५९

◘

राजधानी दिल्ली । प्रतिनिधी

# चरणसिंगांनी स्वतःच ओढवून घेतलेली आपत्ती

**चौ**धरी चरणसिग यांना केंद्रीय मंत्रिमंडळातून बाहेर पडावे लागले ही जनता पक्षाच्या दृष्टीने खरोखरच खेदजनक घटना आहे. २४ मार्च १९७७ या दिवशी राजघाटावरील गांधींच्या समाधीसमोर घेतलेली प्रतिज्ञा या पक्षाला पंधरा महिनेही पाळता आलेली नाही, हेच यामुळे दिसून आलेले आहे.

तो दिवस असा होता की, काँग्रेसची केंद्रीय सत्तेवरील तीस वर्षांची मक्तेदारी संपुष्टात आलेली होती आणि दोन महिन्यांपूर्वीच अवतीर्ण झालेला पक्ष ती धुरा सांभाळायला पुढे आलेला होता. केवळ पक्ष-बदलापुरताच हा फरक मर्यादित नव्हता. आणीबाणीत या देशामधील लोकशाही विलयाला जाऊन इंदिरा गांधींची आणि त्यांच्या बदमाष चौकडीची राक्षसी हुकूमशाही थैमान घालत होती. कोणाचेच जीवित-वित्त सुरक्षित नसावे, एवढी भयानक दडपशाही इंदिरा गांधींनी चालविली होती आणि गांधी–नेहरूंचा वारसा सांगणाऱ्या काँग्रेसने इंदिरा गांधींच्या या कार्यात निर्लज्ज भागीदारी पत्करली होती. ‘ तुम्ही हे काय चालविले आहे ? ’ असे विचारण्याची हिंमत एकाही काँग्रेसवाल्याला उरलेली नव्हती. सगळे जण आणीबाणीचे आणि इंदिरा गांधींचे गुणगान गाण्यात मश्गुल झालेले होते. या सगळ्या पार्श्वभूमीवर मार्चमध्ये निवडणूक होऊन इंदिरा गांधींना आणि त्यांची गुलामगिरी पत्करलेल्या पक्षाला सत्तेवरून दूर व्हावे लागले.

लोकांनी मतपेट्यांच्या द्वारा घडवून आणलेल्या सत्तान्तराचा लाभ झाला तो जनता पक्षाला. कारण, आम्ही जर सत्तेवर आलो तर आम्ही तुम्हाला तुमचे लोकशाही अधिकार प्रदान करू, असे या पक्षाने आश्वासन दिले होते म्हणूनच सत्ताग्रहण करताना, जनता पक्षाने जी शपथ घेतली तिला केवळ त्या पक्षाच्या दृष्टीने नव्हे तर लोकांच्या दृष्टीनेही विशेष महत्त्व आलेले होते. नवा सत्ताधारी पक्ष राजकीय जीवनात निश्चित बदल घडवून आणील, असा विश्वास त्या शपथेने निर्माण केला.

पण झाले काय ?

राजघाटावरील प्रतिज्ञा राजघाटावरच राहिली आणि पंतप्रधान कोण होणार हा वाद प्रतिज्ञा–वाचनानंतर तासाभरातच रंगला. मोरारजी देसाई की जगजीवनराम, असा प्रश्न निर्माण झाला. या वेळी चरणसिंग रुग्णालयात होते. त्यांनी तेथून जयप्रकाश नारायण यांना चिठ्ठी धाडली की जगजीवनराम पंतप्रधान होणार असतील तर मी त्यांच्या मंत्रिमंडळात येणार नाही. या धमकीने मोरारजी-भाईंचा मार्ग मोकळा केला. पंतप्रधान म्हणून त्यांचा शपथविधी

होताच जगजीवनराम एवढे चिडले की, त्यांनी मंत्रिमंडळात यायचेच नाकारले. तीन दिवस हा घोळ चालू होता. शेवटी ते मंत्रिमंडळात दाखल झाले; पण मनात चरणसिंग यांच्याबद्दल अढी ठेवून.

–आणि त्यामुळे सुरुवातीपासून हे मंत्रिमंडळ एकात्मच झाले नाही.

पंतप्रधानपद हुकल्यामुळे जगजीवनराम नाराज; तर स्वतःला दुसरे सरदार पटेल समजणारे चरणसिंग, मोरारजींनी उपपंतप्रधानपद न दिल्यामुळे आतून धुमसत असलेले.

या दोघांपैकी जगजीवनराम यांचे भांडवल एकच – ते हरिजन आहेत. त्यांना पंतप्रधानपदावर बसवावे, असे म्हणणाऱ्या लोकांनी देखील केवळ या एकाच गोष्टीचा विचार केलेला होता. जनता पक्ष हा केवळ नागरी, सुशिक्षित आणि उच्च वर्णीय यांचाच आहे असे दिसू नये म्हणून जगजीवनरामसारख्या हरिजनाला पंतप्रधान करावे असे त्यांना वाटत होते. एरवी, जगजीवनरामांचे आणीबाणीतील वर्तन यशवंतराव चव्हाण किंवा ब्रह्मानंद रेड्डी यांच्यापेक्षा मुळीच वेगळे नव्हते. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर ते काँग्रेसमधून बाहेर पडले. त्यांच्या या बंडखोरीचा जनता पक्षाला लाभ झाला नाही असे नव्हे. त्याचे पारितोषिक म्हणून त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये स्थान देण्यातही वावगे नव्हते; परंतु पंतप्रधानपदाची अभिलाषा बाळगण्याचा जगजीवनरामांना कोणताही नैतिक अधिकार नव्हता. त्या पदावर मोरारजीभाईंचा रास्त हक्क होता. तरीही जगजीवनबाबूंना आपली महत्त्वाकांक्षा सिद्धीला नेता आली असती – जर जनता पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले नसते तर; परंतु लोकसभेच्या निम्म्या जागा जनता पक्षाला मिळाल्यामुळे जगजीवनबाबूंना सौदा करायला वावच राहिला नाही. जगजीवनबाबूंच्या पाठीशी कार्यकर्त्यांची मोठी फौज नसल्यामुळे योग्य वेळेची वाट पहात ते स्वस्थ बसले.

त्यांच्या तुलनेने कारवाया करायला चरणसिंगांना केवढा तरी वाव होता. उत्तरप्रदेश आणि हरयाना येथला जाट समाज त्यांच्या पाठीशी उभा होता. शिवाय त्यांच्या भारतीय लोकदलाला बिहारमध्येही स्थान होते. उत्तर भारतातील या तीन राज्यांमधून लाभलेला पाठिंबा चरणसिंगांसारख्या महत्त्वाकांक्षी व्यक्तीला स्वस्थ बसू देत नव्हता. लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी सगळ्या हिंदी भाषिक राज्यांमधील उमेदवार त्यांनी निवडले होते. लोकसभेच्या पाठोपाठ नऊ राज्यांतील विधानसभांच्या निवडणुकी झाल्या. या वेळीही हिंदी भाषिक राज्यामधील उमेदवार निवडण्याचा अधिकार आपल्याला मिळाला पाहिजे असा चरणसिंगांनी हट्ट धरला; परंतु त्या वेळी त्यांचा अधिकार फक्त उत्तर प्रदेशापुरता मर्यादित करण्यात आला.

या वेळीच चरणसिंगांनी जनता पक्षातून बाहेर पडण्याची पहिली धमकी दिली.

पक्षाची औपचारिक स्थापना झाल्याला एक आठवडाही झालेला नसताना, आपण आणि आपले भारतीय लोकदल जनता पक्षातून फुटून निघेल असे सांगणाऱ्या चरणसिंगांना स्वतःच्या महत्त्वाशिवाय काहीच सुचत नाही हेच दिसून आले. शेवटी उत्तरप्रदेशाबरोबर हरयानाही त्यांच्याकडे सोपविण्यात आला. भारतीय लोकदलाच्या उमेदवारांना जास्तीत जास्त तिकिटे मिळावीत आणि त्यायोगे ही दोन राज्ये संपूर्णपणे आपल्या एकट्याच्या नियंत्रणाखाली रहावीत, हाच या मागणीमागचा चरणसिंगांचा हेतू होता.

चरणसिंग केवळ राजिनाम्याची धमकी देऊनच थांबले नाहीत. पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर यांना पेचात पकडण्याकरिता त्यांनी निवडणूक–आयोगाच्या कचेरीतील आपले एक पत्रच पाठविले. जनता पक्षाने लोकसभेची निवडणूक भारतीय लोकदलाच्या नांगरधारी शेतकरी या चिन्हाखाली लढविली होती. भारतीय लोकदलाचे जनता पक्षात रीतसर विसर्जन करण्यात आल्यानंतर, आगामी विधानसभेच्या निवडणुकीतही जनता पक्षाला हे चिन्ह वापरू द्यायला आपली हरकत नाही, अशा आशयाचे पत्र चरणसिंग यांनी लोकदलाचे अध्यक्ष या नात्याने निवडणूक आयोगाला धाडले होते. सर्व हिंदी भाषिक राज्यातील उमेदवार निवडण्याचा आपला हट्ट मान्य करणे जनता पक्षाच्या संसदीय मंडळाला भाग पडावे यासाठी चरणसिंगांनी, आपले ते पत्र निवडणूक–आयोगाच्या फायलीतून काढून घेतले. गृहमंत्र्याचा अधिकार वापरून त्यांनी ही दडपेगिरी केली.

भारतीय लोकदलाने आपले निवडणूक-चिन्ह अशा रीतीने परत घेतल्यानंतर निवडणूक आयोगाकडून पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांच्याकडे जनता पक्षाच्या निवडणूकचिन्हाबाबत विचारणा झाली. नवे निवडणूकचिन्ह स्वीकारण्याइतका अवधी राहिलेला नव्हता. त्यामुळे चंद्रशेखर आपल्याकडे येतील आणि ते पत्र आयोगाल परत करण्यासंबंधी आपली विनवणी करतील अशी चरणसिंगांची अपेक्षा होती; परंतु तसे घडले नाही. चंद्रशेखर यांनी निवडणूक चिन्हाचा विचार करण्याकरिता कार्यकर्त्यांची तातडीची बैठक बोलविण्याचे ठरविले. आपला डाव आपल्यावरच उलटत आहे हे पाहिल्यानंतर चरणसिंगांनी ते पत्र गुपचूप निवडणूक आयोगाला परत केले.

परवा राजीनामा द्यावा लागल्यानंतर जनता पक्षातील काही वरिष्ठ नेत्यांनी आपल्याविरुद्ध कट केला आहे, असे चरणसिंग म्हणाले; परंतु जनता पक्षाविरुद्धचा पहिला कट चरणसिंगांनीच केला होता.

विधानसभांच्या निवडणुका झाल्या आणि उत्तरप्रदेश, हरियाना आणि बिहार या तीन राज्यांत भारतीय लोकदलाच्या कार्यकर्त्यांना मुख्य मंत्रिपदे मिळाली. उत्तर भारतात भारतीय लोकदल आणि जनसंघ हेच दोन पक्ष प्रभावी होते. त्यामुळे जास्तीत जास्त तिकिटे या दोन पक्षांच्या कार्यकर्त्यांना मिळाली. त्या आधारावर त्यांनी राज्ये वाटून घेतली. मध्यप्रदेश, हिमाचलप्रदेश आणि राजस्थान या तीन राज्यांत मुख्यतः जनसंघीयांच्या हातात सत्ता आली. बंडखोर काँग्रेसजन, संघटना काँग्रेस आणि समाजवादी या उर्वरित तीन घटक पक्षांना केंद्र सरकारमध्ये आणि कार्यकारिणी नि संसदीय मंडळ या पक्षाच्या सर्वोच्च यंत्रणांमध्ये स्थान मिळालेले असले तरी ज्या राज्यात जनता पक्षाची सरकारे अधिकारावर आली तेथे त्यांचे काहीच महत्त्व उरले नाही. म्हणून त्यांनी त्या त्या राज्यांतील बंडखोरांना हाताशी धरले. यात मुख्यतः बंडखोर काँग्रेसजन आणि समाजवादी यांचा पुढाकार होता. म्हणून या कारवायांना तोंड देण्यासाठी भारतीय लोकदल आणि जनसंघ यांच्यात राज्यपातळीवर अलिखित करार झाला. सहा राज्यांतील मंत्रिमंडळे पदच्युत करण्यासाठी केंद्रीय नेत्यांच्या चिथवणीने प्रयत्न सुरू झाले. तर आपण

दोघांनी एक होऊन त्यांचा बीमोड करायचा असे लोकदल आणि जनसंघ यांनी ठरविले. समाजवाद्यांना लोकदलासंबंधी फारसे प्रतिकूल बोलणे जमण्यासारखे नव्हते. कारण ग्रामीण भागातील मागास समाजघटकांचा पक्ष अशी त्याची प्रतिमा उभी राहिली होती. जनसंघाचे नाव निघाले की मात्र त्यांना अवघडल्यासारखे होई. हरिजन आणि मुसलमान यांच्यासमोर जाताना जनसंघ जनता पक्षात आहे ही जाणीव त्यांना अस्वस्थ करी. लोकसभेच्या आणि विधानसभांच्या निवडणुका जिंकण्यासाठी जनसंघाचे सहकार्य घेताना समाजवाद्यांना संकोच वाटला नाही. सत्ता मिळाल्यानंतर मात्र, जनता पक्षात जनसंघ फारसा कोठे दिसणार नाही या दृष्टीने समाजवाद्यांचे खटाटोप सुरू झाले. वर्षभरानंतरही हा पक्ष एकसंध झालेला नाही याला मुख्यतः हे खटाटोपच कारणीभूत ठरले. उत्तरप्रदेश, बिहार; हरियाना, हिमाचलप्रदेश आणि मध्यप्रदेश या राज्यांमध्ये मधूनमधून जे जनता विधिमंडळ पक्षात उद्रेक होत होते त्यामागे चंद्रशेखर, रामधन कृष्णकांत या बंडखोर कॉंग्रेस जनांचाच हात होता. या तिघांनी त्या त्या राज्यातील फुटीरांना प्रोत्साहन दिले. मध्यप्रदेशापुरती ही जबाबदारी समाजवाद्यांनी स्वीकारली होती. आपल्या राज्यांना मुख्यमंत्री आणि राज्यशाखेचा अध्यक्ष हे दोघेही पूर्वाश्रमीचे जनसंघीय आहेत, याचा ठसका तेथल्या रघु ठाकूर या समाजवाद्याला एवढा लागला की त्याने प्रत्येक जिल्ह्यात समांतर समित्या स्थापन केल्या. रघु ठाकुरांचा गुन्हा राजनारायण यांच्या अलीकडच्या कृत्यांइतकाच गंभीर होता; परंतु पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांनी तिकडे दुर्लक्ष केले. मधु लिमये यांनी तर हे प्रकरण तसेच दडपून टाकले.

या अशा अंतर्गत कुरबुरी आणि वादंग यांची धमाल चालू असतानाच ३० एप्रिल ही तारीख जवळ येऊ लागली. गेल्या वर्षी याच दिवशी चार घटकपक्षांनी आत्मविसर्जन करून घेतले होते आणि दुसऱ्या दिवशी जनता पक्षाची रीतसर स्थापना करण्यात आली. तोपर्यंत अस्तित्व राहिलेली जगजीवनरामांची लोकशाहीवादी कॉंग्रेसही 'जनता'मध्ये दाखल झाली. २४ मार्चप्रमाणे १ मे हाही तितकाच आनंदाचा दिवस ठरला. चंद्रशेखर यांची मोरारजीभाईंनी अध्यक्षपदी नियुक्ती केली. चरणसिंगांनीही त्या वेळी अनुमोदन दिले होते. जगजीवनराम जनता पक्षाचे घटक म्हणून व्यासपीठावर उपस्थित राहिले.

नंतरच्या वर्षभरात पक्षसंघटनेकड कोणाचेच लक्ष गेले नाही. चंद्रशेखर यांची आणि त्यांच्याबरोबरच निवडलेल्या कार्यकारिणीची मुदत १ मे रोजी संपत होती. पक्षसदस्यत्वाची मोहीम अजून सुरू झालेली नव्हती; मग पक्षसंघटनेची निवडणूक तर दूरच राहिली. राज्याराज्यांतील प्रारंभीच्या अस्थायी समित्या अस्थायीच राहिल्या. एका दृष्टीने असे घडणे अपरिहार्य होते. आधी सत्तास्वीकार आणि नंतर पक्षनिर्मिती अशा उलटा क्रम जनता पक्षाच्या कुंडलीत लिहिलेला होता. लोकसभेत भरपूर बहुमत होते, राज्यसभेतील परिस्थितीही पहिल्यापेक्षा बरीच सुधारली होती. २३ पैकी ११ राज्ये हातात आली होती. अशा समाधानकारक परिस्थितीमध्ये पक्षसंघटनेकडे लक्ष द्यायला कोणालाच सवड नव्हती.

आणखीही एक कारण होते.

शिस्त आणि कार्यकर्ते याबाबतीत जनसघाचीच अवस्था काय ती धड होती. इतर पक्षांत नेते बरेच होते; पण कार्यकर्त्यांचा खडखडाट होता. खासदार आणि आमदार हेच काय ते कार्यकर्ते मानले जात होते. परंतु त्यांना पक्षकार्यात मुळीच रस नव्हता. विधानसभेत किंवा लोकसभेत प्रवेश करण्याचे साधन एवढाच त्यांच्या लेखी पक्षाचा उपयोग राहिला होता. अशा परिस्थितीत सदस्यनोंदणीची मोहीम सुरू केली तर जनसंघाचा प्रभाव वाढण्याचाच संभव होता. तसे घडणे इतर कोणत्याच घटक-पक्षाला समजण्यासारखे नव्हते. म्हणून २२ एप्रिलला कार्यकारिणीने बैठक घेऊन, अध्यक्षांसह सर्व पदाधिकाऱ्यांची आणि समित्यांची मुदत सहा महिन्यांनी वाढवून घेतली.

दोन दिवसांनी चरणसिंग हृदयविकारामुळे आयुर्विज्ञानसंस्थेत दाखल झाले. लगलीच चंद्रशेखर, कृष्णकांत आणि रामधन यांच्या समर्थकांनी हरयानाचे मुख्यमंत्री देवीलाल आणि उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री रामनरेश यादव यांच्याविरुद्ध बंड पुकारले. संसदीय मंडळाने दोघांनाही विश्वासाचा ठराव मंजूर करून घेण्याचा आदेश दिला. आपल्या माणसांबाबत अशा तऱ्हेचा निर्णय करताना आपल्याला विचारले नाही यामुळे संतापलेल्या चरणसिंगांनी कार्यकारिणी आणि संसदीय मंडळ यांचा राजीनामा धाडून दिला.

येथपासून चरणसिंगांच्या हातातील सूत्रे सैल होऊ लागली.

आपल्या राजीनाम्याचे पत्र मिळताच चंद्रशेखर आणि मोरारजी देसाई धावत आपल्याकडे येतील अशी त्यांची कल्पना होती; परंतु संसदीय मंडळाने चरणसिंगांचा राजीनामा कार्यकारिणीकडे विचारार्थ पाठविण्याचे ठरविले आणि देवीलाल नि यादव यांच्याबाबतीतील आपला निर्णय कायम असल्याचे जाहीर केले. त्याप्रमाणे त्या दोघांनी विधिमंडळ पक्षाची बैठक घेऊन आपल्या नेतृत्वावर विश्वासनिदर्शक प्रस्ताव बहुमताने मंजूर करून घेतला. या दोन्ही ठिकाणी जनसंघाचा पाठिंबा लाभला म्हणूनच भालोदचे मुख्यमंत्री वाचू शकले.

चरणसिंगांना हा एवढा विजय पुरेसा वाटला नाही. देवीलाल आणि यादव यांना विश्वासनिदर्शक ठराव मंजूर करून घ्यायला सांगणाऱ्या चंद्रशेखरांविरुद्ध उठाव करण्याचा मनसुबा त्यांनी रचला. त्यासाठी त्यांनी हाताशी धरले ते राजनारायण यांना. हा तद्दन मूर्ख माणूस मंत्रिमंडळातच काय पण संसदेत येण्याच्याही पात्रतेचा नाही. जिल्हा परिषदेचे आखाडाबाज राजकारण हीच काय ती त्याच्या बुद्धीची मर्यादा; परंतु इंदिरा गांधींचा पराभव करण्याचा पराक्रम केल्यामुळे राजनारायण यांना एकदम महत्त्व आले. केंद्रीय मंत्रिपद मिळाल्यावरही त्यांच्या मर्कटलीला थांबल्या नाहीत. शपथविधीच्या वेळी प्रत्येकाच्या तोंडात पेढा कोंबण्याचा त्यांचा प्रकार बालिश होता. आरोग्य आणि कुटुंबकल्याणखाते सोपविण्यात आल्यानंतर हा गृहस्थ रामायण-महाभारत यांतील उदाहरणे देऊ लागला. लोकसंख्यावाढीसारख्या अत्यंत गंभीर समस्येचा विचार करताना जे शहाणपण असावे लागते त्याच्याशी राजनारायण परिचित नव्हते. त्यामुळे आरोग्य आणि कुटुंबकल्याणखात्याचे कामकाज थंडावले. संतति-प्रतिबंधक शस्त्रक्रियांबाबत इंदिरा-पुत्र संजयचे एक टोक तर चरणसिंग-शिष्य राजनारायण यांचे दुसरे. आचरट विधाने आणि हास्यास्पद हालचाली करण्यात जन्म गेलेला हा माणूस चरणसिंगांनी

चंद्रशेखर यांच्याविरुद्धची लढाई खेळण्यासाठी हाताशी धरावा यातच त्यांचा पहिला पराभव झाला. चंद्रशेखर यांची मुदत संपलेली असल्यामुळे अध्यक्षपदाचा राजीनामा दिला पाहिजे, असा राजनारायण यांनी धोशा लावला.-पंतप्रधान मोरारजी देसाई अमेरिकेच्या दौऱ्यावर गेलेले असताना तर राजनारायण यांनी तालच सोडला होता. मोरारजीभाईंच्या स्वागतासाठी पालम विमानतळावर हजर राहिलेले राजनारायण अत्तराची कुपी घेऊनच इकडे तिकडे हिंडत होते. शपथविधीच्या वेळी पेढे, या वेळी अत्तर! तेथे जमलेल्या प्रत्येकाला ते सुगंधी करून सोडीत होते. मोरारजीभाई विमानातून उतरताच राजनारायण यांनी त्यांनाही अत्तर लावले. त्या वेळीच मोरारजीभाईंनी त्यांना खडसावले. 'आता मारे सुगंध पसरवीत आहात! पण मी इथे नसताना तुम्ही दुर्गंधीच निर्माण केली!' तरीही राजनारायण यांना काही बोध झाला नाही. 'चंद्रशेखर हटाओ' ही मोहीम त्यांनी चालूच ठेवली.

चरणसिगांना वाटत होते की, या विदुषकामार्फत आपला उद्देश सफल होईल; परंतु आपण एक विशिष्ट मर्यादा ओलांडली की आपले मित्रही आपल्यापासून दुरावतात, हे या 'किंचित' सरदार पटेलांना कळून आले नाही. केंद्रीय मंत्रिमंडळ आणि केंद्रीय कार्यकारिणी यांना धक्का देण्याच्या चरणसिगांच्या मनसुब्यात जनसंघ सामील होणे शक्यच नव्हते. चरणसिग यांचे राजनारायण यांच्यामार्फत सुरू झालेले खटाटोप भारतीय लोकदलातील अनेक मंडळींनाही नामंजूर होते. संसदीय मंडळाने राजनारायण यांच्याकडून, पक्षाध्यक्षांवरील टीकेबाबत खुलासा मागितल्यानंतर चरणसिग यांचा मावार घेण्याचा मार्गही बंद झाला.

आता त्यांना राजनारायण यांच्याबरोबर फरफटत जाण्याशिवाय पर्यायच उरला नाही. तरीही त्यांनी आव असा आणला की, राजनारायण यांच्यावरील कारवाई मागे घेण्यात आली नाही तर आपण राजीनामा देऊ! या धमकीमुळे वातावरण बदलले जाईल ही त्यांची अपेक्षाही चुकीची ठरली. त्यामुळे ही धमकी ते कृतीत आणू शकले नाहीत. ही नामुष्की टाळण्यासाठी त्यांनी साऱ्या मंत्रिमंडळालाच बदनाम करण्याचा पवित्रा घेतला. 'इंदिरा गांधींवर खटला भरण्याबाबत केंद्र सरकार विलंब लावीत असल्यामुळे हे सगळे लोक नपुंसक आहेत असे लोक म्हणू लागले आहेत', असे त्यांनी जाहीर पत्रक काढून केंद्रीय मंत्री म्हणून पाळावयाच्या निर्बंधाचे उल्लंघन केले; शिवाय एकट्या मोरारजीभाईंनाच नव्हे तर साऱ्या मंत्रिमंडळालाच दुखविले.

वस्तुतः इंदिरा गांधींच्या अटक-प्रकरणामध्ये सर्वांत हास्यास्पद ठरले होते ते स्वतः चरणसिगच. शिवाय पुन्हा इंदिरा गांधींना अटक करायचे ठरविले तर त्याबाबतची सारी तरतूद गृहमंत्री या नात्याने चरणसिग यांनीच करावयाची होती. त्यापैकी त्यांनी काहीच केले नाही. त्यांनी ज्या दिवशी आपले खळबळजनक पत्रक प्रसिद्ध केले त्या दिवशीच गृहखात्याच्या संसदीय सल्लागार समितीची बैठक भरली होती. त्या वेळी इंदिरा गांधींवरील खटल्याचा प्रश्न विचारार्थ आलेला असताना गृहखात्याचे राज्यमंत्री धनिकलाल मंडल यांनी असे सांगितले की, शाह आयोगाच्या शिफारशी विचारात घेऊन लवकरच गृहखाते कारवाई सुरू करील. गृहखात्याचा राज्यमंत्री असे आश्वासन देत असताना गृहमंत्र्याने सबंध मंत्रिमंडळावरच दोषारोप करावा यावरून चरणसिग संतापाच्या भरात कोणताच विवेक दाखवीत नाहीत, हेच दिसून आले.

एखादा मंत्री जेव्हा सामुदायिक जबाबदारीच्या संकेताचा भंग करतो तेव्हा त्याला राजीनामा द्यायला सांगण्याचा पंतप्रधानांना अधिकार असतो; परंतु चरणसिगांचे मंत्रिमंडळातील आणि जनता पक्षातील स्थान लक्षात घेऊन मोरारजीभाईंनी मंत्रिमंडळाची तातडीची बैठक बोलावून आपली भूमिका समजावून सांगितली. तिला सर्व मंत्र्यांनी पाठिंबा दिल्यानंतर मोरारजीभाईंनी चरणसिगांकडे राजीनामा मागितला; त्यांच्याबरोबर राजनारायण यांचाही राजीनामा मागण्यात आला. राजनारायण यांचा राजीनामा मागण्यात कोणताच धोका नव्हता; परंतु चरणसिगांची गोष्ट वेगळी होती. त्यांच्या राजीनाम्याचे केवळ केंद्रीय मंत्रिमंडळावरच नव्हे तर संपूर्ण जनता पक्षावरच परिणाम होण्याचा संभव दिसत असतानाही मोरारजीभाईंनी हे कठोर आणि कणखर पाऊल उचलले, यावरून या वेळी जर आपण नमते घेतले तर पक्षशिस्त धुडकावून द्यायचे सत्रच सुरू होईल आणि म्हणून ही प्रवृत्ती वेळीच रोखली पाहिजे, या निर्णयाप्रत ते आले हेच स्पष्ट होते.

आपण पक्ष सोडणार नाही, असे राजीनामा दिल्यानंतर चरणसिगांनी म्हटले आहे; परंतु त्याचबरोबर पक्षात राहून आपण स्वस्थ बसणार नाही, सध्याच्या पक्षनेत्यांविरुद्ध झुंज देऊ, असेही त्यांनी जाहीर केले आहे. चरणसिगांनी वीरश्रीचा आणि हौतात्म्याचा कितीही आविर्भाव आणला तरी बळ त्यांच्या विरोधातच आहे; प्रकृतीही अशीतशीच आहे! आणि मुख्य म्हणजे त्यांनी आपल्यावर राजीनामा देण्याची पाळी स्वतःच्या कारवायांनीच ओढवून घेतली ही वस्तुस्थिती त्यांना पुरेसे बळ देऊ शकणार नाही. आपल्याविरुद्ध कट करण्यात आल्याची त्यांनी तक्रार केली आहे; परंतु त्यांनी स्वतःच राजनारायण यांना हाताशी धरून जो कट आखला होता त्याचा त्यांना सगळ्यांचे समाधान होऊ शकेल असा खुलासा करता येणार नाही.

चरणसिगांसारख्या जनता पक्षातील एका प्रमुख नेत्याला अशा रीतीने जावे लागावे हे त्या पक्षाला मुळीच शोभादायक ठरणारे नाही. विशेषतः इंदिरा गांधींच्या पुनरागमनाची शक्यता जाणवत असताना जनता पक्षातील नेतृत्वाने वैयक्तिक आणि वैचारिक मतभेदांचे कुंपण ओलांडून, २४ मार्च १९७७ या दिवशी केलेल्या प्रतिज्ञेचे स्मरण व्हायला हवे होते; परंतु उपपंतप्रधानपदावरचा आपला अधिकार शाबित करण्यासाठी, ढासळत्या प्रकृतीमुळे चरणसिंग उतावीळ झाले आणि त्यांनी कोणताच संयम पाळायचा नाही असे ठरविले. चरणसिगांनी स्वतःची आणि जनता पक्षाची आज जी अवस्था करून घेतली आहे तिच्याबद्दल ते स्वतःच जबाबदार आहेत. जगजीवनरामांची वाट रोखण्याच्या नादात ते स्वतःचीच वाट हरवून बसले. राजकारणात वावरणाऱ्या व्यक्तीला महत्त्वाकांक्षा जरूर असावी; धोके पत्करण्याची हिंमतही तिने अवश्य दाखवावी; परंतु हे सारे करताना ज्या पक्षाच्या आधारावर आपण उभे आहोत त्याच्यावर घाव घालण्याचा कृतघ्नपणा आपल्या हातून घडणार नाही, याचे भान बाळगायलाच हवे असते. चरणसिगांनी गेल्या चौदा महिन्यांत या जाणिवेची कधीच पर्वा केली नाही. त्यामुळे त्यांना मोरारजीभाईंइतकी उंची प्राप्त होऊ शकली नाही. उलट ते राजनारायण यांच्याइतकेच खुजे आणि क्षुद्र ठरले. मोइतचा हा जहागिरदार आपल्या मूळच्या पातळीवर इतक्या लवकर उतरेल, असे कोणालाच वाटले नव्हते. □

# जनता पक्ष
## पेचप्रसंगानंतरची वाट

वा. दा. रानडे

चरणसिंग आणि राजनारायण या दोन केंद्रीय मंत्र्यांचे राजिनामे पंतप्रधान मोरारजी देसाईंनी मागितले व त्यांनी ते दिले; पण हे दोन्ही नेते आणि त्यांचा भारतीय लोकदल हा गट पक्षाबाहेर पडलेला नाही. पक्षात प्रत्यक्ष फूट पडली नसली तरी त्यांच्या ऐक्याला मोठा तडा गेला आहे हे नाकारण्यात अर्थ नाही. भालोदगट आणि पक्षातील इतर घटक यांच्यात कटुता निर्माण झाली आहे. त्यांचे संबंध सहकार्याचे राहणार नाहीत. त्यातून पक्षांतर्गत संघर्ष कमी होण्याऐवजी अधिक तीव्र होण्याचाच संभव दिसत आहे.

या साऱ्या प्रकरणात काही तात्त्विक, धोरणात्मक आणि कार्यपद्धतीचे प्रश्न उपस्थित झाले आहेत काय? त्याबाबत योग्य भूमिका कोणती, याचा विचार आता करावयाचा. पहिला प्रश्न शिस्तीचा. पक्षात शिस्त असली पाहिजे हे सर्वांनाच मान्य आहे; पण तोंडदेखली मान्यता नको, तशी वागणूक दिसली पाहिजे. पंतप्रधान आणि पक्षाध्यक्ष यांच्याविरुद्ध प्रचारमोहीम केंद्रातल्याच एका मंत्र्याने करणे हे शिस्तीत कसे बसते? पण आपण वैयक्तिक टीका केलेली नाही. एक वर्षानंतर अध्यक्ष आणि कार्यकारिणी नवी निवडावी असे ठरले असता त्याप्रमाणे घडलेले नाही. शिस्तभंगाबाबत कारवाई शिस्तपालन समितीने करावयाची असते. पक्षाच्या घटनेप्रमाणे अशी समिती नेमली नसता केंद्रीय संसदीय मंडळ हा अधिकार स्वतःकडे कसा घेऊ शकते, असे घटनात्मक प्रश्न आपण उपस्थित केले आहेत, असे राजनारायण यांचे म्हणणे. शिस्तभंगाची कारवाई २२ एप्रिलनंतरच्याच वर्तनाबद्दल का, आधीच्या का नाही, हा चरणसिंग यांनी उपस्थित केलेला मुद्दाही महत्त्वाचा आहे.

नवा अध्यक्ष व कार्यकारिणी यांच्या निवडीसाठी एक वर्षाची मुदत ठरविताना तोपर्यंत पक्षाची रीतसर सभासदनोंदणी व प्रातिनिधिक समित्यांच्या निवडणुका होतील अशी अपेक्षा होती. निश्चित वेळापत्रक आखून हे काम मुदतीत पुरे केले नाही याबद्दलची जबाबदारी कार्यकारिणी टाळू शकत नाही. तसेच शिस्तपालनसमिती का नेमली नाही आणि प्रथमपासूनच शिस्तभंगाबाबत कारवाई का केली नाही, याबाबतीत कार्यकारिणीकडून कुचराई झाली हेही मान्य करायला हवे. ज्या राज्यात भालोदगटाचे मुख्यमंत्री आहेत तेथे त्यांना खाली ओढण्यासाठी पक्षातील इतर घटक कारवाया करीत असता त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई का केली गेली नाही? अशी भालोद कार्यकर्त्यांची तक्रार असून त्यात तथ्यांश आहे हे मान्य करायला हवे. बेशिस्तीविरुद्ध खंबीर कारवाई जरूर हवी; पण त्याचबरोबर भालोदगटाची काही रास्त गाऱ्हाणी असतील तर तीही दूर व्हावयास हवीत. जनता सरकारचे एक वर्षातील काम आणि जनता पक्षाचे एक वर्षातील काम यांचा आढावा घेण्यासाठी दोन समित्या नेमण्यात आल्या आहेत. या अहवालाच्या निमित्ताने आपल्या चुकांची, उणीवांची प्रामाणिक कबुली पक्षनेतृत्वाने द्यायला हवी. त्यातूनच कटुता कमी होऊन पक्षघटकांमध्ये सामंजस्य वाढेल.

भालोदगटाची यापुढची भूमिका काय राहील? आपली भूमिका समजून सांगण्यासाठी चरणसिंग देशभर दौरा काढणार आहेत, पण ते केवळ एका गटाचे नेते म्हणून काम करणार की जनता पक्षाचे नेते म्हणून काम करणार? पक्षातले इतर घटक त्यांच्याकडे केवळ भालोदचे नेते म्हणून पाहणार काय? तसेच भालोदबाबत इतर घटकांची कार करणार काय? तसे झाल्यास भालोद गट फार काळ पक्षात राहू शकणार नाही.

भालोदगट पक्षातून बाहेर पडला तरी लोकसभेतील जनता पक्षाच्या बहुमताला त्यामुळे धोका पोचणार नाही व सरकार स्थिर राहील, हा हिशेब करूनच पंतप्रधान मोरारजी देसाईंनी चरणसिंग व राजनारायण यांच्या विरुद्ध कारवाई केली असली पाहिजे. याउलट असेही म्हणता येईल की, मंत्रिमंडळाला धोक्यात आणण्याइतके आपले बळ आहे असा आत्मविश्वास वाटल्यानेच पक्षनेतृत्वास आव्हान देण्यास हे दोन नेते धजावले. यातले कोणाचे गणित बरोबर हे काही महिन्यांत स्पष्ट होईलच, पण वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे याबाबत काही निष्कर्ष काढता येतील.

लोकसभेच्या ५४२ सभासदांत सध्या जनता पक्षाचे ३०४ सभासद आहेत. त्यांची घटकवार विभागणी पुढीलप्रमाणे जनसंघ ८७, भालोद ८१, संघटना काँग्रेस ५२, समाजवादी ३८, लोकशाहीवादी काँग्रेस २७, चंद्रशेखरगट ९, इतर १०, भालोदगटाचे ८१ सभासद बाहेर पडले तर जनता पक्षाचे बळ २२३ पर्यंत खाली येते. लोकसभेत निर्णायक बहुमतासाठी किमान २७२ सभासदांचा पाठिंबा सरकारमागे हवा. म्हणजे जनता सरकारला आणखी ४९ सभासदांचा पाठिंबा मिळवावा लागेल. जनता पक्षाच्या मित्रपक्षांपैकी मार्क्सवादी २२ व अकाली दल ९ अशा ३१ सभासदाचा पाठिंबा मिळाला तरी आणखी १८ सभासद शोधायला हवेत. अण्णा द्र. मु. कचे १९ सभासद आहेत, पण त्यांचा पाठिंबा मिळेलच अशी खात्री नाही. अशा परिस्थितीत मोरारजी मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव पास होण्याची शक्यता आहे. चरणसिंगगटाने एवढा जोर केला तो या गणिताच्या आधारावर!

पण या गणितात सर्व ८१ सभासदांचा भालोदगट अभंग राहील, त्यातून कोणी फुटणार नाही हे गृहीत धरले आहे; पण प्रत्यक्षात पक्षातून फुटण्याचा प्रसंग आला तर तीस-चाळीसपेक्षा अधिक सभासद चरणसिंगांबरोबर जाणार नाहीत, असे या संबंधात केलेल्या चाचणीत मोरारजीभाईंच्या निकटवर्ती यांना आढळून आले. भालोद हा गट अनेक छोटचा पक्षांचा मिळून बनलेला आहे. त्यांची घटकवार विभागणी अशी— भारतीय क्रांतिदल ४५, राजनारायणगटाचे समाजवादी १९, बिजू पटनाईक यांची उत्कल काँग्रेस ९, स्वतंत्र पक्ष ६, बंगला काँग्रेस २. यापैकी भालोद हाच चरणसिंगांचा मूळचा गट. त्यातलेही सर्वच सभासद त्यांच्याबरोबर राहतील असे नाही. बिजू पटनाईक, एच्.एम्. पटेल यांनी मंत्रिपदाचे राजिनामे दिलेले नाहीत त्या अर्थी त्यांचे गट चरणसिंगांबरोबर नाहीत. राजनारायणगटाचेही सर्व सभासद त्यांच्याबरोबर जातील असे नाही. हे सारे लक्षात घेता चरणसिंगाबरोबर जाणारांची संख्या चाळीस पेक्षा जास्त असणार नाही असा माहितगारांचा अंदाज आहे आणि हा अंदाज पूर्णपणे खरा ठरला नाही तरी तशीच वेळ आल्यास काँग्रेसमधील चव्हाण गटाचा पाठिंबा मिळवून सरकार टिकविता येईल असा विश्वास काही जनतानेत्यांना वाटतो. त्यादृष्टीने चाचपणी झाल्याच्याही बातम्या आहेत.

घटनांना कोणते वळण मिळेल हे काही महिन्यांत स्पष्ट होईलच, पण अंतर्गत संघर्षात न गुरफटता आर्थिक कार्यक्रम, दलितांसंबंधीचा कार्यक्रम निर्धाराने हाती घेऊन त्यांच्या अंमलबजावणीस गती दिली पाहिजे आणि आपली परिस्थिती सुधारल्याचे जनतेच्या अनुभवास आले पाहिजे; तरच जनता पक्षाला आणि सरकारला जनतेत स्थिर आधार निर्माण होईल. □

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ नाही तर लोक पुन्हा इंदिराजींना बोलावतील ! !

विधानसभा निवडणुकांच्या वेळी जोरदार लढत देऊन इंदिराजींनी दक्षिण सर केली. आझमगढची महत्त्वपूर्ण पोटनिवडणूक जिंकून आणखी एक दणका दिला. जनतापक्षांतर्गत यादवीला त्या महत्त्व देत नसल्या – निदान आपण महत्त्व देत नाही असे भासवीत असल्या-तरी या यादवीचाही काही फायदा झालाच तर तो त्यांनाच होणार आहे. अनेक मंडळी नाकारीते असली तरी इंदिराजींचा प्रभाव दिसामासी वाढतोच आहे. त्यातच त्यांच्याविरुद्धच्या कारवाईला दिरंगाई होत असल्याने या वाढत्या प्रभावाला हातभार लागत आहे आणि हे कारवाईचे प्रकरण असेच रेंगाळले आणि चुकीच्या वेळी कारवाई करण्यात आली तर त्या कारवाईचाही लाभ त्यांनाच मिळेल. वास्तविक ज्यांनी ही कारवाई करायची त्या चौधरी चरणसिंग यांनीच आता बाईंच्या विरुद्ध कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे. असा सगळा गोंधळ चालू असतानाच इंदिराजींच्या पुनरागमनाच्या संदर्भात लोकमताची जी चाचपणी घेण्यात आली त्यातून बाहेर पडलेले निष्कर्ष धक्कादायक स्वरूपाचे आहेत. आतापर्यन्त अशी एक समजूत होती की, इंदिराजींना जो काही पाठिंबा आहे तो प्रामुख्याने मागासवर्गीयांचा आणि अशिक्षितांचा आहे; पण इंदिराजींच्या संदर्भात जनमताची जी चाचपणी घेण्यात आली ती मुंबई–मद्रास–कलकत्ता-दिल्ली यांसारख्या शहरांमधून आणि या पाहणीचे जे निष्कर्ष हाती आले आहेत ते पाहिले तर हे निष्कर्ष जनता पक्षाला सूचक स्वरूपात ताकीद देणारे आहेत. या पाहणीतून समोर आलेली आकडेवारी असे सांगणारी आहे की, बाबांनो, वेळीच सावध व्हा; नाही तर लोक पुन्हा इंदिराजींना बोलावतील !

गेल्या लोकसभा निवडणुकांच्या वेळी विरोधी पक्षांची सगळ्यात मोठी घोषणा होती, 'हुकूमशाही हाणून पाडा आणि लोकशाही वाचवा ! ' या घोषणेचा पुरेसा प्रभावही पडला आणि लोकांनी हुकुमशाहीच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर मतदान केले. लोकशाही सुस्थापित केल्याचे रास्त श्रेय घेत जनता पक्ष सत्तेवर आला; पण प्रभावी सत्ताधारी पक्ष म्हणून काही या पक्षाची प्रतिमा निर्माण होऊ शकली नाही. वर्षभरापूर्वी सुब्रह्मण्यम स्वामी, मृणाल गोरे ही सामर्थ्यशाली वाटणारी नावे आस्ते आस्ते निस्तेज होऊ लागली. अनेक महत्त्वाच्या गोष्टी बाजूला पडल्या. पक्षांतर्गत तणाव वाढू लागले. जनता पक्षाबद्दलची सलग बातमी शोधून काढावी असे दिवस आले. कारण जनता पक्षासंबंधीच्या बातमीतही 'जनसंघ, समाजवादी, भालांद' या घटकपक्षांचे आणि प्रत्येक घटकपक्ष आपले सामर्थ्य कसे वाढवीत आहे, याचेच वृत्त जास्त येऊ लागले. सर्वसाधारण माणूस गांगरून गेला. त्याच्या या गांगरलेल्या अवस्थेचे चित्रणही इंदिराजींच्या संदर्भात जी पाहणी करण्यात आली त्यात पहावयास मिळते. विचारलेल्या प्रश्नांमध्ये एक प्रश्न असाही होता की, आणीबाणी दूर झाल्यावर जे अनुभव आले ते लक्षात घेता स्थैर्य आणि कायद्याचे राज्य यासाठी तुम्ही तुमचे नागरी अधिकार सोडण्यास तयार व्हाल काय ? आणि धक्कादायक गोष्ट म्हणजे ३९ टक्के लोकांनी नागरी हक्कांच्या मोबदल्यात स्थैर्य आणि दंडुक्याच्या ताकदीवर चालणारे कायद्याचे राज्य स्वीकारण्याची तयारी दर्शविली. विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे हे मत मुंबई–कलकत्ता-सारख्या शहरांत राहणाऱ्या नागरिकांनी नोंदविले आहे. या चाचपणीत ५१ टक्के लोकांनी आपले नागरी हक्क गमावण्यास सुस्पष्ट नकार दिला असला तरी ३९ टक्के लोक असा अधिकार राजीखुशीने सोडून देण्यास तयार आहेत, ही गोष्ट खरोखरच गांगरवून टाकणारी आहे. ज्या स्वातंत्र्याचा पुकारा करून जनता पक्षाने निवडणुका लढविल्या आणि नागरिकांना, विशेषतः शहरवासीयांना आपल्याबरोबर खेचून नेले, त्याच नागरिकांनी केवळ वर्षभरानंतर एवढ्या मोठ्या प्रमाणात सुरक्षिततेच्या मोबदल्यात नागरीहक्कांवर पाणी सोडण्यास तयार व्हावे, ही गोष्ट विचित्र नाही काय ? इंदिराजींच्या संदर्भात जे प्रश्न विचारण्यात आले तेही सुस्पष्ट असून त्यांना मिळालेली उत्तरेही धक्कादायक आहेत.

प्रश्न : इंदिराजी पंतप्रधान म्हणून पुन्हा परत याव्यात असे तुम्हाला वाटते का ?

या सरळसोट प्रश्नाला ५६ टक्के लोकांनी होकारार्थी उत्तर दिले. ३७ टक्के लोकांनी नकारात्मक उत्तर दिले तर ७ टक्के लोकांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही.

प्रश्न : इंदिराजी पंतप्रधान झाल्यास संजय गांधी पुन्हा प्रभावी होतील, असे तुम्हाला वाटते का ?

या प्रश्नाला ४२ टक्के लोकांनी होकारार्थी उत्तर दिले, तर ४७ टक्के लोकांना असे वाटते की, संजय पुन्हा पहिल्याइतका प्रभावी होऊ शकणार नाही. उरलेल्या लोकांनी या प्रश्नावर मत नोंदविले नाही.

याच प्रश्नमालिकेमधील पुढला प्रश्न असा होता की,

इंदिराजी पुन्हा पंतप्रधान झाल्या तर त्या तितक्याच हुकूमशाही प्रवृत्तीने राज्य करतील की त्यांची ही प्रवृत्ती कमी झालेली अथवा जास्त झालेली आढळेल ?

हा प्रश्न तसा अनेक अर्थांनी महत्त्वाचा आहे. आज दोन्ही कांग्रेस एक व्हाव्यात म्हणून जी मंडळी खटपट करीत आहेत ती अशी सुस्पष्ट ग्वाही देतात की, इंदिराजी बदलल्या आहेत. जाहीररित्या त्या आणीबाणीचे कितीही समर्थन करीत असल्या आणि संजयला

संभाळून घेत असल्या तरी त्यांच्या चुका त्यांना उमजल्या आहेत. त्यांनी निर्णय घ्यायची आपली पद्धत बदलली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीही अशी ग्वाही देतात की, इंदिराजी बदलल्या आहेत. इतरांच्या विचारांना त्या आता योग्य ते स्थान देतात. लोकांना याबद्दल काय वाटते ?

२८ टक्के लोकांना ही गोष्ट अजिबात मान्य नाही. ही बाई बदलणे शक्य नाही, असाच त्यांचा ग्रह असल्याने इंदिराजी जर पुन्हा सत्तेवर आल्या तर अतिकठोर हुकूमशाहीचे जू आपल्या माथी बसेल असेच त्यांना वाटते, तर १४ टक्के मंडळी असे मानतात की, बाई पुन्हा सत्तेवर आली तर थेट पहिल्यासारखीच वागेल; तथापी ४९ टक्के लोकांची मात्र अशी भावना आहे की, बाईंना पुरेसा धडा मिळाला असल्याने यदाकदाचित त्या सत्तेवर आल्याच तर त्या पहिल्याइतक्या हुकूमशाही पद्धतीने वागणार नाहीत. उरलेल्या ९ टक्के लोकांनी या प्रश्नाबाबत कोणतेही मत व्यक्त केलेले नाही.

यापुढील प्रश्नाला जो प्रचंड होकार मिळालेला दिसतो त्याचे कारण म्हणून बांगलायुद्धामुळे बाईंची तेज झालेली प्रतिमा, अणुबाँबचा स्फोट करून त्यांनी दाखविलेले आक्रमक धोरण, स्वपक्षामधील त्यांचे असाधारण महत्त्वाचे स्थान या गोष्टींचा उल्लेख करता येईल. त्यांच्या तोडीस तोड नेता विरोधी पक्षाजवळ नाही ही गोष्टही मतदान करताना मतदारांनी लक्षात घेतलेली दिसते. विचारण्यात आलेला प्रश्न असा होता, इंदिराजी पुन्हा पंतप्रधानपदी विराजमान झाल्या तर भारताला त्याचा फायदा मिळेल असे तुम्हाला वाटते का ?

या प्रश्नाला ५९ टक्के लोकांनी होकार भरला. इंदिराजी पंतप्रधान व्हाव्यात या गोष्टीलाही ही मंडळी अनुकूल आहेत, असे गृहीत धरण्यास हरकत नाही. इंदिराजींच्या बाबतीत ३० टक्के लोकांचा मात्र पूर्णपणे भ्रमनिरास झालेला दिसतो. कारण त्यांनी असे स्वच्छ मत नोंदविले आहे की, या बाई पुन्हा सत्तेवर आल्याने देशाचे काहीही भले होणार नाही !

लोकमताची चाचपणी हा एक महत्त्वाचा भाग असतो. आपल्याकडे हा प्रकार फारसा रूढ नाही; परंतु या चाचपणीमधून बदलत्या लोकमताचे अचूक दर्शन घडते. इंदिराजींच्या संदर्भात लोकमताची ही जी चाचपणी घेण्यात आली ती अशा पद्धतीचे काम शास्त्रशुद्ध रीतीने करणाऱ्या इंडियन मार्केट रिसर्च ब्युरो या संस्थेमार्फत करण्यात आली. अत्यंत नि:पक्षपातीपणे करण्यात आलेल्या या पहाणीमध्ये चार मोठ्या शहरांमधील १,२१३ लोकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. शहरी भागात रहाणाऱ्या विविध स्तरांमधील मंडळींचा त्यात समावेश होता. ज्या चार शहरांमध्ये ही चाचपणी घेण्यात आली त्या शहरांमध्ये गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये त्या वेळच्या इंदिराजींच्या नेतृत्वाखालील एकत्र काँग्रेसची पूर्ण वाताहत झाली होती. मतमोजणीची आकडेवारी असे दर्शवते की, त्या वेळी काँग्रेसला पुढीलप्रमाणे मतदान झाले होते. मद्रास १७ टक्के, दिल्ली ३० टक्के, कलकत्ता २५ टक्के आणि मुंबई ३७ टक्के. या सर्व शहरांतून काँग्रेसची पूर्णपणे धूळधाण झाली. जागांच्या हिशेबात तर त्या पक्षाची अवस्था अक्षरशः केविलवाणी झाली. या गोष्टीला जेमतेम १५-१६ महिने होत आहेत. दरम्यान काँग्रेसमध्येच मोठी फूट पडली. निवडणुकांमधील निकालांनी इंदिरा काँग्रेस हीच खरी काँग्रेस असल्याचे निर्विवादपणे दाखवून दिले आणि इंदिराजींच्या नेतृत्वाला नवीन धार आली. इतकेच नव्हे तर आणीबाणीमधील साऱ्या पापांबद्दल जनता इंदिराजींना क्षमा करण्यास तयार आहे काय, असे वाटण्याइतपत परिस्थिती निवळली. मोठ्या शहरांमध्ये इंदिराजींना विरोध असल्याचे बोलले जात असले तरी या चाचपणीमधील वर नोंदलेली आकडेवारी वेगळेच काही सांगून जाते. विशेषत: दिल्लीत तर वातावरण इतके बदलल्याचे दिसते की, आज बाई स्वतः जरी दिल्लीतून उभ्या राहिल्या तरी हसत निवडून येतील. चाचपणीमधील आकडेवारी तरी हेच सांगते. कारण दिल्लीमध्ये जितक्या मंडळींना प्रश्न विचारले त्यांपैकी निम्म्याहून अधिक लोकांनी इंदिराजींचा पुरस्कार केला. या पहाणीचे आणखी एक वैशिष्टय असे की, ज्या मंडळींना याबाबत विचारण्यात आले त्यापैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक मंडळींनी इंदिराजींना कोणत्याही शहरात विरोध केला नाही. बदलत्या लोकमताची चुणूक या चाचपणीमध्ये जरूर पहावयास मिळते. जनता पक्षामधील ताणाताणीच्या ताज्या बातम्या असे सांगतात की, परिस्थिती मोठी गंभीर येऊ घातली आहे. चरणसिंग आणि राजनारायण हे जर मंत्रिमंडळातून बाहेर पडले अथवा त्यांना बाहेर घालविले तर परिस्थिती कोणते वळण घेईल, हे सांगणे कठीण आहे. जनता पक्षांतर्गत सत्तास्पर्धा, दारूबंदीसारख्या योजना खुळचटपणे राबविण्याचा अट्टाहास, कायदासुव्यवस्थापनातील शिथिलता आणि जनता पक्षाची रोज घटत जाणारी लोकप्रियता या साऱ्या जंजाळाचा अर्थ एकच की, इंदिरा नको म्हणून जनता पक्षाला सत्ताधिष्ठित करणारी जनताच अशा नकारात्मक भूमिकेतून इंदिरेला पुन्हा सत्तास्थानी आणवून बसवील !

जनता पक्षामधील ज्येष्ठ नेत्यांच्या लंब्याचौड्या गप्पांचा आणि शैलीदार भाषेमधील भाषणांचा लोकांना कंटाळा आला आहे. त्यांना आता आश्वासने नको आहेत, भाषणेही नको आहेत, त्यांना हवी आहे प्रत्यक्ष कृती ! आणि तीही जनतेला भेडसावणाऱ्या खऱ्याखुऱ्या प्रश्नांबाबत ! या कृतीच्या बाबतीत इंदिराबाई जास्त समर्थ आहेत, असाही लोकांचा ग्रह आहे. निरनिराळ्या चौकशीमंडळांचा लोकांना उबग तर आलाच आहे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे यातून नेमके काहीही निष्पन्न होत नाही, असाही एक समज तयार झाला आहे. अशा परिस्थितीमध्ये इंदिराजींचे पुनरागमन जास्त सुखावह होईल असे वाटणारा एक वर्गही तयार झाला असून या गटामधील मंडळींची संख्या वाढत आहे. इंदिराजी परत आल्या तर त्याचे काय परिणाम होतील, असा प्रश्न विचारला असता किमती उतरतील, सार्वजनिक जीवनामध्ये जास्त शिस्त येईल यांसारखी उत्तरे येतात. बाई आल्या तरच समाजामधील पददलितांना न्याय मिळू शकेल असेही अनेकांना वाटते. बाई आल्या तर तस्करी थांबण्यास मदत होईल, औद्योगिक उत्पादन वाढेल असे मानणारी भाबडी मंडळीही आहेत.

अर्थात परतीची ही वाट वाटते तितकी सोपी नाही. त्यातील

पृष्ठ २१ वर

## आदिवासी उपयोजना । एक पाहणी

रघुवीर मुळे

# नऊ एकर भातशेतीसाठी कर्ज रुपये पंचाहत्तर फक्त

२० जून !

शहरातही अंधारून आले होते. पेठ घाट लागला तेव्हा तर पावसाने चांगलीच धार धरली होती. बाजूच्या कच्च्या रस्त्यावरची माती निरुंद डांबरी रस्त्यावर साचून चिखल झाला होता. समोरून येणाऱ्या वाहनाला वाट करून द्यायला म्हणून गाडी थोडी जरी खाली घेतली की तिची नागमोडी चाल सुरू व्हायची. दिंडोरी तालुक्यातल्या चापडगावला पोचलो तेव्हा बारा वाजून गेले होते. आदिवासी उपयोजना नाशिक जिल्ह्यात ज्या तालुक्यांतून राबविली जाते त्यातला हाही एक महत्त्वाचा तालुका. चाचड 'गाव' म्हणायचे फक्त; वस्ती पाड्यासारखीच. आदिवासी उपयोजनांतर्गत सोसायटीचे कार्यालय शोधले. जवळ जवळ दोन वर्षांपासून ही योजना राबविली जात आहे; पण अजून स्वतंत्र कार्यालय नाही. ग्रामपंचायतीच्या कचेरीतच एक कपाट नि एक टेबल-खुर्ची मांडून कार्यालय थाटले होते.

आता भाताची लागण काही दूर नव्हती. सहज चौकशी केली. एकेक कथा ऐकायला येऊ लागली. भातासाठी एकरी २५० रुपये कर्ज पीककर्ज म्हणून द्यायचे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे धोरण आहे; पण ते फक्त कागदावरच. प्रत्यक्षात राबविणारे बँक इन्स्पेक्टरच धोरण ठरवितात. अगदी जुन्या कथेतल्या निवाड्यासारखे. लवादांच्या कागदांच्या दोन चळती करायच्या. उजव्या बाजूच्या चळतीचे निकाल वादींच्या बाजूचे, तर डाव्या बाजूंच्या चळतीचे निकाल प्रतिवादींच्या बाजूचे.

नाळेगाव गोळशीची एक आदिवासी महिला राधाबाई जिवला चौधरी ! हिची नऊ एकर भातशेती आहे. बँकेच्या नियमाप्रमाणे या महिलेला २२५० रुपये पीककर्ज मिळायला हवे. आदिवासी उपयोजना सोसायटीच्या व्यवस्थापकांनी बाईचे कर्जप्रकरण केले १६७५ रुपयांचे आणि प्रत्यक्षात बँकेने मात्र मंजुरी दिली १५० रुपयांना ! याच गावचे लहानु अर्जुन भोये हेही आदिवासी शेतकरी. यांची शेती चार एकरांची, त्यांचे कर्जप्रकरण होते ७५० रुपयांचे. त्यांनाही १५० रुपये कर्ज मंजूर झाले. नऊ एकराला १५०, चार एकरालाही १५०. दीडशे रुपयांत एक एकर का होईना, भातशेती करून दाखवायला कोणाला बोलवावे ?

कर्जधोरण ठरते तरी कसे ? एका एकरात जे पीक घ्यायचे त्याचा एकूण खर्च काढला जातो अन् त्याच्या एकतृतीयांश कर्ज दिले जाते. म्हणजे एक एकर भातशेतीला जर ७५० रुपये खर्च येत असेल तर एकरी २५० रुपये कर्ज बँक उदारहस्ते देते. ( म्हणजे प्रत्यक्षात तेवढेही देत नाही ! ! )

आता या नऊ एकरवाल्यांनी १५० रुपये घेऊन काय करायचे ? बरे, तीही रक्कम एकहाती मिळत नाही. ७५ टक्के मालरूपाने उचलावे लागते. याचा अर्थ बियाणे, खते या स्वरूपात. परंपरागत आदिवासी शेतकरी, जो भातशेतीत आयुष्य व्यतीत करतो त्याचेकडे बियाणे हमखास असतेच आणि डोंगरउतरणीच्या शेतीवर युरिया-सुफला उपयोगाचा नाही, हेही त्यांना माहीत असते. मग त्याच्या हातात फक्त चेक देणार ७०-७५ रुपयांचा. तेवढ्यात नऊ एकर भाताचे पीक घ्यायला सांगून आम्ही जपानची भातशेती पहायला जायला मोकळे.

एकीकडे आदिवासी विभागातली सावकारी नष्ट करण्याचा डांगोरा आपण पिटत आहोत, पण ७५० रुपये एकरी खर्च येणाऱ्या पिकासाठी ५० रुपये त्याच्या हातावर टिकवायाच्या उद्योगाने आपण सावकारी नष्ट करीत नसून ती अधिकच बळकट करीत आहोत. बँकेकडून कर्ज मिळणे एक तर अवघड, किचकट; तेही तुटपुंजे. मग सावकार पिकावर कर्ज मुबलक देतो. परिणामी त्याची वसुलीही १०० टक्के होतेच. पतसंस्थांची पत कमी करण्यास व सावकाराची वाढविण्यास तर जिल्हा बँक बांधलेली नाही ना, अशी शंका नव्हे तर खात्री वाटू लागली आहे.

जिल्हा बँकेच्या तालुक्यात किमान पाच-सात शाखा असतातच. इन्स्पेक्टर मात्र एकच. साहजिकच शाखावार वार ठरलेले. म्हणजे तातडीची प्रकरणे 'वारा' वर निकाली निघणार ! आदिवासी-परिसरात ही स्थिती असली तरी देशी भागात वेगळी आहे. जून आला रे आला की ऊसवाले, द्राक्षवाले आणि कॅशक्रॉपवाली मंडळी परस्पर नवे-जुने करून आणखी रकमा (जुन्या न फेडता) लाटतात. त्याही- हसत-खेळत. पंख्याखाली, डनलॉपपिलोच्या गाद्यांवर रेलून. वस्तुतः १० ते २५ हजार रुपयांच्या नव्या कर्जप्रकरणांना अगर नवे-जुने करायला (वस्तुतः हे प्रकरण सहकारात कसे बसते हीही शोधाचीच बाब) सहकारी सोसायट्यांच्या उपनिबंधकांची परवानगी लागते, हा नियम झाला. माझ्या माहितीप्रमाणे जिल्हा बँकेत एकाही प्रकरणाला त्यांची संमती मागितलेली नाही. राज्यभर अर्थात हेच धोरण (?) असणार !

रोजगार हमी योजना राबविली जाते. आदिवासी शेतकरी पाणकळा वगळता त्या कामावर असतात. जर अधिक पीककर्ज हवे असेल तर रोजगार हमी योजनेच्या अधिकाऱ्याने कर्जदाराच्या पगारातून कर्जाचा हप्ता कापून घेण्याची हमी घेतली तर अधिक कर्ज मिळू शकते; पण ही अट किती फसवी आहे! रोजगार हमी योजना राबविली जाते जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारीखालील विविध खात्यांकडून. ते ही जबाबदारी घेतील का? समजा घेतली हमी आणि कोणी कामावरच आले नाही तर? किंवा कामावर आलेल्या आदिवासी शेतकरी-शेतमजुराचा आठवड्याचा पगारच 'किमान' झाला तर? ही कल्पना प्रत्यक्षात येत नाही. येणार नाही. पुन्हा आम्ही जिव्हाळ्याने, कळवळ्याने बोलायला तयार. सवलतींचा फायदा आदिवासी घेत नाही त्याला आम्ही हो काय करणार? देशी भागातल्या शेतकऱ्यांनी मार्केट कमिट्यांच्या मार्फत होणाऱ्या हमखास वसुलीची जी वाट लावली त्यावर तोडगा काढायला हवा. आदिवासी विभागात मुळातच न द्यावयाच्या कर्जाच्या वसुलीची काळजी कशाला हवी? कर्जवाटपाच्या वेळी सोसायटीची एकूण वसुलीची टक्केवारी लक्षात घेतली जाते. त्यामुळे पूर्ण परतफेड करणाऱ्यावर अन्याय होतो. त्याने फेडलेल्या रकमेइतकेही कर्ज त्याला मिळत नाही. एकदा हा अनुभव आला की पुढच्या वेळेस तो कशाला थकबाकी भरतोय? बाकीच्यांना भरू द्या, मग आपण भरू. अशा पद्धतीने 'खुळभर दुधाची कहाणी' सुरू होते व डेरा दुधाऐवजी पाण्यानेच भरला जातो. परिणामी चार कोटी कर्जवाटपाच्या उद्दिष्टात प्रत्यक्षात वाटप होते दीड कोटीच्या आसपास, तर पन्नास लाखांच्या खावटी कर्जवाटपाच्या उद्दिष्टाची वासलात साडेचार-पावणेपाच लाखांतच लागते.

चाचडगावला आदिवासी सोसायटीने स्वस्त धान्य दुकानही चालविले आहे. दुकानात तांदूळ आहे. तांदळाच्या आगरात तांदूळ विक्रीला कसा? तीन वर्षांपूर्वी जिल्हा पुरवठाधिकाऱ्याकडे तांदूळ आला. अगदी काळपट तांबडा! नुसता नमुना पाहिला तरी भातावरची वासना उडून जाईल असा! तो तालुक्या-तालुक्यातून (विशेषतः आदिवासी) पाठविण्यात आला. साखर आणायला सोसायटीचे लोक गेले की सक्तीने त्यांच्या गळी हा मारला जातो. १४२ रुपये क्विंटल या भावाने. नाइलाजाने घ्यावा लागतो. कारण साखरवाटप झाले नाही की, गावपुढारी संस्थेच्या नावाने शंख करायला तयारच. अशा या घाणेरड्या तांदळातच आदिवासी उपयोजनेचे हजारोंनी रुपये गुंतून पडलेत.

◻

करंजाळीला आलो. पोटात कावळे कोकलायला लागले होते; पण बाहेर शिळंधार पाऊस काही उमगू देत नव्हता. इथली आदिवासी सोसायटी चांगले काम करतेय्. गेल्या हंगामातच इथली सावकारशाही या एकट्या सोसायटीने मोडून काढली. आदिवासींचा माल वाजवी दरात जवळ जवळ पाच लाखांची खरेदी करून पैशाचे वाटप केले. किराणा दुकानदारांनी तर केव्हाच गाव सोडून पलायन केलेय्. प्रत्येक वस्तू वाजवी दरात. रोजची विक्री चारशेच्या आसपास आणि बाजाराच्या दिवशी १७००-१८००! मी 'विल्स' सिगारेटपाकिट मागितले. सेल्समनला दोन रुपये दिले. त्याने मलाच उलटे १० पैसे दिले. मी म्हटले ही स्वस्ताई हिशेबी की बेहिशेबी? कारण नासिकला हेच पाकीट २ रुपये २० पैसे तर इथे १-९० ला कसे? कारण पाकिटावर Net price दोन रुपये छापलेले. त्याने खरेदी दाखविली १ ८५ ची. पाकिटामागे फक्त ५ पैसे नफा घेतोय्. प्रत्येक वस्तूत हीच पद्धत. आम्ही ५% किमान नफा आकारतो. फक्त तोट्यानेच केरोसीन विकतो. तरी दुकान फायद्यात आहे. एव्हढा व्यवहार होऊनही अधिकारी चिंतेतच. कारण विचारले तर म्हणतात, बँक जेव्हा शेतकऱ्यांना कर्ज मंजूर करते तेव्हा १० टक्के शेअर्स कापून घेते. पूर्वी ५ टक्के अट होती. आता वाढलीय. शेतकरी ५% देतात. बाकीचे ५% सोसायटीला भरावे लागतात. असे जर भरत गेलो तर खेळते भांडवल हातात उरणार नाही. किराणा दुकान, कापड दुकान चालणार कसे? बंद केले तर पुन्हा आदिवासी संस्था योजनेला चालविता आल्या नाहीत म्हणून ताळे लावून आमच्याच नावाने ओरड.

ज्या मोठ्या आदिवासी सोसायट्या आपल्या भांडवलातून बँकेच्या शेअर्सची पूर्तता करू शकल्या त्या निदान बैलकर्जाचे वाटप तरी करू शकल्या; पण इतर ठिकाणी कठीण परिस्थिती आहे. जून संपल्यावर बैलकर्ज? तेही शक्य नाही!

◻

केवळ जिल्हा बँकेचीच अडवणूक आहे असेही नाही. आदिवासी विकास महामंडळ आणि आदिवासी उपयोजना उद्दिष्टे तरी समान आहेत की नाहीत? पण यांच्याही एकमेकांच्या वागण्यात ताळमेळ नाही. उदाहरणार्थ महामंडळाने पेठ आदिवासी सोसायटीला एकाधिकार खरेदीसाठी १ लाख १६ हजार रुपये दिले. पेठ सोसायटीने १ लाख १८ हजारांची खरेदी केली. एकाधिकार (नागली-भात-वरई-वगैरे) खरेदीत या सोसायटीने स्वतःचे दोन हजार रु. गुंतविले. महामंडळाने कळविले की, तुमच्या खरेदीत तीन हजार रुपयांची तूट आहे, तेव्हा आमचे तीन हजार रुपये पाठवा. आता धान्यखरेदी-वाहतूक-पोत्यांची भराई यात सगळीकडे 'घट' धरतात की नाही? महामंडळाला 'घट' हा प्रकारच ठाऊक नाही. १% तरी घट धरणार की नाही? बरे ठीक आहे. कमिशनचा हिशेबही न करता ताबडतोब पैसे मागता? या सोसायटीने तीन हजार दिले की मग व्यवहार करायचे कशातून? उलट कमिशन, घट यांचा हिशेब करून आदिवासी विकास महामंडळाने सोसायट्यांना रकमा पुरवायला हव्यात.

◻

आदिवासी उपयोजना आणि आदिवासी सहकारी संस्था यांचा गाजावाजा विधानसभागृहापासून, मंत्र्यांच्या भाषणातून, वेगवेगळ्या वृत्तपत्रांतून एवढा झाला आहे की, १३३ कोटी रुपयांची योजना म्हणजे लूट आहे, असे खुद्द आदिवासी विभागातच वाटू लागले आहे. हा पैसा विभागाच्या विकासासाठी आहे, हे कोणी लक्षातच घेत नाही. बिचाऱ्या आदिवासीला मात्र त्याची काहीएक जाणीव नाही. उदाहरणच देतो. चाचडगाव काय, करंजाळी काय, अभोणे काय, या सोसायट्यांना कुणी कार्यालयाला जागाच देत नाही. भरमसाट भाडे मागतात. ही सोसायटी आली तर आपल्याच लोकांची सोय होणार आहे, ही जाणीव इथल्या आदिवासी पुढाऱ्यांत, आदिवासी धनिकांत नाही. तेच फक्त 'जागा' देऊ शकतात. म्हणून भाडेही तोंडाला येईल ते मागतात. अभोण्याचीच गोष्ट. एक जागा ऑफिसला पाहिली. मालकिणबाईंनी १०० रुपये भाडे ठरविले. दरम्यान नाशिकहून तिचा नोकरदार मुलगा आला. त्याने २५० च्या खाली द्यायची नाही असे बजाविले. सोसायटी एवढ्या भाड्याने जागा कशी घेणार? कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ! दुसरे काय? ◻

गणितशास्त्र, नाणेशास्त्र, पुरातनवास्तुशास्त्र, प्राचीन इतिहास, समाजशास्त्र या सर्व क्षेत्रांत प्रा. दामोदर धर्मानंद कोसंबी यांनी आपल्या मौलिक संशोधनांनी भर घातली. २९ जून हा त्यांचा पुण्यतिथीदिन.

# खंत एवढीच की त्यांचा 'विचार' आपण पुढे नेला नाही

**अविनाश सहस्रबुद्धे**

कोसंबींना जाऊन बारा वर्षे झाली. २९ जून हा त्यांच्या पुण्यतिथीचा दिवस. अनेक क्षेत्रांतील आपल्या संशोधनाने जगातील विद्वानांमध्ये प्रतिष्ठा पावलेले डी. डी. कोसंबी महाराष्ट्रातील सामान्य वाचकांना तसे फारसे परिचित नाहीत. आज आपापल्या क्षेत्रात थोडी-फार नजरेत भरण्याइतकी कामगिरी केलेले लेखक, संशोधक सतत प्रसिद्धीच्या झोतात राहिल्याची उदाहरणे आपण नेहमी पहातो. कोसंबी याला अपवाद होते. कोसंबींच्या प्रतिभेची झेप अनेकविध विषयांतील संशोधनात झेपावणारी होती. एका विषयातून दुसऱ्या विषयात ती अगदी सहजपणे संचार करीत असे. असे असूनही ते कधी प्रसिद्धीच्या झोतात आले नाहीत. कारण त्यासाठी कराव्या लागणाऱ्या व्यावहारिक तडजोडींकडे त्यांनी पूर्णपणे पाठ फिरविली होती. त्यांचे व्यक्तिगत जीवन ऋषित्वाच्या सुस्पष्ट ज्योतिरेखेने अंकित झाले होते असे म्हटले तर वावगे होणार नाही.

प्रख्यात बौद्ध पंडित, भाषातज्ज्ञ कै. धर्मानंद कोसंबी यांचे दामोदर उर्फ बाबा हे पुत्र. त्यांना तीन मोठ्या बहिणी होत्या. गोव्यातील कोसंबे या गावी ३१ जुलै १९०७ रोजी डी. डी. कोसंबी यांचा जन्म झाला. घरी धर्मानंद कोसंबींमुळे विद्वतेचे एक कठोर वातावरण सदासर्वदा असे. अशा वातावरणातच त्यांचे पालन-पोषण झाले. आपल्या पित्याकडून त्यांनी तीव्र बहुमुखी प्रतिभा, भटकंतीची अतोनात आवड व अतृप्त जिज्ञासावृत्तीचा वारसा उचलला होता. वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत त्यांचे शिक्षण पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले. १९१८ साली ते वडिलांबरोबर केंब्रिजला गेले व तिथेच पदवीपरीक्षेपर्यंतचे शिक्षण घेऊन ते भारतात परतले. धर्मानंद कोसंबी हार्वर्ड विद्यापीठात अध्यापक होते. डी. डी. कोसंबींची मुळातली कुशाग्र बुद्धिमत्ता इथेच पूर्णपणे विकसित झाली व संशोधकाला अत्यावश्यक असणारी चिकित्सक वृत्तीही त्यांच्या अंगी बाणली. १९२९ सालापर्यंत त्यांनी गणित, इतिहास व भाषा या तीन विषयांत बी. एस्सी. पदवी मिळविली व अमेरिकन पद्धतीनुसार त्या वेळची विशेष प्राविण्याची सुमा कम लॉडे आणि फी बीटा कॅपाचे सभासदत्वही मिळविले.

हार्वर्ड विद्यापीठात शिक्षण घेत असतानाच त्यांच्या बुद्धिमत्तेचे अनेक कंगोरे स्पष्ट होऊ लागले. इटालियन भाषेच्या परीक्षेत तर त्यांना ए-१ ग्रेड मिळाली, जी तोपर्यंत कुणालाच मिळाली नव्हती. कोसंबींना एकूण बारा भाषा उत्तम प्रकारे येत व इतर कित्येक भाषांचे सामान्य ज्ञान त्यांनी अवगत करून घेतले होते. लॅटिन, ग्रीक, पाली व अरबी या भाषा त्यांना अनुवाद करण्याइतपत येत असत. भारतातल्याही अनेक भाषांशी त्यांचा परिचय होता.

संख्याशास्त्र हे कोसंबींचे खास आवडीचे क्षेत्र होते. नामांकित गणिततज्ज्ञ म्हणूनच ते जगभर प्रसिद्ध पावले. अनुवंशशास्त्राचा अभ्यास करणारे 'कोसंबी थिओरेम'चा उपयोग करतात. याच विषयातील संशोधनाबद्दल त्यांना १९३४ साली रामानुजम स्मृति पारितोषिक व १९४९ साली भाषा पारितोषिक देण्यात आले.

संख्याशास्त्रातून ते नाणकशास्त्राकडे वळले. मोहोंजोदडो येथे सापडलेल्या नाण्यांची कालनिश्चिती त्यांनी केली व तेव्हापासून ते त्याही विषयातले तज्ज्ञ मानले जाऊ लागले. नाण्यांची होणारी झीज व त्याला लागणारा काल हे ठरविण्यासाठी त्यांनी ७००० नाण्यांचे वेगवेगळे वजन करून त्यावरून आपला सिद्धांत घडविला.

नाणकशास्त्राच्या अभ्यासातून ते भारताच्या पूर्वेतिहासाकडे आले व त्यातही त्यांनी प्रभुत्व मिळविले. एवढेच नव्हे तर त्यांनी इतिहासाच्या अभ्यासपद्धतीचे एक नवे दालनच उघडले. हार्वर्डहून परतल्यावर दोन वर्षे त्यांनी बनारस हिन्दुविद्यापीठात अध्यापनाचे काम केले. नंतर ते अलिगड मुस्लिम विद्यापीठामध्ये गेले. कोसंबी १९३३ साली पुण्यात स्थायिक झाले व फर्ग्युसन महाविद्यालयात अध्यापन करू लागले. पुण्यातील वास्तव्याच्या काळातच त्यांच्या संशोधनक्षेत्राच्या कक्षा रुंदावल्या. भारतीय इतिहासलेखनाच्या रूढ पद्धतीचा त्याग करून पुराणवस्तु, मानववंश या शास्त्रांतील अनेक जुन्या ग्रंथांचा तौलनिक अभ्यास करून भारत देशाचा समग्र इतिहास लिहिण्याची सिद्धता केली. आदिकाळापासून भारतीय समाजाने केलेल्या वाटचालीचा आलेखच त्यांनी 'भारतीय इतिहासाची प्रस्तावना' या आपल्या प्रमुख ग्रंथामध्ये काढला आहे. कोसंबी यांनी एकूण १४२ संशोधनात्मक लेख व प्रास्ताविक ग्रंथ लिहिले. त्यातले काही लेख एकत्र करून 'दि स्टडी ऑफ इंडियन हिस्टरी' (१९५६) व 'दि कल्चर अँड सिव्हिलायझेशन ऑफ एन्शंट इंडिया इन हिस्टॉरिकल आउटलाइन' (१९६५) असे दोन महत्त्वाचे ग्रंथ

लिहिले. त्यांच्या लेखांपैकी पाच लेख 'मिथ अँड रियालिटी' या पुस्तकात एकत्र केले आहेत व इतर काही लेख 'एक्झ्यास्परेटिंग एसेज' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाले आहेत. 'मिथ अँड रियालिटी'चा मराठी अनुवाद वसंत तुळपुळे यांनी 'पुराणकथा व वास्तवता' (१९७७) या नावाने केला आहे. मराठीतील कोसंबीचे हे एकमेव पुस्तक. यावरूनच या जागतिक ख्यातीच्या विद्वानांची खुद्द महाराष्ट्रात किती उपेक्षा झाली हे लक्षात येते.

## चतुरस्त्र व्यासंग

भारताच्या इतिहासाची कोसंबी यांनी नव्या पद्धतीने मांडणी केली व आपल्या इतिहासाला नवीन परिमाणे मिळवून दिली. इतिहासाचा विचार करताना त्यांनी व्यक्तींचा विचार विशेषत्वाने केला नाही. संस्था, पंथ, पुराणांतील व वेदांतील निरनिराळ्या कथा यांचा संदर्भ घेऊन त्यांनी त्या वेळची समाजस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला. विशिष्ट काळातील विशिष्ट जनसमुदायाच्या राजाच्या नावापेक्षा त्याच्याकडे त्या काळी नांगर होता की नाही, याचा शोध घेणे इतिहासकाराच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे, असे ते मानीत. मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार केलेल्या कोसंबींनी इतिहासाची व्याख्याच मुळी 'उत्पादनसाधने व उत्पादनसंबंध यातील बदलांचा कालक्रमाने झालेला विकास' अशी केली आहे. या व्याख्येमुळे इतिहासाला ऐतिहासिक घटनांच्या कालक्रमानुसार साखळीत फक्त न जखडता भारतीय समाजअवस्थांवर, जनसामुदायातील मुख्य जीवनपद्धतींवर त्यांनी प्रकाश टाकला. कोसंबींच्या इतिहासलेखनामागे मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाच्या सिद्धांताचा आधार होता आणि त्या अनुषंगानेच त्यांनी भारतीय इतिहासाची मांडणी केली. आपल्या इतिहाससंशोधनात त्यांनी अनेक नवे मुद्दे उपस्थित केले. कोसंबींनी लिहिलेल्या निरनिराळ्या निबंधांचे नुसते विषय जरी पाहिले तरी त्यांच्या विद्वत्तेचे चतुरस्र स्वरूप पाहून आपण थक्क होतो. कोसंबींच्या विविध क्षेत्रातील कामगिरीचा नुसता आढावा घेणेही एका लेखात शक्य नाही, तरीही त्यांच्या भारतीय इतिहासविषयक दृष्टिकोणाचा व त्यांनी अतिशय परखडपणे उपस्थित केलेल्या काही मुद्द्यांचा थोडक्यात परिचय करून घेणे सयुक्तिक ठरेल.

कोसंबींचे इतिहासविषयक असलेले बहुतेक सर्व लेखन एका समान सूत्रात गुंफलेले आहे. ते उत्खननातील पुरावे व वाङ्मयातील पुरावे यांची सांगड घालून त्यावर आधारलेले आहे. 'पुराणकथा व वास्तवता' या ग्रंथाच्या 'प्रस्तावना उपोद्घात' प्रकरणात त्यांनी इतिहासपद्धती व पुस्तकात समाविष्ट केलेल्या निबंधांच्या विषयवस्तूंविषयीचे मार्गदर्शन केले आहे. त्यात त्यांनी प्रारंभीच अतिशय स्पष्टपणे सांगितले आहे की, 'विकासाची प्रक्रिया केवळ प्राचीन भारतातील निरनिराळ्या तत्त्वप्रणालींचा अभ्यास करून समजून घेता येणार नाही. महान तत्त्ववेत्ते शंकराचार्य, त्यांच्या पूर्वीचे बुद्ध आणि नंतरचे वैष्णव या सर्वांनी श्रद्धेचे सामान्य आणि उच्च असे दोन एकमेकांपासून अलग स्तर निर्माण केले. उच्च स्तर केवळ वैचारिक आणि आध्यात्मिक होता. त्या प्रांतात मानवी मन काल्पनिक पूर्णत्वाच्या अत्युच्च शिखरावर विहार करीत राही. सर्वसामान्य मानव मात्र सामान्य स्तरावरील दैनंदिन जीवनाच्या कर्मकांडात खितपत पडलेला असे आणि जोपर्यंत या अध्यात्मिक तत्त्ववेत्त्यांच्या तात्विक विचारांना वास्तवतेच्या स्पर्शाचा विटाळ होत नसे, तोपर्यंत या सामान्य जनांच्या दैनंदिन कर्मकांडात सहभागी होण्यास त्यांना प्रत्यवाय नसे. कल्पना आणि आदर्श हे अनादि अनंत असतात आणि त्या उच्च स्तरावर (ज्याला खरोखरच महत्त्व असते) सर्वसामान्य मानवी जीवनाच्या कर्मकांडाला काही अस्तित्वच नसते. इथे कोसंबींनी लौकिक जीवनातील सर्वसामान्य प्रवाहाकडे भारतीय धर्मविचारांनी कसे दुर्लक्ष केले, याचा संकेत दिला आहे. अशा प्रवाहाचे अध्ययन कुठल्या सूत्रांतून होणे शक्य आहे, हेही त्यांनी सांगितले आहे. त्यासाठी आपल्या संस्कृतीच्या सुरुवातीला असणाऱ्या आणि आजमितीस टिकून राहिलेल्या काही भारतीय पुराणकथा आणि धार्मिक उपचार यांच्या प्राचीन मुळांचा शोध घेण्याचे उद्दिष्ट असले पाहिजे. कोसंबींच्या मते ब्राह्मणवादाच्या भूमिकेनुसार त्याने पुराणकथांना एकत्र करून त्यांना सुसंबद्ध कथा-चक्राच्या स्वरूपात उभे केले आहे व अधिक विकसित अशा सामाजिक चौकटीत बसविले. तरी आजही असे किती तरी अवशेष आहेत की जे विशिष्ट समूहांना संघटित अवस्थेत ठेवतात. यात जातीधर्मांहून वेगळे असलेले आदिम पूजाविधींसारखे अवशेषही येतात. भारतातील वेगवेगळ्या मानवी गटांच्या आणि विशेषतः सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक रचनेतील कनिष्ठ अशा गटांच्या धार्मिक उपचारांवरून हेच सिद्ध होते की, ते गट क्रमाक्रमाने उच्चतर उत्पादक समाजात सामावले गेले. आर्थिक दर्जात झालेला बदल हा तत्सम जातिबदलातून तसेच अनेकदा उपासनांच्या बदलातून व्यक्त होतो आणि व्यवहारातही आणला जातो, हे कोसंबींनी सप्रमाण दाखवून दिले. कधी संप्रदायही एकमेकांत मिसळले गेले, तर कधी ही घुसळणही शक्य होऊ शकली नाही. सिद्धांत व तत्त्वांचा प्रत्यक्ष आचरणाशी असलेला संबंध तुटला तर मात्र त्यातून सांप्रदायिक भावनेशिवाय दुसरे काही हाती लागत नाही, हेही कोसंबींनी धर्म व आचरणातील विसंगतींकडे बोट दाखवून सांगितले.

बौद्धधर्माच्या ऱ्हासाची कारणमीमांसा अतिशय तर्कशुद्ध आधारावर त्यांनी केली आहे. ते म्हणतात, 'पारंपारिक समजुतीनुसार, इ. स. ८०० चे सुमारास शंकराचार्य अशा कार्यात मग्न होते की, ज्यामुळे बौद्धधर्मीय मठांचा पाडाव झाला. या गोष्टी केवळ त्यांच्या मूलगामी तर्कबुद्धीने आणि वादविवादातील निखालस कौशल्याने घडून आल्या, असा हिंदूंचा सर्वसामान्य समज आहे. आज शंकराचार्यांचे म्हणून उपलब्ध असलेले लिखाण आणि त्यात बौद्धांचे म्हणून दिलेले आणि खोडून काढलेले तत्त्वज्ञान पाहिले तर त्यावरून एकच गोष्ट सिद्ध होते आणि ती म्हणजे, त्यांना गौतम बुद्धाच्या मूळ शिकवणीची गंधवार्ताही नव्हती. मठातून आचरणात येणारा त्या काळचा बौद्धधर्म लामाधर्माच्या हीन अवस्थेला पोचलेला होता आणि वैभवसंपन्न विहारांचा देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर मोठाच ताण पडत होता. त्यांच्या विनाशाला शंकराचार्यांच्या कार्याने चालना मिळाली.'

कोसंबींचा भारतीय पुराणकथांचा अभ्यास अतिशय सखोल तर होताच. त्याशिवाय पुराणकथांचा अर्थ लावण्याची त्यांची पद्धतही तर्कशुद्ध व मौलिक होती. त्यांच्या मते पुराणकथांचे तेच फक्त स्वरूप

नसते जे आदिम समाजातील धर्मांशी संबंधित पुराणकथांमधून रूढ अर्थाने दिसते. ऐतिहासिक विकासाशी समांतर जाति-समाज, गट, समुदायातील पुराणकथाही विकसित होत जातात. अशा प्रकारच्या द्वंद्वात्मक इतिहास-पद्धतीच्या द्वारे पुराणकथांमधील वास्तवाचा शोध घेणे शक्य होते.

अशा लोकांत समान असणाऱ्या धर्मश्रद्धांतून आदिम कल्पना मूळ धरीत असतात, या आपल्या सिद्धांताचे विवरण करताना कोसंबींनी फार चांगले उदाहरण दिले आहे. 'आमची रोजची भाकरी आम्हाला दे,' ही प्रार्थना जगातील बहुसंख्य जनतेला अर्थपूर्ण वाटणारी आहे; परंतु ती अश्मयुगाच्या उत्तरार्धाच्या पूर्वी उद्भवणे शक्य नव्हते. कारण त्यापूर्वी भाकरी ( पाव ) सारखी एखादी वस्तू अस्तित्वातच नव्हती. त्याचप्रमाणे सर्वांचा पिता असणाऱ्या देवाची प्रार्थना करण्याची कल्पना पशुपालन–युगापूर्वीच्या मातृदेवतांच्या उपासनेच्या कालखंडातही स्फुरणे शक्य कोटीतील नव्हती. दैनंदिन केल्या जाणाऱ्या या ख्रिस्ती प्रार्थनेचा उगम अश्मयुगाच्या उत्तरार्धात झाला आहे, या वस्तुस्थितीमुळे ख्रिश्चनांच्या मानबिंदूला धक्का पोचत नाही.' आपल्या भारतीय पुराणकथांचा, धार्मिक उपचारांचा अशा प्रकारे त्यांच्या मुळांपर्यंत जाऊन शोध घेणे सहज शक्य आहे. कारण 'समकालीन भारतीय समाजही पूर्वेतिहासाच्या बहुतेक अवस्थांची शाश्वत चिन्हे दाखविणाऱ्या घटकाचा मिळून झालेला आहे,' हे सूत्र समोर ठेवूनच कोसंबींनी भारतीय पुराणकथांमध्ये अंतर्भूत असलेल्या वास्तवाचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला. कोसंबींनी हेही जाता जाता स्पष्ट केले आहे की, भारतीय धार्मिक तत्त्वज्ञानाची मुळे आदिम समाजव्यवस्थेत आहेत, हे मान्य करण्यास व आदिम कालातून टिकून राहिलेल्या श्रद्धांच्या अस्तित्वास सामोरे जाण्यास जे भारतीय विचारवंत नाखूष असतात त्याचे कारण बहुधा साम्राज्यशाही कालात सहन कराव्या लागलेल्या आणि अद्यापही जिची स्मृती जिवंत आहे अशा दडपशाहीत असण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

भारतीय इतिहास इ. स. पूर्व जवळ जवळ ३४०० वर्षे जुना आहे. वेदांची रचना नक्कीच त्यानंतर बऱ्याच वर्षांनी झाली व आर्य-संस्कृतीही इथे फार नंतर विकसित झाली. या आदिम भारतीय समाजाची रूपरेषा, तिच्यातील अंतर्प्रवाह इत्यादि साहित्याचे विषय बहुतांशी झाले नाहीत. उपलब्ध वाङ्मयात पुराव्यात त्या युगातील पुराणकथांची सामुग्री भरपूर प्रमाणात मिळत असली तरी अशा सामुग्रीच्या आधारे पुराणकथांना इतिहासात परिवर्तित करणे अवघड आहे. भारत अनेक जातिसमुदायांचे राष्ट्र आहे. असे असूनही ब्राह्मण-युगातच फक्त नव्हे तर ब्राह्मणवादाच्या पुनर्जागरणाच्या काळातही आर्यांचे साहित्यच केवळ उपलब्ध होते. इतर गट, जमाती अंधारातच राहिले होते, या वस्तुस्थितीचा निर्देश कोसंबींनी केला आहे.

आजचा मनुष्य फक्त भाकरीवर जगू शकत नसला तरी आज-पर्यंत मनुष्याची अशी एकही जात निर्माण झालेली नाही, जी भाकरी-शिवाय किंवा इतर कुठल्याही आहाराशिवाय जिवंत राहू शकेल. कुठल्याही संस्कृतीचा आधार वास्तविक अन्न-उत्पादकाच्या स्वतःच्या आवश्यकतेपेक्षा अन्न व इतर उत्पादनाचा साठा किती जास्त प्रमाणात उपलब्ध होतो, या वस्तुस्थितीत असतो. इराकमधील भव्य शकुमंदिर, चीनची भिंत, इजिप्तमधील विशाल पिरॅमिड्स किंवा अगदी अलीकडच्या काळातील गगनचुंबी इमारतींच्या निर्मितीमागे त्या त्या युगातील अन्न व इतर उत्पादनाचा प्रचंड साठा काम करीत होता. अतिरिक्त किंवा जास्तीचे उत्पादन हे नेहमीच त्यासाठी उप-योगात येणाऱ्या अवजारांवर, पद्धतींवर, अगदी नेहमी वापरल्या जाणाऱ्या शब्दांत सांगायचे तर 'उत्पादनांच्या साधनां'वर अवलंबून असते. ज्या प्रक्रियेतून हा अतिरिक्त अंश–फक्त अन्नाचा नव्हे तर इतर सर्व उत्पादनांचा–उपयोग करणाऱ्या शेवटच्या घटकाच्या हातात जातो, ती समाजरचना 'उत्पादनसंबंधा' द्वारे निर्धारित होत असते व त्यांनाही निर्धारित करीत असते. कोसंबींनी 'उत्पादनसाधने व उत्पादनसंबंध यातील बदलांचा क्रमाक्रमाने झालेला विकास' हे सूत्र धरून आदिम समाजापासून ते भांडवल-शाही युगाच्या आरंभापर्यंतच्या भारतीय समाजअवस्थांवर प्रकाश टाकला आहे. कोसंबींचे हे कार्य फार मोलाचे आहे.

## गीतेच्या तत्त्वज्ञानाची मीमांसा

कोसंबींनी 'पुराणकथा व वास्तवता' या आपल्या पुस्तकात भगवद्गीतेतील सामाजिक आणि आर्थिक अंगांचा अतिशय परखड-पणे समाचार घेतला आहे व स्पष्टपणे सांगितले आहे की, 'गीतेतील तत्त्वज्ञानाच्या गाठोड्यातून कदाचित एखाद्या नवीन मार्गासाठी पळ-वाट सापडू शकेल; पण कुंठित सामाजिक जीवनातून मार्ग काढण्यास आवश्यक असलेले विश्लेषणाचे हत्यार त्यातून कधीच मिळू शकणार नाही, हे ज्ञानेश्वरांचे आयुष्य आणि त्यांचा दुःखपर्यवसायी अंत यावरून पूर्णतया दिसून येते.' कोसंबींची गीतेतील तत्त्वज्ञानाची मीमांसा अतिशय अर्थपूर्ण आहे. गीता ही अनेक विचारधारांचे स्रोत असली तरी कित्येक परस्परविरोधी विचारधाराही या स्रोतातून बाहेर पडताना दिसतात. 'पाप व भक्तीच्या कल्पना वैदिक नाहीत,' 'कृष्ण विरोधाचे प्रतीक आहे,' 'कृष्णाने मूळ मातृसत्ताक प्रथेचे अतिक्रमण केले होते' अशासारखी कोसंबींनी केलेली विधाने पचायला जड असली तरी विचारप्रवृत्त करणारी निश्चितच आहेत. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, तेराव्या शतकातील संत ज्ञानेश्वर, त्यापूर्वी वैष्णव आचार्य मुनी रामानुज आणि त्याही अगोदर शंकराचार्य या सर्वांवर गीतेचा फार मोठा प्रभाव पडला होता. या सर्व असामान्य विचारवंतांची अशा कोणती समान गरज होती की जी, सामान्य जनतेला, त्यांच्याच वर्गातील जनतेलासुद्धा भासली नव्हती, असा प्रश्न उपस्थित करून कोसंबींनीच त्याचे उत्तर दिले आहे. ते असे, 'हे सर्व, ज्यांना दुसरा समर्पक शब्द सापडत नाही म्हणून हिंदू म्हणता येईल अशा, सुखवस्तू वर्गातील होते. यामुळे त्यांच्यात जे पूर्वग्रह निर्माण झाले त्यांकडे दुर्लक्ष करणे बरोबर नाही, कारण त्यांच्याच तोडीच्या सामान्य जनांमधून आलेल्या कविश्रेष्ठांचे गीते-शिवाय अडले नाही.' कोसंबींनी आपल्या या निष्कर्षाला पुष्टि देण्यासाठी कबीर, तुकाराम, जयदेव, चैतन्य महाप्रभु, गुरु नानक इत्यादि संत कवींची उदाहरणे दिली आहेत. ते सामान्य जनांमधून आले, परंतु त्यांना गीतेचा आधार घेण्याची गरज भासली नाही. ज्ञानेश्वरांनाही त्या वेळच्या आळंदी येथील ब्राह्मणांच्या ज्या रूढ कल्पना होत्या त्यांचा उपद्रव होऊ लागल्याने इ. स. १२९० च्या सुमारास आपल्या प्राकृतातील प्रसिद्ध टीकेची रचना करण्यासाठी

गोदावरीनदीच्या तीरावर, रामचंद्रराव यादवांच्या राज्यात आश्रय घ्यावा लागला. शंकराचार्यांनीही उपनिषदातील ज्ञानकांडातून एक नीच आणि एक उच्च तत्त्व शोधून काढले व देहाचे महत्त्व नाकारले. रामनुजांनीही 'आयुष्याचा अंत म्हणजे अनंतात विलीन होणे नसते, तर ती चिर आनंदमयी मोक्षावस्था असते. परमेश्वरावर नितांत श्रद्धा व भक्ती करूनच ही अवस्था मिळवावी लागते,' सारखे तत्त्वज्ञान मांडले. याच कालात या दोहोंपैकी कोणत्याच पक्षाने, ब्राह्मणांची सहज हत्या करणाऱ्या आणि त्यासाठी प्रायश्चित्त न घेणाऱ्या किंवा दैवी कोपास बळी न पडता देवळे भ्रष्ट करणाऱ्या गोमांसभक्षक नेत्यांची एकनिष्ठपणे सेवा करण्यास मात्र विरोध केला नाही.यावरून मुख्य निष्कर्ष कोसंबींनी हाच काढला आहे की, ज्या शासकवर्गावर तत्कालीन ब्राह्मण अवलंबून होते त्या वर्गाच्या शाखेला काही कारणाने न रुचणाऱ्या सामाजिक कार्यासाठी स्फूर्ती देणारा आणि प्रस्थापित ब्राह्मणी पद्धती–मीमांसेला न दुखविता तिचे समर्थन करण्यासाठी सहाय्यभूत होणारा एकमेव ग्रंथ म्हणून गीतेचा उपयोग झाला.' पुढे ते म्हणतात– 'देवांनी सांगितलेली ही गीता ब्राह्मणांनी उच्च वर्गासाठी आणि त्यांच्या मार्फत इतरांसाठी सांगितली आहे, हे स्पष्ट आहे. प्रत्यक्ष कृष्णाच्या मुखातून आपणाला ऐकावयास मिळते की (गीता: अ. ९ श्लो. ३२). जे कोणी, मग ते स्त्री, वैश्य, शूद्र किंवा यासारख्या कोणत्याही योनीतील असोत–माझ्या आश्रयाला येतात...' याचा अर्थ, सर्व स्त्रिया व कष्ट करणाऱ्या आणि उत्पादकवर्गातील सर्व पुरुष जन्मापासूनच अपवित्र असून त्यांना इतक्या सहजपणे कमी लेखणाऱ्या देवावरील श्रद्धेनेच ते पुढच्या जन्मी मुक्त होऊ शकतात. एवढेच नव्हे तर त्या देवानेच हे फरक निर्माण केले आहेत. (गीता: अ. ४, श्लो. १३) 'चातुर्वर्ण्यही (वर्ग) मीच निर्माण केले' असे आपल्या महान कर्तृत्वाच्या यादीत कृष्णाने सांगितलेले आहे.

गीतेतील तत्त्वज्ञानाचा विचार करतानाच कोसंबींनी भक्तीच्या सामाजिक कार्याचाही विचार केला आहे व भक्ती ही जरी सरंजामशाहीच्या विचारप्रणालीची मूलभूत गरज असली तरी तिची फळे सर्वांना सारख्या प्रमाणात मिळत नसत, हे सांगितले आहे. महाराष्ट्रात याला विरोध दोन वेगवेगळ्या चळवळींनी केला. एका चळवळीचे प्रवर्तक चक्रधर होते. त्यांनी 'महानुभाव' किंवा 'मानभावी' पंथ स्थापन केला. काळी वस्त्रे, जातिसंस्थेचा संपूर्ण त्याग, गटासारख्या छोट्या समूहांची रचना, अनुयाऱ्यांमध्ये वस्तूंची समान वाटणी इत्यादि त्यांच्या पंथाची वैशिष्ट्ये होती. दुसरी चळवळ ज्ञानेश्वरांच्या रूपाने साकार झाली. त्यांनी गीतेतील ईश्वरी संदेशाचा शब्दश: अनुवाद न करता तिचा अर्थ व गाभा स्वत:च्या दृष्टीने पण कोणाही मराठी शेतकऱ्याला समजू शकेल अशा भाषेत दिला. त्यामुळेच त्यांच्या अनुयायी संतांत त्यांच्याप्रमाणेच प्राकृतात लिहिणाऱ्या, सामान्य जनतेच्या हाल-अपेष्टांचा अनुभव असणाऱ्या व सर्व जातींतील लोकांचा समावेश होऊ शकला. एकनाथ व तुकारामांनी ही परंपरा पुढे वाढविली.

इतिहास व समाजशास्त्रातील मूलगामी संशोधनाप्रमाणेच कोसंबींनी संस्कृत वाङ्मयाची समीक्षा करणारेही लेख लिहिले आहेत. 'भर्तृहरीच्या काव्यातील सर्वसंगपरित्यागाचा गुणविशेष', 'भर्तृहरीच्या शतकातील काही पाठभेद', 'उर्वशी आणि पुरुरवा' इत्यादि लेख त्यांच्या विचार–विश्लेषणात्मक समीक्षाकौशल्याची उत्तम साक्ष देतात.

कोसंबींनी आपले आयुष्य गणित, इतिहास, नाणेशास्त्र, समाजशास्त्र या विविध क्षेत्रांतील संशोधन, चिंतन व अध्ययन करण्यात घालविले. कोसंबींचे वैशिष्ट्य हे की, ते केवळ आपल्या संशोधनात दंग होऊन राहिलेले शास्त्रज्ञ नव्हते. जागतिक शांतता-परिषदेच्या कार्यात त्यांनी सक्रीय पुढाकार घेतला होता. भारतातील घडामोडींची बारीक माहिती त्यांना असे व जरूर लागेल तेव्हा आपल्या ज्ञानाचा ते उपयोगही करून देत. हिंदुस्थानात आल्यावर त्यांनी खादीविक्रीच्या कामातही भाग घेतला होता. पुढे स्वातंत्र्यानंतर कोसंबींनी धरणे कोठे व किती मोठी बांधावीत, याबद्दलची आकडेशास्त्राची पद्धत नियोजनमंडळाला सादर केली होती व तिचा स्वीकारही केला गेला होता. यात त्यांची क्रियाशील वृत्तीच दिसून येते.

कोसंबींनी आपल्या प्रज्ञाशाली प्रतिभेने व संशोधनकार्याने जागतिक मान्यता पावलेले गणिती व पुरोगामी दृष्टी लाभलेले भारतीय प्राचीन इतिहासाचे अभ्यासक, अशी दुहेरी कीर्ती मिळविली. दुर्दैवाने भारतातील व विशेषत: महाराष्ट्रातील विचारवंतांनी मात्र त्यांची योग्य ती दखल घेतली नाही. अर्थात कोसंबी यांना त्याची कधीच खंत वाटली नाही. खंत वाटली पाहिजे ती आपल्याला. कारण आपण त्यांचा 'विचार' पुढे नेला नाही. एवढेच नव्हे तर त्यांचे समग्र वाङ्मय मराठीत आणण्याचाही प्रयत्न केला नाही. कोसंबींना जाऊन एक तप उलटले. इतक्या उशीरा का होईना मुंबईत 'डी. डी. कोसंबी प्रतिष्ठान'ची स्थापना त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी होत आहे, ही फार चांगली घटना आहे. कोसंबींचे सर्व लिखाण पुस्तकरूपाने एकत्र प्रसिद्ध करण्याचे कार्य हे प्रतिष्ठान हाती घेईल, अशी आशा या निमित्ताने व्यक्त करतो. □


## तीन राजहंस प्रकाशने

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**फिडेल, चे आणि क्रांती**
अरुण साधू । सात रुपये

**आणि ड्रॅगन जागा झाला**
अरुण साधू । चवदा रुपये

**पूर्णिया**
अनिल अवचट । सहा रुपये

देशी संस्थानात घडलेली, 'न्यायदानाचे अधिकार व शासकीय जरबेचे अधिकार' याची अविवेकाने गल्लत केल्यामुळे प्रजेवर कसे अन्याय झालेले होते त्याची सत्यकथा कथेतल्या छोट्या वकिलाच्या अनुभवाच्या आधारावर लिहिली आहे.

# 'हम करेसो कायदा'

-पु. ल. इनामदार

राजाला सल्लागार शहाणे हवे असत. जनतायुगाच्या राज्यात राज्यकर्त्यांना सल्ला देणारे, सुचविणारेसुद्धा प्रामाणिक नि शहाणे असायला हवेत. राजाभोवती-शासनकर्त्यांभोवती लांगूलचालन करणाऱ्यांचा, खुषमस्कऱ्यांचा गराडा पडायला लागला किंवा आपमतलबी, लबाड लोकच शासनकर्त्यांचे मंत्री बनायला लागले की अर्थाचा अनर्थ कसा होतो, हे कुठवर सांगावे ? अशा अनर्थापायी प्रामाणिक जनतेचे किती हाल होतात, आपले दुःख बोलून दाखवू न शकणाऱ्या माणसांवर काय व कसे जुलूम होतात, याची कल्पनाही आपण करू शकत नाही आणि शासनकर्त्यांभोवतीच्या सल्लागारांत जर देशातले न्यायाधीशही खुषमस्कऱ्यासारखे वागायला लागले तर जुन्या म्हणीप्रमाणे पावसाने झोडले, राजाने मारले तर दाद कुणाजवळ मागायची – फिर्याद कुणाजवळ करायची ? असेच म्हणण्याची वेळ येते. असलेच प्रश्न उभे करणाऱ्या एका प्रकरणाची कहाणी सांगायची आहे. या कहाणी–वाणीतला सगळाच तपशील खरा नसला तरी या कहाणीला कारण झालेली माणसे नि त्यांच्यासंबंधाने घडलेल्या घटना बहुतांशी खऱ्या आहेत. कहाणीतल्या माणसांची व शहरांची नावे मुद्दामच लिहिली नाहीत.

भारताच्या ब्रिटीश राज्यकर्त्यांनी आपल्या साम्राज्यसत्तेला न्यायाचा मुखवटा देण्यासाठी कौटिल्य नीती अनुसरून भारतामध्ये जी अनेक खुळी राहू दिली होती – निर्माण करून ठेवली होती, त्यातलेच एक खूळ म्हणजे ब्रिटीश राज्यकर्त्यांनी कायम ठेवलेली भारतातली ५२६ देशी संस्थाने. या संस्थानांच्या राजेमहाराजे मंडळींना, त्यांचे मानमरातब कायम ठेवून, संस्थानातले त्यांचे अंतर्गत शासन कायम ठेवून, संस्थानातले त्यांचे कायदेकानून होते तसेच राहू देऊन, आपण जिंकले गेले आहोत, असे वाटू दिले नाही. त्यांची प्रजा ही परकीय सत्तेची गुलाम झाली आहे, असे दिसू दिले नाही. त्यामुळे या राजे-महाराजांच्या अनियंत्रित कारभारापायी कुणावर कसकसे जुलूम होत, याविषयीच्या कहाण्यांना अंत नाही.

मी सांगत आहे त्या संस्थानामधील पूर्वीच्या स्वर्गीय महाराजांनी दूरदृष्टी ठेवून आणि राजनीतीची चांगली समज घेऊन संस्थानामध्ये निरनिराळे कायदेकानू बनवून ठेवले होते. एवढेच नव्हे तर संस्थानातल्या सरदारांनी व अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकाराचा कसा उपयोग करावा, प्रजेशी कशी वागणूक ठेवावी याचे मार्गदर्शन म्हणून 'दरबार पॉलिसी' नावाचे प्रत्येक विभागासाठी ग्रंथ लिहून ठेवले होते. स्वर्गीय महाराज स्वतः अतिहुशार, स्वतःच्या घराण्याचा व त्यापेक्षाही जास्त स्वदेशाचा ज्वलंत अभिमान ठेवणारे असे होते. ते राजशासनाला करडे परंतु माणूसकी न विसरलेले असे होते. राजनीतीमध्ये जणू चाणक्यच आणि त्यामुळेच की काय, सगळ्या भारतीय प्रथांचे, रीति-रिवाजांचे, ज्ञाति-पंथ-धर्मविरहित भोक्ते होते. ते महाराज जिवंत होते तोवर राज्यामध्ये कायदेकानूंचे शासन सुरळीतपणे चालले होते. सर्व जाति–धर्मांचे अधिकारी प्रामाणिकपणे वागत असत. प्रजा सुखी होती. ह्या महाराजांनी केलेल्या अनेक कायद्यांपैकी एक कायदा मांडलिक सरदार–नेमणूकदार आदि मंडळींच्या अधिकारांबद्दल, सरदार–दरबार संबंधाबद्दल–त्यांच्यासाठी सर्व तऱ्हेच्या नियमना–मार्गदर्शनाबद्दल होता. त्या कायद्यान्वये सरदाराने दरबारच्या म्हणजे महाराजांच्या परवानगीशिवाय कर्ज काढू नये येथपासून तर सरदाराचा वारस कोण होईल, हे ठरविण्यापर्यंत सर्व बाबींबद्दल नियम बनविले होते आणि त्या नियमांचे पालन स्वर्गीय महाराजांच्या अमदानीत प्रामाणिक अधिकाऱ्यामुळे समजदारीने आणि राजनीतीचे सूत्र संभाळून होत गेले. या सगळ्या व्यवस्थेमुळे आणि कार्यपद्धतीमुळे स्वतः महाराजांचे राज्य नावारूपाला आले, एवढेच नव्हे तर सरदार–नेमणूकदार मंडळीही भरभराटीला आली. त्यामधली काही इमानी, देशाभिमानी, स्वतंत्र बाण्याची तशीच निर्भय अशी निघाली. सरदार पुरुषमंडळी काय, सरदारांच्या बायकांमधूनदेखील काही निर्भय वृत्तीच्या आणि मुत्सद्दीपणामध्ये मुरलेल्या अशा निघाल्या.

अशाच एका नावरूपाला आलेल्या सरदारांना स्वतःचा औरस-मुलगा नव्हता. केवळ दोन मुलीच होत्या. मोठ्या मुलीचे लग्न तोलामोलाच्या सरदार घराण्यातल्या एका मुलाशी सरदारसाहेबांच्या हयातीतच झाले होते. धाकटी मुलगी कुंवारीच राहिली होती. शिकत होती. सरदारीणबाईही कर्तबगार होत्या. दोघां पति-पत्नींनी सरदारीणबाईंच्या दूरच्या नात्यातल्या एका होतकरू मुलाला हेरून त्याला दत्तक घ्यायचा विचार त्या मुलाच्या बाळपणापासूनच चालविला होता. ह्या सरदारांचे संस्थान चांगले लखाती संस्थान होते आणि

सरदारसाहेबांनी भावीकाळाची वायुपरीक्षा करून आपली शिलकी मिळकत आपल्या वाड्यात दुकाने काढून सिनेमा–थिएटर बांधून व चालवून खर्च करीत राहण्याचे धोरण पाहिले होते; पण त्यामुळेच की काय, सरदारमहाशयांच्या संस्थानचा वारस कोण होईल, कोण असावा यासंबंधात स्वहितेच्छु मतलबी लोकांनी आपले धागेदोरे लावायला, हलवायला, त्यांचे सूत्रचालन सरकारी विभागांमध्येही करायला सुरुवात केली होती. कारण सरदाराने दत्तक घ्यावयाचा तो योग्यतम असावा हे ठरवून त्याप्रमाणे सल्ला देण्याचा अधिकार 'दरबार'चा आहे असे कायद्यात लिहिले होते! अर्थात हे ठरविण्यापूर्वी दत्तकाची परवानगी मागणाऱ्या सरदारापासून ते सरदाराची विधवा, सरदाराचे देशातले कुटुंबीय व इतर ज्ञातिबांधव यांपैकी जो जो आपली पात्रता सांगेल त्याचे म्हणणे ऐकून व धर्मशास्त्रामधल्या मूलभूत सिद्धान्ताप्रमाणे हे ठरविले जावे, असेही नियम होतेच. त्यामुळे योग्यतम अर्जदाराला न्याय मिळण्याची पूर्ण संधी मिळत असे.

गोष्ट सांगत आहे त्या दिवसांत दुर्भाग्याने शहाणे नि राजनीतिनिपुण महाराज कालवश झाले होते आणि त्यांचे वारस महाराज अज्ञान असल्याने ते वयात येईतोवर संस्थानात रीजन्सी कौन्सिलचे शासन जवळ जवळ बारा वर्षे राहिले. अज्ञान महाराज वयात येताच त्यांना ब्रिटीश व्हाइसरॉयकडून गादीचे रीतसर अधिकार मिळाले होते. नवीन महाराजांना त्यांच्या अज्ञानदशेमध्ये चांगले शिक्षण मिळाले होते. स्वतः नवीन महाराज वृत्तीने सज्जन होते; पण बुद्धीने यथातथाच होते आणि अज्ञानदशेमध्ये हे महाराज वडील राजमातेच्या कडक शिस्तीत वाढल्यामुळे की काय, भित्रे झाले होते, अज्ञानदशेमध्ये हलक्या, कमी प्रतीच्या माणसांचा सहवास मिळत राहिल्याने हलक्या कानाचे झाले होते. कोण माणूस कसा आहे हे ओळखण्याची स्वतःची बुद्धी नसल्याने कुण्या तोंडपुज्या माणसालाही विश्वासपात्र समजण्याकडे, त्यावर पूर्णतया विसंबून त्याच्या सल्ल्याप्रमाणे वागण्याकडे नवीन महाराजांची वृत्ती दिसू लागली होती आणि हे बघून अधिकार मिळालेल्या नवीन महाराजाभोवती मतलबी, धूर्त मंडळींचा गर्दी वाढत होती. मयत सरदार-महाशयांच्या दत्तकप्रकरणामध्ये आपली डाळ शिजवून घेण्याची इच्छा करणाऱ्या काही धूर्त मंडळींनी आपल्यामधल्या नवीन महाराजांच्याच वयाच्या मुलाला महाराजांसमोर वारंवार आणून, शेवटी त्या मुलाला महाराजांच्या दिमतीतील सेवकवर्गामध्ये नेमून घेतले. तो मुलगाही स्वतःच्या हिताकडे लक्ष ठेवून नवीन महाराजांची 'इमानेइतबारे' सेवा करू लागला होता.

मयत सरदाराच्या विधवेकडून त्यांच्या पसतीच्या हेरून ठेवलेल्या मुलाला दत्तक घेण्याबद्दल परवानगी मिळण्याचा अर्ज रीतसर जागीर विभागामध्ये दाखल झाला होता. हेच निमित्त हितसंबंधी धूर्त मंडळींना या दत्तकप्रकरणामध्ये महाराजांचे कान भरण्यास तातडीची सुरुवात करायला पुरेसे झाले होते. महाराजांच्या सेवेमध्ये दिवसरात्र इमानेइतबारे राबणाऱ्या त्या मुलालाच विधवा सरदारीणबाईंनी दत्तक घ्यावे, असा सल्ला महाराजांना देण्यात येऊ लागला. तोसुद्धा इतक्या धूर्तपणाने की, महाराजांना वाटावे की, महाराज स्वतःच, स्वतःच्या बुद्धीने, योग्य पारख करून, योग्य न्याय-निर्णय करीत आहेत. अशा विश्वासाने महाराजांकडून बोलला गेलेला शब्द उचलून धरून त्या तोंडी आज्ञेचा हवाला देऊन, विधवा सरदारीणबाईंना जागीर विभागाकडून रीतसर हुजुरांचे आज्ञापत्र पाठविले गेले की, 'श्रीमंत महाराजांच्या मते सरदारीणबाईंनी निवडलेला मुलगा दत्तकासाठी योग्य नसून, त्याऐवजी महाराजांच्या सेवेमध्ये असलेला महाराजांना योग्य वाटलेला मुलगाच सर्वतोपरी योग्य आहे. तेव्हा सरदारीणबाईंनी त्या मुलालाच दत्तक घ्यावे, अशा सूचनेसहित सरदारीणबाईंचा दत्तक घेण्याची परवानगी मागण्याचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.'

आपल्या अर्जाचा असा निकाल लागलेला बघून सरदारीणबाईंना अतिशय वाईट वाटले नि त्या वाईट वाटण्याच्या कळवळ्यानेच त्या बाईंचा अभिमानही पेटून उठला. स्वतःच्या मानहानीने चिडून, पेटून उठलेली अभिमानी बाई म्हणजे साक्षात् दुर्गाच–ती रणचंडीसारखी पेटते. सरदारीणबाईंनी तितक्याच ठामपणे निर्णय घेतला की 'मी ठरविलेल्या मुलालाच दत्तक घेईन, नाही तर मी दुसरा दत्तक घेणार नाही. महाराजांनी सुचविलेल्या मुलाला तर मी मुळीच दत्तक घेणार नाही!' असा निर्णय घेऊन सरदारीणबाईंनी त्यांच्याकडे सरकारी विभागातर्फे 'योग्य मार्गदर्शन' करण्यासाठी येणाऱ्या प्रबंधक मंडळींना वाटाण्याच्या अक्षता देण्यास सुरुवात केली. एवढेच नव्हे तर अशा मंडळींची भेट घेण्याचेही त्या टाळू लागल्या–नाकारू लागल्या. सरदारीणबाईंच्या अशा तडफदार वागण्याकडे बघून सरकारी विभागातली 'मार्गदर्शन' करणारी मंडळीही गरम होऊ लागली. सरदारीणबाईंना वठणीवर आणण्यासाठी काय करायला हवे, याबद्दल सरकारी मंडळीत विचारविमर्श चालू झाला. इकडे सरदारीणबाईंनीही आपली कौटिल्यनीती अनुसरून आपल्या जामदारखान्यातले सहज मिळू शकणारे दागदागिने, चांदीची भांडीकुंडी या ना त्या निमित्ताने जामदारखान्यातून मागवून स्वतःजवळ ठेवण्यास सुरुवात केली व ते जडजवाहीर नि चांदीची भांडीकुंडी जामदारखान्यात परत करण्यामध्ये टाळाटाळ करण्यासाठी निरनिराळी कारणे सांगू लागल्या. तसेच सरकारी गोटात आपले जे हेर त्यांनी पसरून ठेवले होते त्यांच्याकडून सरकारी विभागात काय काय मसलती होत आहेत, याची बित्तबातमी मिळविण्यास सुरुवात केली होती.

हे दिवस कोणते होते? भारतामध्ये ब्रिटीश राजसत्ताविरुद्ध 'चले जाव'चा लढा पेटलेला होता. ब्रिटीश मुत्सद्दी भारतामध्ये बेकीची बीजं पेरण्यात, भारताची शकले करावयास काय काय करायला हवे, याचे मनसुबे करीत होते. त्यातच भारतामधल्या नरेन्द्रमंडळीत ब्रिटीश राजसत्ता 'चले जाव'च्या धमकाने भारतातून चालती झाली तर, ब्रिटीश भारताबरोबर संस्थाने भारतदखाल स्वतंत्र होईल–आम्हीसुद्धा आमच्या संस्थानाचे खरेखुरे राजे 'स्वतंत्र महाराजाधिराज सम्राट' होऊ, अशी स्वप्ने काही नरेन्द्रांना पडायला लागली होती व त्याच गुर्मीत येऊन एका नरेन्द्राने तर मुगल सम्राट औरंगजेबाचाच आव आणून पुढे-मागे स्वतंत्र होऊ पाहणाऱ्या, भारतापासून स्वतःचे संस्थान हिंदु बहुमत असलेल्या परंतु जिझिया-कर लादण्यासारख्या शासनव्यवस्थेमध्ये दबून गेलेल्या प्रजेसकट स्वतंत्र राहील, असे धोरण बांधायला आरंभ केला होता. मला माझ्या गोष्टीच्या संदर्भात सांगायचे ते असे की, गोष्टतदांमत

संस्थानामध्येही तरुण, अननुभवी, अल्पबुद्धी महाराजांच्या मनातही त्यांच्या राजेपणाच्या मोठेपणाविषयी, अनियंत्रित अधिकाराविषयी भरमसाट कल्पना रुजवायला धूर्त मंडळींनी आरंभ केला होता. दत्तकप्रकरणाबद्दल महाराजांना पहिला सल्ला काय दिला गेला असावा कोण जाणे; पण एके दिवशी सरदारीणबाईंना त्यांच्या हेराने ताजी बातमी म्हणून सांगितले की, 'लवकरच एक दिवशी स्वत: महाराजसरकार ए. डी. सी. विभागीय अधिकारी आदि मंडळींसमवेत तुमच्या वाड्यावर येतील आणि महाराजांच्या सेवेमध्ये असलेल्या मुलाला तुमच्या वाड्यात आणून कडेकोट बंदोबस्तात दत्तविधानाचा समारंभ पार पाडण्यात येईल व त्या पुराव्यावर दत्तविधान कायदेशीर मानले जाऊन तो मुलगा तुमचा विधिवत वारस ठरेल!'

ही भयंकर बातमी विश्वास ठेवण्यायोग्य आहे की नाही याची शहानिशा करण्यात वेळ घालविणे सरदारीणबाईंना योग्य वाटले नाही. कारण असे झालेच तर आपल्या हातात काहीही राहणार नाही याची धास्ती त्यांना वाटून त्यांचे धाबे दणाणले; पण त्या सावधही झाल्या. त्यांनी थंड मनाने अगदी मोजक्या मंडळींना विश्वासात घेऊन, आपल्याजवळचे जडजवाहीर, पैसा-अडका, आवश्यक मौल्यवान कपडा-लत्ता, भांडी-कुंडी इत्यादि सामान पेट्यांमधून भरून दहा–बारा पेट्यांचे लगेज घेऊन एके दिवशी रात्रीच्या किर्र अंधारात आपल्या कुंवारी मुलीला बरोबर घेऊन रेल्वे स्टेशनवर पड्यामधे आल्या व तेथे संस्थानच्या सरहद्दीपासून शेकडो मैल दूर असणाऱ्या शहराची तिकिटे काढून त्यांनी संस्थानाची राजधानी सोडली आणि संस्थानाची सरहद्द ओलांडताच सुटकेचा श्वास सोडला!

असली दिसायला अतिरेकी पण परिस्थितीने आवश्यक वाटलेली पावले ठामपणे नि तडकाफडकी उचलताना सरदारीणबाईंच्या मनातील विचार आणि प्रेरणाही साध्याच स्पष्ट होत्या. 'मला हव्या असलेल्या आणि माझ्या दिवंगत पतींना पसंत असलेल्या मुलाशिवाय मी दुसऱ्या कोणत्याही मुलाला माझ्या मांडीवर बसवून घेणार नाही! तेच टाळण्यासाठी मी स्वत:च संस्थानाबाहेर जाते आहे. मी बरोबर नेते आहे ते सगळे सामान माझेच आहे. मी कुणाची चोरी करीत नाही की कुणा राजाविरुद्ध बंड करीत नाही. माझी जागीर, माझी खाजगी संपत्ती बंडखोराची संपत्ती म्हणून जप्त करण्याचा कोणालाही अधिकार नाही. दत्तक म्हणून कोण मुलगा घ्यायचा हा माझा, माझ्या पतींच्या इच्छेच्या अनुकूल असा, स्वेच्छेचा अधिकार आहे. मी जिवंत आहे तोंवर माझा अधिकार मी अबाधित राखीन! महाराजांना केवळ दत्तक घ्यायच्या मुलाबद्दल मंजुरी देण्याचा अधिकार आहे. कायदेनियम धाब्यावर बसवून अमक्यालाच दत्तक घ्या, असे सांगण्याचा अधिकार महाराजांना नाही! जुलुमजबरदस्तीने माझ्या मांडीवर कुणालाही बसविण्याचा व त्याला दत्तक-पुत्र मानायला मला विवश करण्याचा महाराजांना मुळीच अधिकार नाही. दोघा स्त्री-पुरुषांनी सात पावले चालून लागणारे लग्न, त्यापैकी एकाने देखील चालायचे नाकारले तर ते लग्नच होत नाही, त्याचप्रमाणे दत्तकविधानामध्ये दत्तक घेणाऱ्याने कुणा मुलाला मांडी दिली नाही तर, मी स्वत: त्या मुलाला मांडीवर बसवून घ्यायचे नाकारले तर ते दत्तकविधानही होत नाही. मी माझी व माझ्या पतीची इच्छा पाळते आहे. कुणा अधिकाऱ्याच्या कायदेशीर आज्ञेची अवहेलना करीत नाही. सात पावले न चाललेली मुलगी 'कुंवारी' म्हणून राहील. तसेच मांडीवर नियोजित मुलाला न बसवणारी बाई 'निपुत्रिका' म्हणून राहील एवढेच! तो भोग मी भोगीन, पण आम्हा पति-पत्नींना नको असलेला मुलगा मी माझ्या पतींचा वारस होऊ देणार नाही!' इत्यादि अभिमानी पण न्याय्य विचारांनी सरदारीणबाईंचा निश्चय पोलादी निश्चयाच्या स्वरूपाचा झाला व त्याच धीरावर बाई संस्थानच्या अधिकारक्षेत्राबाहेर ब्रिटीश नियंत्रित क्षेत्रात जाऊन राहिल्या. अगदी गल्ली-बोळांतल्या तीन-चार खणी खोल्यांच्या घरात एखाद्या सामान्य माणसाप्रमाणे आयुष्य घालवू लागल्या. संस्थानी थाटाने राजवाड्यासारख्या प्रासादामध्ये कारकून, दिवाणजी, गुरुजी, मास्टरजी, कुणबिणी, मोलकरणी इत्यादींच्या दिमतीत वावरणाऱ्या आणि स्वत: खानदानी पड्याच्या शिस्तीत वावरण्याची रीत असलेल्या त्या, वयात येऊन प्रौढकुमारी होऊ पहात असलेल्या मुलीच्या आईला ते चार खणी बिऱ्हाडातले गल्ली-बोळातले जीवन नमवू शकले नाही. त्या तशा अंधाऱ्या खोलीतही लाकडी फळ्यांच्या पलंगावर गादी-उशा-गिरद्यांच्या स्वच्छ चादरीच्या अंथरुणावर बसून, पानसुपारीचा डबा समोर ठेवून, आपल्या प्रौढ कुमारी मुलीला 'अहो जाहो' करीत कडक शिस्तीत वागविणाऱ्या, ती एक नोकर, ती एक बटीक यांच्यावर जरबेने अधिकार गाजविणाऱ्या त्या सरदारीणबाईंचा खानदानी अभिमान काळवंडला नाही, की गारठला नाही. माझ्यावर जुलूम करणाऱ्या अरेरावांनाही मी धडा शिकवीन या जिद्दीने त्या पेटत राहिल्या. ती प्रतिपक्षावर-शत्रूवर वार करण्याची संधी केव्हा मिळते, याची वाट पहात राहिल्या.

इकडे संस्थानामध्ये सरदारीणबाई बेपत्ता होण्याची, वाड्यामधून आपल्या कुंवारी मुलीला बरोबर घेऊन सामानाच्या सात पेट्यांसह नाहीशा झाल्या आहेत पण कोठे गेल्या आहेत, ते कुणालाच माहीत नाही अशी बातमी वाड्याबाहेर पसरायला वेळ लागला नाही. ह्या बातमीने धूर्त मंडळीच्या तोंडावर शेण माखल्यागत झाले. धावपळ सुरू झाली, धडाकेबाज हुकूम सुटू लागले. या बनावाला साथ देणारे, जबाबदार कोण त्याचा शोध सुरू झाला – त्यात सुक्याबरोबर ओली मंडळीही जळू लागली. चौकीदार, चाकरमंडळींच्या पाठीची सालडी निघू लागली. ब्राह्मण कारकून, आचाऱ्यांना कंबर वाकवावी लागली. सरदारीणबाईंच्या वाड्याला कुलपे ठोकण्यात आली. जामदारखान्याच्या दारा-खिडक्यांना प्रत्येकी दोन दोन कुलुपे असूनही त्या कुलुपांना कपड्याने शिवून शिवणीवर लाखेची सिले लावण्यात आली. सरदारीणबाईंच्या वाड्यावर सरकारी पहारा बसला. राजवाड्यामध्ये मिश्यांचे आकडे पिळीत वावरणाऱ्या त्या नियोजित दत्तकाच्या मिश्यांचे आकडेच काय पण साऱ्या शरीरातला सगळा ताठा उतरून गेला – त्याचे तोंड काळे ठिक्कर पडले! श्रीमंत सरकारस्वारीच्या कानांवर रीतसर मोजक्या शब्दांत व योग्य वेळ पाहून सरदारीणबाईंच्या अचानक पलायनाचे वर्तमान घालण्यात आले व त्याच दमांत सक्तीचा शोध चालू आहे, सरदारीणबाईंच्या वाड्यावर कडेकोट बंदोबस्त झाला आहे इत्यादि 'गुजारिश' बाअदब होशियारीने पण जोशात सांगण्यात आली!

आणि 'बाद की सूझ' च्या शहाणपणाने सरदारीणबाईंना अद्दल घडविण्यासाठी काय काय करायला हवे याबद्दल 'सलाह मशवरा' सुरू झाला. हूजूर मोअल्लाच्या खिदमतीत आणखी काय 'गुजारिश' करायला हवी याची 'मसलेहृत' सुरू झाली. अक्कलहुशारीच्या खलामध्ये अरेरावीच्या बत्त्याने सगळे विचार कुटले जाऊन मसलतीचा मसाला तयार झाला. मसाल्याच्या तिखट-जहालपणाची जाहिरात होऊ लागली, चविष्टपणाची चटकदार वर्णने करण्यात आली. या साऱ्या मसलतींच्या मसाल्याने तयार झालेले पदार्थ इतकेच निघाले की, 'सरदारीणबाईंनी हुजूरेवालांच्या हुकुमाची 'नाफरमाबरदारी' केली आहे. 'बेमुरव्वत' अवहेलना झाली आहे. सरदारीणबाईंनी 'बगावत' बंड केली आहे– त्या फरार झाल्या आहेत 'बागी'ला 'रियासत बदर' केले पाहिजे – बंडखोराला विजनवास घडविला पाहिजे – बंडखोराची नेमणूक तोडली पाहिजे. सारी मालमत्ता जप्त झाली पाहिजे हे आणि ते!' पण ऽऽऽ? सरदारीणबाई पुन्हा वाडयात येऊन उभ्या राहिल्या तर ऽऽऽ? त्याचाही विचार करायला हवा असे ठरले. शेवटी हूजुरांच्या हुकुमाचे पहिले फरमान निघाले की, 'ज्या अर्थी सरदारीणबाईसाहिबा सरकारी संमतीशिवाय संस्थाना बाहेर निघून गेल्या आहेत, त्या अर्थी त्यांना संस्थानात परत येण्यास मनाही करण्यात येत आहे व त्यांची नेमणूक बंद करण्यात येत आहे!' पण एवढयाने काय भागणार होते? हो तर राणीवशात बसून रणांगणावर शौर्य गाजविणाऱ्या गोष्टी बोलणाऱ्या 'उत्तरा'ची भाषा झाली. आणखी काही 'हथियार उचलण्याची' कार्यवाही झाली पाहिजे! पण जुलुमजबरदस्तीने सरदारीणबाईंच्या मांडीवर दत्तक बसविण्याचा बार तर फुकट गेला होता. वीरश्रीचा जोर हातात उरला नव्हता. तेव्हा आता जे हत्यार उचलायचे ते नीट पारखून, पाजळून, पुढचा-मागचा विचार करून, न्यायनीतीच्या डावपेचाने उचलले पाहिजे, आडदांडपणाने नव्हे, असा विचार खुद्द महाराज सरकारस्वारींच्या मनात आला असावा. हाडाचे भित्रे, बुद्धीचे जेमतेम, अननुभवी नी हलक्या कानाचे तरुण महाराज! एकीकडे भीतीच्या शहाणपणापायी पुन्हा दुसरा 'वार' करण्याचे धैर्य त्यांना झाले नाही आणि स्वर्गीय पूज्यपाद्र पिताजीमहाराजांच्या शहाण्या सल्लामसलतीची शिकवण तरुण महाराजांना आठवली असावी व आपणही आपल्या सलाहगारांशी मसलत केली पाहिजे, असे ठरवून महाराजांनी जागीरविभाग, गृहविभाग, न्यायविभाग इत्यादि विभागांतील 'आपल्या' सल्लागारांना विचारायचे ठरविले! आणि येथेच मला या कहाणीच्या सुरुवातीचे वाक्य पुन्हा कळवळून लिहावेसे वाटते. 'राजांना सल्लागार शहाणे हवे असत. जनतायुगाच्या राज्यात देखील राजकर्त्यांना 'सुचविणारे' शहाणे, प्रामाणिक असणे आवश्यक आहे!'

अननुभवी महाराजांच्या सल्लागारात त्या दिवसांत जागीरविभागामध्ये एक गौडबंगाली वृत्तीचे पाताळयंत्री गृहस्थ होते. त्यांनी संस्थानी जागीरदारावर दरारा दाखवून आपले उखळ पांढरे करण्याच्या धूर्त अरेरावीने सल्ला दिला की, जागीर जप्त करून नियोजित दत्तकाच्या नावे जागीर करून दिली पाहिजे. गृहविभागाचे प्रमुख साहजिकच पोलिसी वृत्तीचे होते. त्यांनी सरदारीणबाईंच्या सगळ्या मालमत्तेचा पंचनामा करून ती सारी मालमत्ता नियोजित दत्तकाच्या ताब्यात देण्याचा सल्ला दिला. आणि न्यायविभाग!

निरनिराळ्या दूरदृष्टींनी आणि माणुसकीच्या भावनेने बनविलेले स्वर्गीय महाराजांच्या वेळचे कायदेकानू तर जागेवर होते. सुदैवाने एक न्यायाधीश पूर्ण खानदानी इमानाचे, गरिबीतून वर येऊनही गरिबीची माणुसकी न विसरलेले नि परदेशी चालीरीतींची प्रजातांत्रिक वागणूक संस्थानी वातावरणातही निर्भय वृत्तीने पण अदबीने ठेवणारे असे होते. न्यायविभागातल्या अशा शहाण्या सल्लागारांना सल्ला विचारण्याचे महाराजांनी ठरविले; पण धूर्त मंडळींनी ते महाराजांच्या 'स्वतंत्र सम्राट' असल्याच्या बाण्याला उभारा देण्याच्या बुद्धीने सुचविलेल्या मर्यादित सल्ल्याबद्दलच विचारले जाईल याकडे लक्ष दिले होते–प्राप्त परिस्थितीत न्याय्य काय आहे याचा स्वतंत्रपणे व निष्पक्षतेने विचार करून त्यांचे निर्णय-मत काय आहे हे सांगण्याची मोकळीक न देता! धूर्त मंडळींचा सल्ला आकर्षक होता. 'महाराज! आपण न्यायाची गंगोत्री आहात, आपण प्रजेचे अन्नदाते आहात, आपण केलेली कोणतीही गोष्ट अपराध नाही, ('किंग कॅन डू नो रॉंग' या चालीने) शिवाय महाराज! जागीरचा वारस ठरविण्याचा अधिकार आपणाला कायद्यानेच आहे. आपण न्यायदाते असून आपण 'आहे ते नाही' व 'नाही ते आहे' असे म्हणू शकता. (पार्लमेंट कॅन मेक एन्ड अन् मेक लॉ या चालीने), आपणाद्वारा नियोजित दत्तक मुलगा मयत सरदाराचा वारस मुलगा आहे असे आपण म्हणू शकता; आपल्या तोंडचा शब्द नुसता हुकूमच नाही, तो कायदाच आहे!'

अशा लोभस सल्ल्यापुढे बिचारे अननुभवी महाराज किती गडबडून गेले असावेत? खाडकन् जागीर जप्त करून नवी जागीर निर्माण करण्याचा हुडेलहप्पी दम त्यांचा 'उत्तरी' भित्रेपणा करू देईना. मयत सरदाराची मालमत्ता पंचनामा करून नियोजित मुलाच्या ताब्यात देण्यापूर्वी नियोजित मुलाचे कायदेशीर स्थान निश्चित करणे आवश्यक आहे ही काळजी घेण्याचा भित्रा शहाणपणा त्यांना आठवला होता; पण ब्रिटिशांचे हिंदुस्थानावरचे सार्वभौमत्व समाप्त होण्याच्या मार्गावर असताना, आपल्याला लाभणाऱ्या स्वतंत्र सामंतपणाची स्वप्नेही त्यांना नीटपणे चैन पडू देईनात! योग्य निर्णय घेऊ देईनात! या सगळ्या वृत्ती-विचारांच्या चाळणीतून निघालेला व महाराजांच्या बुद्धीच्या आवाक्यात येणारा विचारण्यासारखा सल्ला निघाला की, महाराज 'नियोजित दत्तक मुलाला मयत सरदाराचा वारस समजावा,' असा हुकूम देऊ शकतात की नाही?

न्यायविभागाच्या निरनिराळ्या सल्लागारांनी या प्रश्नाला दिलेले उत्तर त्या त्या सल्लागाराच्या बुद्धि-वृत्तीप्रमाणेच होते. एकाने, म्हणजे जातीयतेच्या वशिल्यावर उच्चपदी पोचलेल्या तज्ज्ञाने म्हटले की, 'मयताची व नियोजित मुलाची जात एकच आहे, तेव्हा धर्मशास्त्राप्रमाणे पात्रतेची अडचण नाही. जागिरी कायद्याने मुलाच्या योग्यतेबद्दल द्यायची आपली संमती म्हणजे तो अधिकारच आहे. नियोजित मुलाची दत्तकासाठी योग्यता ठरविली असताना आपण त्याला मयताचा पुत्रसदृश वारस म्हणणे कायदेशीर होईल!' वडिलांच्या वारसावर विसंबून असणाऱ्याने प्रत्युत्पन्न बुद्धीचा 'बहिकमत अमली' सल्ला दिला की, 'नियोजित मुलाचे नाव बदलून मयताच्या आडनावाचे नाव मुलाला आपण आपल्या हुकुमाने देऊ शकता व त्या मुलाला मयत सरदाराचा कुटुंबी वारस म्हणून

ठरविल्याचे 'फरमान' आपण काढू शकता. फक्त काळजी एवढीच घ्यायची की, फरमानामधे दत्तकाचे नावही काढू नये!' तिसऱ्या सल्लागाराने आपले मत स्पष्टपणे लिहून म्हटले की, 'कोणताही राजा आपल्या हुकुमानें दत्तकविधी करू शकत नाही किंवा वारस नसलेल्यास वारस ठरवू शकत नाही. आपल्या पूर्वजांनी कुणाला दिलेली जागिर, जागीरी संपत्ती मानासहित आपण त्याच्याकडून काढून घेऊ शकता. ती दुसऱ्याला देऊ शकता; पण मयत सरदाराची खाजगी मिळकत मयताच्या विधवेची राहील व त्याबाबतचा वारसा आपण ठरवू शकणार नाही. तो जन्मदत्त हक्काने मयताच्या विधवेच्या पोटी आलेल्या वारसांना किंवा मृत्युपत्राने तिच्याकडून हस्तांतरित होईल–मिळेल.' इत्यादी. या सगळ्या विचारविमर्षातून महाराजांनी काढलेले दुसरे फरमान अशा अर्थाचे होते की, 'हे आज्ञापत्र काढल्या तारखेपासून ( येथे नियोजित दत्तक मुलाचे जन्म-कुळीचे नाव लिहून )......चे नाव मयत सरदाराच्या आडनावाचे समजण्यात यावे आणि मयत सरदाराची जागीर या ( नव्या नावाने त्या मुलाच्या नावा )......ची करून देण्यात येत आहे.' या भित्र्या आणि भोंगळ आज्ञेमधे जागीरजप्तीचे नाव नव्हते की मयत सरदाराच्या खाजगी मिळकतीबद्दल खुलासा नव्हता. याचा पूर्ण फायदा धूर्त मंडळींनी घेतला. नियोजित मुलाला नवा सरदार समजून त्याला मानाचे मुजरे मिळू लागले. जागीरी संपत्ती व मानमरातब त्या मुलाच्या नावचे कागदोपत्री झाले व विधिवत नव्या जागीरदाराच्या कवजात दिले गेले व त्या अंमलबजावणीत शहरात असलेल्या सरदारांच्या वाड्याचा व त्या संबंधाच्या तेथे मिळालेल्या सगळ्या स्थावरजंगम मिळकतीचा ताबा नव्या जागीरदाराला देण्यात आला– अगदी मयत सरदारांच्या घराण्यातल्या बायका-मुलींच्या जुन्या साड्या-शालीसकट नि मयत सरदारांनी बनविलेल्या सिनेमा; दुकानांच्या सगळ्या मिळकतीसकट !

सरदारीणबाईंना विजनवासी केल्याचे–'रियासत बदर' केल्याचे फरमान, तसेच महाराजांनी काढलेले नियोजित मुलाचे आडनाव बदलून जागिरी संपत्ती त्याचे नावे करून दिल्याचे फरमान रीतसर सरदारीणबाईंनी प्राप्त करून घेतले. त्याच संदर्भात पुढे हुकुमाची तामिली खाजगी वाडा, खाजगी संपत्तीसकट नियोजित मुलाच्या ताब्यात देऊन करण्यात आल्याचे वर्तमानही सरदारीणबाईंना कळले.

याच सुमारास भारतामधे सत्तान्तर झाले होते. ब्रिटिशांची हिंदुस्थानावरची सत्ता समाप्त झाली होती. महाराजांचे संस्थान स्वतंत्र संस्थान न राहून ते पुष्कळशा अन्य संस्थानांबरोवर एकत्र संघटित होऊन भारतीय राज्यामधे त्या संघाला ब वर्गीय राज्याचा दर्जा देण्यात आला होता व संस्थानचे महाराज त्या संघराज्याचे राजप्रमुख झाले होते. प्रजातांत्रिक राज्यातही आपली सामंतशाही सांभाळीत होते. कायदेकानू बदलत होते. जागीरी, जमीदारी समाप्त करण्याचे कायदे बनले होते. न्यायालयप्रविष्ट होऊन ते कायदे स्थलांना आजाद्वारा जागीरदार, जमीदार मंडळींना प्राणवायू दिल्यागत आपापल्या मोडीला निघालेल्या अधिकारांचा व कळाहीन झालेल्या मानमरातबांचा उपभोग घेऊ देत होते. सगळीकडे जुनी भुते गाडली जात होती. भुतांच्या नावाने शिरजोरी करणारे दगड उलथले जाऊन त्या दगडाखाली वर्षानुवर्षे दबलेले जीवजिवाणू मोकळी हवा चाखून डोकी वर काढीत होते. साम्राज्यसत्तेचे दावे सुटेताच वारा प्यायल्यागत उंडारू पाहणारी सामंती वासरे परत दावणीला बांधली जात होती. जास्ती दांडगाई करणारे आलाहजरती खोंड खच्ची करून नांगराच्या जुत्याला जुंपले जात होते. या सगळ्या उलथापालथीत गोष्ट संदर्भित संस्थानांमधल्या दलितांसाठी, आर्त-पीडितांसाठी आस्था ठेवणाऱ्या एका वकिलाचे नाव सरदारीण-बाईंच्या कानावर गेले होते. त्या वकिलांचे आगमन सरदारीणबाई गल्ली-बोळातले जीवन कंठीत असलेल्या शहरी झाले आहे, याची वार्ता सरदारीणबाईंना कळताच त्यांनी त्या संस्थानी वकिलाला बोलावणे पाठविले. सरदारीणबाईंचे नाव व आमंत्रण ऐकून त्या वकिलाला, 'आपण एका अव्वल दर्जाच्या सरदाराच्या राणीसाहेबां-कडे जाणार आहोत,' या विचाराने प्रथम बिचकायलाच झाले होते; पण धीर करून वकीलसाहेब मिळालेल्या पत्त्यावर पेठ, रस्ता, गल्ली, बोळ नी घर अशा क्रमाने पत्ता काढीत तेथे पोचले; पण तेथे बघतात तो काय, सरदारी थाट तर दूरच राहिला! आपण काय मुला-सुनेच्या जाचाने बेजार झालेल्या म्हातारीने मुलाविरुद्ध वीस रुपये मासिक पोटगीचा दावा करण्यासाठी आपल्याला बोलाविले आहे की काय, असेच त्याला वाटले. कारण सरदारीणबाईंच्या तेथल्या निवासस्थानाचा देखावा बाहेरून तरी त्याच लायकीचा होता. त्या बिऱ्हाडाची बोळालगतची खोली दोन खणीच होती. त्या खोलीला आतल्या बाजूला जायला उजव्या हाताचे दार उघड्या अंगणात जाण्यासाठी असावे नी डाव्या हाताचे दार बिऱ्हाडाच्या आतल्या राहण्या-वापरण्याच्या दोन खोल्यांत नेणारे असावे. दोन्ही दारांवर जुन्या कापडाचे पडदे होते. बिऱ्हाडाच्या भिंती-दरवाज्यांना १०-१५ वर्षांत रंगरंगोटी झालेली असण्याचे काही चिन्ह दिसत नव्हते. दर्शनी खोलीत पाहुण्या आमंत्रिताला बसावयासाठी धड दोन खुर्च्या देखील नव्हत्या. एक जुनी टिनाची व एक जुनी बिनहातांची लाकडी खुर्ची होती. सरदारीची ग्वाही देणाऱ्या केवळ दोन गोष्टी तेथे वकिलाला दिसल्या होत्या. सरदारीणबाईंनी आसन ठेवलेल्या बिछान्यावरील उशा-गिर्द्यांच्या स्वच्छ चादरी व अभ्रयांच्या बिछायतीवर बाईंच्या पुढ्यात असणारा पानसुपारीचा चांदीचा मोठा जाळीदार डबा! तो डबा समोर ठेवून पन्नास-पंचावन्न वर्षांच्या दिसणाऱ्या बाईसाहेब स्वच्छ जरीकाठाचेच पण जुने सहावारी नेसलेल्या व डोक्यावर पदर घेऊन अंगावर रेशमी कलाबतूची पांढरी शाल घेऊन बसल्या होत्या. गरीबगुरिबांसाठी कळवळा ठेवून गरिबीनेच राहणाऱ्या त्या वकिलाला क्षणभर आपण कुठे भलत्याच जागी आलो की काय, असे वाटायला लावण्यासारखे दृश्य होते ते! तेथली सरदारी वास्तव्याची दुसरी गोष्ट त्या वकिलाला जाणवली ती, सरदारीणबाईंचे शिस्तीचे नि अदबीचे खानदानी बोलणे व अपमानाच्या आगीने जळत असलेला ओढगस्तीचा त्यांचा चेहरा! चेहऱ्याचा वर्ण मूळचाच उजळ होता की परिस्थितीच्या काळजीने पीतवर्ण झाला होता हे कळत नव्हते; परंतु त्या तशा चेहऱ्यामधेही दोन मोठे रेखीव भुवया-पापण्यांचे काळे डोळे, त्यांच्याकडे बघणाऱ्याला दुसऱ्या कोणत्याही गोष्टीकडे बघू देत नसावेत, अशी स्थिर व दुसऱ्याला खिळवणारी नजर होती बाईंची. त्या दोन्ही गोष्टी पाहून व ऐकून आपल्याला काही तरी विलक्षण कहाणी येथे ऐकायला

मिळणार आहे याची त्या वकिलाला लगच खात्री पटली. कारण सरदारीणबाईशी आरंभीचे नमस्कार-स्वागताचे बोलणे संपून त्यांनी हातानेच वकिलाला खुर्चीवर बसायला सांगितले व ते बसताच त्याला बाईसाहेबांनी म्हटले, 'काय वकीलसाहेब! आमच्या महराज सरकारांविरुद्ध त्यांच्याच संस्थानातल्या अदालतीमधे दावा करायची–लढायची हिंमत कराल का आपण?'

बिचारा वकील क्षणभर हबकलाच; पण त्याने बाईसाहेबांना तितक्याच शिस्तीने नि अदबीने उत्तर दिले–'या प्रश्नाचे उत्तर मला द्यायलाच हवे का? माझ्या वकिली हिम्मतीविषयी आपल्याला काही विश्वास वाटला असावा, म्हणूनच आपण मला बोलावणे धाडले नि त्याचा मान ठेवून मी येथे आलो आहे. आपण ज्यासाठी मला येथे बोलावलेत त्याविषयीच आपण बोलू या!'

जास्ती तपशिलात न शिरता कहाणी सांगायची म्हणजे सरदारीणबाईसाहिबांच्या वतीने संस्थानी न्यायालयात 'नियोजित मुलाचा नामांतरित व हस्तान्तरित वारसा रद्द ठरविण्यात यावा आणि सरादारी संस्थानची सारी–जागिरी तशीच खाजगी–मिळकत वादीला वादकालीन लाभसंचितासहित परत करण्यात यावी,' या मागणीचा दावा नियोजित मुलाच्या म्हणजे नामान्तराने झालेल्या नव्या सरदारी वारसाविरुद्ध करण्याचा त्या वकिलाने विचार केला; पण हे काम एका दिवसात करण्यासारखे नव्हते–एकटयाने करण्यासारखे नव्हते. दाव्याची मागणीच लाखांच्या दशकांनी मोजावी लागणार होती. दाव्याची कोर्टफीच हजारांनी द्यावी लागणार होती. कारण वादिनी साहिबा विजनवासात होत्या. बेघरदार झाल्या होत्या आणि दाव्याच्या संपत्तीचा सगळा ताबा प्रतिवादीजवळ होता. वकिलाच्या पारिश्रमिकाचा विचार बाजूला ठेवला, तरी इतर खर्च व वादग्रस्त संपत्तीचे सविस्तर मूल्यांकन करण्यात वेळ लागला. शिवाय एवढ्या मोठ्या वाद मूल्याचा दावा एका बेघरबार विधवा स्त्रीच्यावतीने आपल्या एकटयाच्या जबाबदारीवर करणे त्या वकिलाला योग्य वाटले नाही. त्यासाठी त्या वकिलाने सरदारीणबाईची संमति घेऊन आणखी एका नावाजलेल्या मोठ्या वकिलाची मदत घेण्याचे ठरविले व त्यासाठी दुसऱ्या एका संस्थानाच्या वकिलाचे नाव बाईसाहेबांना सुचविले. त्याप्रमाणे सरदारीणबाईसाहेबांनी त्या दुसऱ्या वकिलाची हे काम स्वीकारण्याची संमती आणखी इतर कोणकोणत्या अटीवर मिळविली हे या वकीलसाहेबांना कळले नाही, पण एक अट त्याने त्या वकिलाला सांगितली ती म्हणजे, मोठे वकीलसाहेब कोर्टामध्ये दर तारखेवार हजर होऊ शकणार नाहीत. फक्त सुरुवातीस दावा तयार करून देतील व शेवटी तर्कनिवेदन–आरग्युमेंन्ट करायला हजर राहतील. दावा दाखल करण्यापासून ते प्रत्येक तारखेला कोर्टांत काम चालविण्याची जबाबदारी छोटया वकीलसाहेबांवरच राहील. नैमित्तिक दरखास्ती देणे, प्रतिपक्षाच्या दरखास्तींची उत्तरे देणे, वेळोवेळी उद्भवणाऱ्या वादग्रस्तप्रश्नांचे वादविवाद करणे, स्वतःचा पुरावा निवडणे, तो कोर्टासमोर आणून तपासणे, प्रतिपक्षाच्या पुराव्याची कूट परीक्षणे–उलटतपासणी करणे, दाव्याची मिझल–फाइल सॉलिसिटरच्या कसोशीने तयार करणे इत्यादि सारी लहान–मोठी कामे वक्तशीरपणे व सतर्कतेने 'छोटया' वकीलसाहेबांनाच करावी लागणार होती! शिवाय वादिनीपक्षकारसाहिबा संस्थानाबाहेर हजार मैलावर दूर नि दाव्याच्या मार्गदर्शनाची जबाबदारी घेणारे मोठे वकीलसाहेब तीनशे मैलांवर दूर होते! शेवटी सगळ्या अडचणींवर काही ना काही तोडगा काढून व सगळा आराखडा विगतवार ठरून दाव्याची रीतसर नोटिस प्रतिपक्षी नव्या सरदारसाहेबांना पाठवली गेली. त्याच्या जबाबही यथासमय नव्या सरदारसाहेबांच्या वकिलांकडून आला.

वादिनीसाहिबांची सद्यःनिवासभूमी, मोठया वकीलसाहेबांची स्थायी कर्मभूमी व वादश्रवणक्षम न्यायालयाची युद्धभूमी यामधील त्रिस्थळी कार्यसंचालन छोटया वकीलसाहेबांवर पडले नाही हे छोटया वकीलसाहेबांचे भाग्यच. कारण या त्रिस्थळी यात्रा वारंवार कराव्या लागणार होत्या व जबाबदारीने करायच्या होत्या. त्या कामासाठी वादिनीसाहेबांच्या प्रौढ कुमारी कन्येने ही जबाबदारी पत्करली. ह्या ताईसाहिबा सरदारी इतमामाने पण परिस्थितीच्या लाचारीने एका कुणबिणीला बरोबर घेऊन रस्त्यामधून पायी चालत वकिलाच्या कार्यालयात येऊ-जाऊ लागल्या. मोठ्या वकीलसाहेबांच्या गावी जाऊन त्यांचे मार्गदर्शन बहुतांशी तोंडीच आणू लागल्या. होत असलेल्या कामाचा रिपोर्ट देण्यास आईसाहेबांकडेही अर्थात जाऊन राहू लागल्या. श्रीमती ताईसाहिबांचे शिक्षण नक्की किती झाले होते हे कळले नाही; पण ते दुसऱ्याचे बोललेले इंग्रजी तात्काळ नि नीट समजण्याइतके निश्चित दिसत असे. बाकी ताईसाहेबांची बुद्धी नि शिस्त एकंदरीत डिप्टी-कलेक्टरसारख्या अधिकाऱ्याची. केव्हाही वकिलाच्या कचेरीत येताना एका छोटयाशा चिठ्ठीवर काय बोलायचे, विचारायचे त्याबद्दल टिपणे लिहून घेऊन येत नि ती चिठ्ठी हातात ठेवूनही कुणाला दिसू देत नसत. कधी वायफळ गप्पा नाहीतच. त्यांनी अघळपघळ वाटणारे काही बोलले तर त्यात ऐकणाऱ्या माणसाला हरभऱ्याच्या झाडावर चढविण्याचा उद्देश तर असेच; पण त्यामधून आपले इच्छित कार्य कसे साधायचे याचे उद्दिष्ट त्या कधीही विसरत नसत. ताईसाहिबांच्या या अष्टावधानी बुद्धीचा साक्षात्कार छोटया वकीलसाहेबांना दावा दाखल करायच्या पूर्वीच पहावा लागला होता. कारण ताईसाहेबांनी सगळी सूक्ष्मबूक्ष कामास आणून त्या वकिलाच्या आर्त पीडितांबद्दलच्या कळवळयाचे यथोचित स्तुतिगान करीत, आईसाहेबांच्या पूर्ववैभवाची व सध्याच्या लाचारीच्या परिस्थितीची माहिती वकीलसाहेबांना केविलवाण्या भाषेत सांगत, वकिलाच्या फीचे करारपत्र वकिलाकडून केव्हा लिहवून घेतले ते वकिलाला कळलेच नाही–जाणवलेच नाही. पुढे पुष्कळ दिवसांनी छोटया वकीलसाहेबांनी त्या करारपत्राची तपासणी केली तेव्हा कळले की, सरदारीणबाईसाहेबांच्या दाव्याच्या मूल्यांकनानुसार तर दूरच राहिले, डिक्री झाल्यानंतर जे मूल्यांकन दिसले त्याच्या हिशेबाने करारपत्रातील फीचा आकडा टक्केवारीमध्ये रुपयाला अर्धी पैच्या हिशेबानेदेखील कमी पडणारा होता आणि त्या फीच्या आकड्यानुसार वकीलसाहेबांना प्रारंभिक न्यायालयातच काय, पण कोर्टाच्या अपिलामध्ये व सर्वोच्च न्यायालयामध्येही काम करावे लागले असते आणि म्हणूनच ताईसाहेबांनी मोठ्या मिनतवारीने करारपत्रामधल्या फीची एकतृतियांश रक्कमच छोटया वकीलसाहेबांच्या हातावर ठेवली होती! असो. छोटे वकीलसाहेब त्या वेळी आपल्या धंद्याच्या एका कामाच्या मोठेपणाने नि ज्या

पक्षकाराला कुणी मदत करायला उभे रहात नव्हते त्या पक्षकाराला आपण मदत करीत आहोत या विचाराने धुंद झाले होते व वकील-साहेबांनी आपल्या जिद्दीच्या नशेमध्ये एका शुभदिनी सरदारीण-बाईंचा दावा सक्षम न्यायालयात दाखल केला. पुढे प्रत्येक तारखेवर त्या दाव्याचे काम ते वकील स्वतःच्या कचेरीत कधी कधी मिळणाऱ्या ताईसाहेबांच्या सल्ल्याने अथवा मदतीने परंतु न्यायालयात मात्र प्रत्येक तारखेवर करायचे ते काम एकट्याने करू लागले होते; पण विरुद्ध बाजूने कोण कोण येणार याचा अंदाज वकीलसाहेबांना पहिल्या तारखेवरच लागला होता.

कारण दाव्याचा जबाब न्यायालयात दाखल झाला तो भारतीय शासनाच्या अॅटर्नी जनरलसाहेबांच्या सहीने आणि कोर्टात प्रत्यक्ष काम चालवायला येऊन उभे राहिले ते संस्थानी सरकारचे शासकीय वकील असलेले पण पुढे राजप्रमुखांचेही व्यक्तिगत—पर्सनल वकील म्हणून काम करीत असलेले अॅडव्होकेट व त्यांच्या मदतीला स्थानीय बाररूममधले दोन ज्येष्ठ नि श्रेष्ठ वकील आणि त्यांच्याबरोबर येणारी ज्यूनियर वकिलांची फौज ! या दाव्याचे हे स्वरूप बघताच छोटचा वकीलसाहेबांना लगेच सरदारीणबाईसाहेबांच्या अगदी पहिल्या भेटीतल्या पहिल्याच प्रश्नाची आठवण झाली यात नवल नव्हते. त्या दिवशी सरदारीणबाईंनी वकीलसाहेबांना नव्हते का विचारले की, 'आमच्या महाराज सरकारांविरुद्ध...दावा करायची—लढायची हिंमत कराल का आपण ?' सरदारीणबाईंचा अंदाज काडीमात्र चूक नव्हता—पैमात्रदेखील चूक नव्हता. प्रतिवादी सरदार-साहेबांच्या बचावासाठी राजप्रमुखांच्या राजवाड्यातले हुजरे-हलकारे-सुद्धा धावपळ करीत होते आणि बचावखर्चासाठी महाराजसरकारांच्या खाजगी खजिन्यातले रुपयांचे तोडे व थैल्या शेकड्यांनीच काय हजारांनी मोजले जात होते—दिले जात होते !

दाव्याचे काम संस्थानी राजधानीच्या शहरी दिवाणी जिल्हा न्याया-लयामध्ये चालले. जिल्हा न्यायाधिशाच्या खुर्चीवर त्या दिवसात जे गृहस्थ विराजमान होते ते पूर्वी एका छोटचाश्या संस्थानामध्ये 'सरन्यायाधीश' म्हणून काम करीत होते; पण भारतीय स्वातंत्र्या-नंतर झालेल्या संस्थानी संविलियनात्मक कार्यवाहीम मोठ्या संस्थानी संघीय राज्यामध्ये केवळ जिल्हा न्यायाधीशपदावर काम करण्याच्या श्रेणी—योग्यतेचे ठरले होते. त्यांच्या हाताखाली सरदारीणबाईसाहिबांच्या दाव्याचे काम सुमारे तीन वर्षे चालले—रीतसर चालत राहिले. आक्षेप घेण्यासारखे काही घडत नव्हते. दरमियानी अपील—रिव्हिजन करण्याची आवश्यकता पडली नव्हती. दाव्याची गाडी हळू हळू पुढे सरकत होती. चौकशी—योग्य वादप्रश्नांची जुळवाजुळव झाल्यावर वादिनीसाहिबांच्या वतीने प्रथम इतर स्थानिक साक्षीदारांच्या साक्षी झाल्या. त्या संपल्यावर आपली स्वतःची साक्ष देण्यासाठी म्हणून वादिनी सरदारीणबाईसाहिबांना संस्थानी राजधानीच्या शहरी यावे लागले. एका अंधाऱ्या रात्री गुपचूप पडद्यामधे संस्थान सोडून पळून गेलेल्या सरदारीणबाई त्यांच्या नियोजित दत्तकमुलाच्या ग्वाहीने सरदार बनलेल्या प्रतिवादीविरुद्ध दाखल केलेल्या दाव्यात स्वतःची साक्ष देण्यासाठी म्हणून राजधानीच्या शहरी परत आल्या नि एका हितसंबंधी नातेदाराकडे उतरल्या खानदानी पडद्याच्या सबबीवर त्यांची साक्ष त्यांच्या उतरल्या घरीच नोंदविण्याची परवानगी मिळून जिल्हा न्यायाधीशमहोदय त्या घरी गेले. त्यांच्यासमोर वादी सरदारीणबाईंची साक्ष छोटचा वकील-साहेबांनी स्वतः उभे राहून जिल्हा न्यायाधीशांसमोर नोंदविली. सरदारीणबाईसाहेबांची अदब पाळण्यासाठी म्हणूनच की काय, छोटचा वकीलसाहेबांच्या मदतीला उभे राहिलेले मोठे वकीलसाहेब त्या दिवशी वादिनी बाईसाहेबांची साक्ष नोंदविताना त्या घरी येऊन खुर्चीवर बसले होते. सारे काम अर्थातच छोटचा वकीलसाहेबांनाच करावे लागले. सरदारीणबाईसाहेबांची उलट तपासणीही कसून झाली. सारी साक्ष नोंदविताना सरदारीणबाईसाहेबांनी आपला सगळा खानदानीपणा, तडफ, चीड, संयम नी मुत्सद्दीपणा सगळ्या उपस्थित मंडळींना जाणवायला लावून दाखविला होता. ते सर्व बघताना, अनुभवताना न्यायाधीशमहोदयांनीदेखील बाईसाहेबांची सारी साक्ष थक्क होऊन मुकाट्याने नोंदवून घेतली होती आणि साक्षनोंदणी संपवून परत जाताना अनवधानानेच की काय न्यायाधीशमहोदय आपले पद विसरून बाईसाहेबांना 'मुजरा अर्ज' करून गेले होते ! त्या दिवशी प्रतिवादी सरदारसाहेबांनी मात्र तेथे येऊन वादिनी बाईसाहेबांसमोर उभे राहावयाची पाळी येऊ न देण्याची काळजी घेतली होती.

त्यानंतर रीतसर प्रतिवादीकडला पुरावा झाला. संस्थानी चालीरीतींचे नियम आणि प्रथा सांगण्यासाठीच संस्थानी अम-दानीतल्या जागीरविभागाचे निवृत्त अधिकारी न्यायालयात येऊन साक्ष देऊन गेले व महाराजसरकारच्या 'फरमानाची' मीमांसा सांगून गेले. इतरही लहान-मोठे साक्षीदार, राजवाड्याशी काही ना काही संबंध असलेले म्हणून, प्रतिवादीसाहेबांचे हितचिंतक म्हणून साक्ष देऊन गेले. त्यामध्ये प्रतिवादीचे हितचिंतक धूर्तही एक-दोन आले होते. सगळ्या साक्षीदारांची साक्ष झाल्यावर शेवटी प्रतिवादी सरदारसाहेबही न्यायालयात येऊन साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभे राहून स्वतःतर्फे साक्ष देऊन गेले. साक्षीच्या सुरुवातीस त्यांच्या नव्या सरदारीची, ताज्या श्रीमंतीची ऐट प्रतिवादी सरदारसाहेबांच्या चेहेऱ्यावर सगळ्यांना दिसली; पण सरदारी वाड्याचा ताबा घेताना झालेल्या बेकायदेशीर बाबींबद्दल उलटतपासणीमध्ये उत्तरे देताना मात्र सरदारसाहेबांची सारी ऐट, अकड, तेज, तडफ, कोठच्या कोठे नाहीशी झाली होती नि स्वतः सरदारसाहेब काळवंडलेल्या चेहेऱ्याने, खाली मान घालून न्यायालयातून निघून गेले होते. या दिवशीही मोठ्या वकीलसाहेबांनी स्वतः न्यायालयात येण्याची कृपा केली नव्हती व सारे काम छोटचा वकीलसाहेबांनाच करावे लागले होते.

दोन्ही पक्षांचा पुरावा नोंदवून संपला. वादविवादाकरिता म्हणून प्रतिवादी सरदारबाहेबांचे वतीने भारत सरकारचे त्या वेळचे सॉलि-सिटर जनरल महोदय येऊन तर्कनिवेदन करणार म्हणून जाहिराती झाल्या. त्यामुळे वादिनीचे छोटे वकील हादरले होतेच. पण त्याही-पेक्षा जास्त घाबरण्यासारखी गोष्ट होत असलेली छोटचा वकील-साहेबांच्या कानावर गुप्त रीतीने आली होती. असे बोलले जात होते-जिल्हाजजसाहेब राजवाड्यामधल्या पाटर्यांना हजर राहू लागले आहेत. राजवाड्यामधल्या हिरवळीवर टेनिस खेळायला जाऊ लागले आहेत...हे आणि ते ! न्यायाधिशासंबंधी उगीच वावड्या उठविणारे कुत्सित आणि असंतुष्ट लोक कमी नसतात हे जितके खरे, तितकेच

हेही खरे की न्यायाधिशाने न्यायपीठावर बसल्यावर जी जी पथ्ये पाळायला हवीत ती ती कसोशीने नि इमानेइतबारे पाळलीच पाहिजेत. त्या पथ्यांना कडवटपणाची चव किंवा तिखटपणाचा दर्प येऊ न देता ती पाळावी लागतात.

एकीकडे जजमहोदयाविषयींच्या वावड्या उठतच होत्या नि दुसरीकडे सरदारीणबाईसाहेबांच्या दाव्यात दिल्लीचे सॉलिसिटर जनरलसाहेब जिल्हा जज्जसाहेबांसमोर येऊन आर्ग्यूमेंट करून गेले तरी वावड्या उठणे चालूच राहिले. जिल्हा जजसाहेबांकडून निर्णय घोषणा व्हायला वेळ लागू लागला नि वावड्यांचा आक्रोशही तीव्रतर होऊ लागला; परंतु सरदारीणबाईसाहेबांच्या भाग्यानेच म्हणावयाचे, त्याच दिवसात हैदराबाद राज्यातील उच्च न्यायालयासमोर निकालात निघालेली एका बेगमेची केस लॉ रिपोर्टरमध्ये प्रसिद्ध झाली ! त्या केसमध्ये राजाने किंवा अधिकाऱ्याने द्यावयाच्या कार्यकारी आज्ञा व न्यायनिर्णयाच्या आज्ञा यांमधील फरक स्पष्ट करून दाखविला होता. त्याचा फायदा सरदारीणबाईसाहेबांच्या दाव्यामध्ये मिळू शकत होता. राजाचा शब्द म्हणजेच कायदा हा सुलतानी अर्थ न्यायव्यवहारशास्त्राला संमत नव्हता. राजाने करावयाचा न्यायनिर्णय न्यायदानाच्या मूलभूत सिद्धान्तानुसार दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून व गंभीर विचारात घेऊन व त्यावर प्रचलित न्यायसिद्धान्तानुसार अनुसरण करून करावयास हवा. तसेच राजाच्या कार्यकारी आज्ञादेखील कुणाही प्रजाजनाच्या कायदेशीर व व्यक्तिगत हक्कांना धक्का देणाऱ्या अथवा नुकसान पोचविणाऱ्या नसल्या पाहिजेत, वगैरे अनेक प्रश्न निरनिराळ्या भारतीय उच्च न्यायालयांसमोर चर्चिले जाऊ लागले होते; परंतु न्यायालयांमधून न्याय मिळेल की नाही याचीच शंका उत्पन्न होऊ लागली म्हणजे काय करावयाचे ? पुन्हा येथे, पावसाने झोडले, राजाने मारले, फिर्याद कुणावर करावयाची ? असा प्रसंग येऊ पाहात होता. येथेही वादिनी सरदारीणबाईसाहेबांच्या भाग्याने त्याच दिवसात न्यायविभागामधले महाराजसाहेबांचे सल्लागार, पूर्वी वर्णन करून सांगितल्या संदर्भाने तिसऱ्या क्रमांकाचे खानदानी चालीरीती पाळणारे परंतु प्रजातांत्रिक शासनाची पथ्ये पाळीत माणुसकीची बूज ठेवणारे तसेच राजाला कुणाचाही वारसाहक्क ठरविण्याचे हक्क किती व कसे आहेत व ते कसे वापरायला हवेत हे निर्भीडपणे सांगणारे सज्जन उच्च न्यायालयामध्ये सरन्यायाधीश पदावर पोचले होते. त्यांच्या कानावर जिल्हा जज्जसाहेबांसंबंधीच्या या वावड्या पोचल्या ! कशा, ते कोण जाणे ! आपल्या अधिकाराखाली न्यायदानाचे काम करणाऱ्या न्यायाधिशांनी कसे वर्तन ठेवावे याकडे लक्ष ठेवण्याचा व त्यासंबंधात उचित व आवश्यक निर्देशन करीत राहाण्याचा सरन्यायाधिशांना अधिकार होताच. त्यांनी तो विनाविलंब व निर्भीडपणे वापरला. त्यांनी काही तरी निमित्त काढून जिल्हा जजमहोदयांना एके दिवशी आपल्या विश्रान्तिकक्षेत बोलावून जजमहोदयांनी न्यायदानाच्या कामात पाळावयाच्या पथ्यांची आठवण करून दिली व 'सीझरच्या बायकोला सुद्धा संशयाचा कावळा शिवलेला चालणार नाही,' हेही सुचवले. 'माझ्या हाताखालील न्यायाधीशाबद्दल लोकांमध्ये प्रवाद पसरणे मला मुळीच खपणार नाही !' अशीहि परखडपणे जजमहोदयांना समज दिली. असे कळले ! सरदारीणबाई माता अंबिकाभवानीच्या आराधनेत आपले धैर्य संभाळीत होत्या. नि त्यांच्या वतीने काम पाहाणाऱ्या ताईसाहेबांचा धीर सुटून त्या आपल्या छोट्या वकीलसाहेबांना रोज नवनव्या वावडीच्या बातम्या देत होत्या व छोट्या वकीलसाहेबांचे डोके उठवीत होत्या. ताईसाहेबांनी मोठ्या वकीलसाहेबांकडे जाऊन त्यांच्या कानांवरही या वावड्या घालाव्यात असे सुचविले गेले. तर तसे करायला ताईसाहेबांचा डिप्टी कलेक्टरीपणा आडवा येत होता व पाहुण्याच्या हातून साप मारला जाण्याचे धोरण त्या सांभाळीत होत्या ! छोटे वकीलसाहेब पक्षकाराच्या भाग्याला नि 'हमरी लाज राखो गिरधारी !' ची हाक ऐकणाऱ्या द्रौपदीच्या भावाला कौल लावीत दैनंदिनी कामात येणारा दिवस व्याकूळ मनाने ढकलीत होते !

देवाने हाक ऐकली ! आर्ताची व्यथा साधुसज्जनांना कळली. कोणाच्या का स्फूर्तीने होईना, जिल्हा जजमहोदयांनी आपला निर्णय घोषित केला. वादिनी सरदारीणबाईसाहेबांचा दावा डिक्री झाला. महाराजांनी जागिरीच्या नामान्तराबद्दल दिलेल्या आज्ञेची फिरवाफिरव करण्याचे दोन कारणास्तव जजमहोदयांनी नाकारले. कारण एक तर, राजाला तसा जागीर काढून घेण्याचा व ती दुसऱ्याला देण्याचा अनिर्बंध अधिकार होता. मग फरमानाचे–राजाज्ञेचे शब्द कसेही असोत; परंतु नामान्तराने मयताचे आडनाव मिळालेला मुलगा मयताचा वारस किंवा त्याच्या संपत्तीचा अधिकारी होऊ शकणार नाही, असे ठरविले ! प्रतिवादी सरदारांना मयताच्या खाजगी संपत्तीमधला राहाता वाडा, त्यालगतची दुकाने, सिनेमा थिएटर आणि इतर स्थावर–जंगम खाजगी मालमत्ता–पैसाअडका इत्यादि संपत्ती वादकालीन लाभसंचितासहित वादिनी सरदारीणबाईंना परत करण्याची डिक्री देण्यात आली व इतरही आनुषंगिक आज्ञा दिल्या गेल्या ! वादिनी सरदारीणबाईंचा दावा प्रतिवादी नामांतरित सरदारसाहेबांविरुद्ध लाखांच्या मिळकतीने डिक्री झाला होता !

डिप्टी कलेक्टरी वृत्तीच्या ताईसाहेब मात्र चांदीच्या भल्या मोठ्या ताटात किनखापी आवरणाखाली झाकलेल्या पेढ्याचे मधले पाच कंदी पेढे छोट्या वकीलसाहेबांना देऊन त्यांचे तोंड गोड करत्या झाल्या !

छोटे वकीलसाहेब त्याच आनंदात नि उत्साहात दुसऱ्या आर्तांची हाक ऐकत राहिले नि दुसऱ्या पीडितांची व्यथा दूर करण्यासाठी आपल्या व्यवसायात लक्ष घालीत राहिले, नि सर्वांना सांगत राहिले की, 'स्वतंत्र भारतात' हम करे सो कायदा !' ही अधिकारवाणी ऐकली जाणार नाही, मानली जाणार नाही ! पण त्यासाठी न्यायपीठ, सोवळे, निष्पक्ष नि निर्भीड राखायला हवे, रहायला हवे !' □

---

१ जुलैचा बरसात विशेषांक वाचकांच्या नजरेसमोर आहेच.
राजकपूरच्या चित्रपटांचा स्वतंत्रपणे आणि चार्ली चॅप्लिनच्या पार्श्वभूमीवर विचार करणारे दोन लेख
या अंकात पृष्ठ २३ ते २६ वर दिले आहेत.
या लेखांवर वाचकांच्या काही प्रामाणिक प्रतिक्रिया असू शकतील.
२५ जुलैपर्यंत वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया मोजक्या शब्दांत पाठवाव्यात.
उल्लेखनीय प्रतिक्रियांना प्रसिद्धी देण्यात येईल.

अडथळयांची बाईनाही जाणीव असून स्वतःचा कायदेशीर बचाव करण्याचे शिकस्तीचे प्रयत्न करीत असतानाच आपल्याला अटक अथवा शिक्षा झालीच तर त्याविरुद्ध वावटळ उठविण्याची तयारीही त्यांनी चालविली आहे. ◻

## ◻ दारुबंदीविरुद्ध लोकमत

पंतप्रधानांना दारुबंदी कितीही प्रिय असली तरी कायद्याने राष्ट्रव्यापी दारुबंदी करणे फारसे हितावह नाही असेच बहुसंख्य मंडळींना वाटते. असे वाटणाऱ्यांमध्ये जनता पक्षाची मंडळीही आहेत. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी तर असे स्वच्छच म्हटले आहे की, दारुबंदीतून फारसे काही निष्पन्न होत नाही असा अनुभव असला तरी मोरारजीभाई पंतप्रधानपदी आहेत तोपर्यंत ही योजना आग्रहपूर्वक राबविली जाईल आणि पुढे बारगळून पडेल ! जनता सरकारच्या दारुबंदी-धोरणाबद्दल सर्वसाधारण जनतेला काय वाटते याची चाचपणी 'ऑन लूकर' या इंग्रजी पाक्षिकाने केली. या चाचपणीमध्येही जनमत फार मोठ्या प्रमाणात दारुबंदीच्या विरोधात आहे ही गोष्ट स्पष्ट झाली आहे. यासंबंधी तयार करण्यात आलेल्या प्रश्नावळीला वाचकांनी खालीलप्रमाणे उत्तरे दिलेली आहेत :

प्रश्न : दारुबंदीची योजना ही चांगली आहे, अनावश्यक आहे का टाकाऊ आहे ?

उत्तर : या प्रश्नाला उत्तर देणाऱ्या मंडळींची टक्केवारी—दारुबंदी चांगली आहे ११%. ती वाईट आहे ५५% आणि ती अनावश्यक आहे ३४%.

प्रश्न : दारुबंदीमुळे प्यायची सवय सुटणे शक्य आहे काय ?

उत्तर : होय ७%. नाही ९३%.

प्रश्न : आणीबाणीपर्वामधील सक्तीच्या कुटुंबनियोजनाइतकी सक्तीची दारुबंदी वाईट आहे काय ?

होय ८०%. नाही १५%. पाच टक्के मंडळींनी याबाबतीत कोणतेच मत दिले नाही.

प्रश्न : दीर्घकालीन योजना म्हणून दारुबंदी राबविली गेली तर त्यापासून तोटयापेक्षा फायदे अधिक होतील काय ?

१३ टक्के लोकांनी फायदे अधिक होतील, असे मत नोंदविले आहे तर ८७% लोकांना ही योजना दीर्घकालीन योजना म्हणून राबविली तरी काहीही फायदे होणार नाहीत, असे वाटते.

प्रश्न : मोरारजी देसाई सत्तेवरून दूर झाल्यावर ही योजना बारगळेल असे आपणाला वाटते का ?

उत्तर : या प्रश्नाला अनेकांनी उत्तरच दिलेले नाही. ज्यांनी उत्तरे दिली त्यांपैकी १० टक्के लोकांना हे मोरारजीभाईंचे फॅड वाटते आणि त्यांच्याबरोबरच ते हवेत विरून जाईल असेही त्यांना वाटते. या संदर्भातील प्रश्नावलीमधील अखेरचा प्रश्न महत्त्वाचा असून जनता पक्षाच्या दारुबंदी धोरणाबाबत जनतेला काय वाटते यावर सुस्पष्ट प्रकाश टाकणाऱ्या प्रतिक्रिया या प्रश्नाच्या संदर्भात पहावयास मिळतात.

प्रश्न : दारुबंदीसारख्या साध्या गोष्टीचा बागुलबुवा केला आणि महत्त्वाच्या अनेक प्रश्नांकडे दुर्लक्ष केले म्हणून तुमच्या मनात जनता पक्षाबद्दल नाराजी आहे काय ? या प्रश्नाला उत्तर देणाऱ्या मंडळींपैकी ८७% लोकांनी या किरकोळ व तुलनेने दुय्यम असलेल्या प्रश्नाला फालतू महत्त्व दिले म्हणून जनता पक्षाबद्दल आपली नाराजी व्यक्त केली. जनता सरकारचे मूल्यमापन करताना केवळ ६% लोकांनी या प्रश्नावरून आपण जनता सरकारची कार्यक्षमता जोखीत नाही, असे सांगितले.

कदाचित असे वाटण्याचा संभव आहे की, दारुबंदीविरुद्ध एवढे प्रखर मत नोंदविले गेले तेव्हा प्रश्नावलीला उत्तर देणारी बहुतेक मंडळी दारुबाज असावीत असा समज होऊ नये म्हणून याबाबतची आकडेवारीही प्रसिद्ध करण्यात आली आहे. या आकडेवारीप्रमाणे ३७% लोकांनी आपण अजिबात पीत नसूनही दारुबंदीचा प्रश्न सामाजिक महत्त्वाचा वाटल्याने त्याबद्दल मत नोंदविले आहे. १५% लोकांनी आपण रोज दारू पीत असल्याने आपल्याला या प्रश्नाचे असाधारण महत्त्व वाटत असल्याचे कबूल केले आहे. इतरांपैकी ४८% लोकांनी आपण आठवड्यातून एखादे वेळी दारू पीत असल्याची कबुली दिली आहे.

दारुबंदी हा जिव्हाळ्याचा प्रश्न वाटत असल्याचे सर्वांनी कबूल केले असून मगच या प्रश्नाबाबत आपले विचार व्यक्त केले आहेत. कायद्याने तुम्ही एखाद्याला दारू पिण्यापासून परावृत्त करू शकत नाही असेच बहुसंख्य मंडळींना वाटत असल्याचेही या चाचपणीमध्ये स्पष्ट झाले आहे. पंतप्रधान मोरारजीभाई दारुबंदीमुळे देशाचे कल्याण होईल असे कितीही आग्रहाने सांगत असले तरी या चाचपणीवरून जनतेला पंतप्रधानांचे या संदर्भातील मत मंजूर नाही, असेही दिसून येते. येत्या चार वर्षांत देशभर दारुबंदी लागू करण्याच्या कल्पनेबाबतही लोकांचा विरोध दिसतो. अशा प्रकारच्या दारुबंदीतून काहीही निष्पन्न होणार नाही, असे बहुसंख्य नागरिकांना वाटते. प्रश्नावलीला आलेली काही मासलेवाईक उत्तरेही नोंदण्यासारखी आहेत.

एस्. सी. रॉय ( मुंबई ) दारुबंदीचा पुरस्कार करावा, प्रचार करावा आणि दारू पिण्याविरुद्ध लोकमत तयार करावे; तथापि दारुबंदीसाठी कायदा करणे मात्र मला साफ नामंजूर आहे.

कुमार व्ही. पारखी ( पुणे )—विचारण्यात आलेले प्रश्न संदर्भहीन आणि आचरटपणाचे आहेत. दारुबंदीबाबत एकटया मोरारजीभाईंना कशासाठी जबाबदार धरायचे ? कै. महात्मा गांधींनीही दारुबंदीचा जोरदार पुरस्कार केला होताच की. दारुबंदी आणि सक्तीचे निर्बीजीकरण यांची तुलनाच होऊ शकत नाही. या सक्तीच्या निर्बिजीकरणाने हजारो निष्पाप, अविवाहित व्यक्तींचे जन्माचे नुकसान केले आहे. दारुबंदी आली तर असला काही दुष्परिणाम पहायला मिळणार नाही ना ? तथापि या महत्त्वाच्या प्रश्नावर सर्वसाधारण नागरिकांची

प्रतिक्रिया अजमावण्याचा प्रयत्न खचितच चांगला आहे.

दारुबंदीबाबतच्या या प्रतिक्रिया प्रातिनिधिक स्वरूपाच्या समजण्यास हरकत नाही. या प्रतिक्रिया अगदी पंतप्रधानांपर्यंत जाऊन पोचल्या तरी त्याची ते दखल घेतील, असे वाटत नाही. कारण नसबंदीमुळे जसे इंदिरा सरकार गेले तसे दारुबंदीमुळे आपले सरकार गले तरी हरकत नाही, इतकी ताठर भूमिका पंतप्रधानांनी या प्रश्नाबाबत घेतली आहे. त्यांची देशव्यापी दारुबंदी करण्याची कितीही इच्छा असली तरी या प्रश्नाबरोबरच जे आर्थिक प्रश्नही गुंतले आहेत त्यामुळे, तसेच विविध राज्यांनी या प्रश्नाबाबत स्वीकारलेल्या धोरणामुळे दारुबंदीची देशव्यापी कठोर अंमलबजावणी ही एक कठीणच गोष्ट दिसते. □

## असे ऐकिवात आहे की . . .

□ □ सध्या ज्यांची फारशी बातमी नाही त्या शेर-ए-काश्मीर शेख अब्दुल्ला यांचे ज्येष्ठ चिरंजीव फरुक संसदेमध्ये येऊ इच्छितात. आता ते राज्यसभेची सुखासीन जागा निवडतात का निवडणुकीच्या धामधुमीत उतरून लोकसभेमध्ये प्रवेश करतात, हे अद्यापि ठरायचे आहे. दिल्लीला येऊन शेर-ए-काश्मीर नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस या संस्थेचे काम व्यवस्थितपणे चालू करून देण्याची त्यांची इच्छा आहे. उच्च पातळीवरील लोकांशी नजीकचा संबंध आल्यावरच हे शक्य आहे असे त्यांना वाटते. दिल्लीत येऊन एका मेडिकल इन्स्टिटयूटच्या कारभारात लक्ष घालू इच्छिणाऱ्या फरुकमियांचा या विभागाशी चांगलाच संपर्क आहे. कारण सध्याही पंधरा कोटी रुपयांची योजना असलेले एक मेडिकल संशोधन केंद्र आणि त्याला संलग्न असलेले महाविद्यालय यांची सूत्रे फरुकमिया संभाळतात. अर्थात केवळ याच विषयात कार्य करायचे असते तर त्यासाठी काही श्रीनगर सोडण्याची गरज नव्हती. ते दिल्लीला संसद-सदस्य म्हणून येऊ इच्छितात याचाच अर्थ राजकीय क्षेत्रातही काम करण्याची त्यांची इच्छा आहे. त्यांचे पिताजी शेख अब्दुल्ला आता पुरेसे वृद्ध आहेत आणि त्यांना हृदयविकारासारखे दुखणे आहे, या गोष्टीही येथे लक्षात घेतल्या पाहिजेत. □

□ □ जम्मु-काश्मीरमधील राजकीय परिस्थितीत बदल होत असून जनता पक्षाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर यांच्या काही निर्णयामुळे कदाचित पुनर्रचनेलाही चालना मिळेल. पंतप्रधानांवर कठोर टीका करणारे शमीम अहमद शमीम आणि ए. जी. लोन या नेत्यांना पक्षाच्या प्रादेशिक हंगामी समितीवरून दूर करण्यात आले आहे. पंतप्रधान आणि पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांचे सध्याचे जिव्हाळ्याचे संबंध आणि जम्मू–काश्मीरमधील जनता पक्षाचे निमंत्रक मौलाना सयिद मसुदी यांचा सल्ला या दोन गोष्टींमुळे हा निर्णय घेण्यात आला असावा असे दिसते. ज्या नेत्यांना हंगामी समितीवरून दूर करण्यात आले आहे त्यांपैकी लोनसाहेबांनी शेख अब्दुल्ला आणि मिर्झा अफजल बेग यांच्याशी खलबते सुरू केली आहेत, तर शमीमसाहेबांनी लेख लिहिण्याचा तडाखा चालविला आहे. □

□ □ चौधरी चरणसिंग यांच्या आजाराबद्दल जशा अनेक वार्ता आहेत; तशाच चौधरीसाहेब दिल्लीपासून वीस मैलांवर का जाऊन राहिले आहेत, याबाबतही विविध स्वरूपाच्या वार्ता आहेत. त्यांपैकी एक अशी की, त्यांचे तांत्रिक सल्लागार चंद्रस्वामीमहाराज यांनी दिलेला सल्ला प्रमाण मानून चरणसिंग नव्या दिल्लीच्या कक्षेबाहेर गेले आहेत. असे केल्याने त्यांच्या राजकीय शत्रूंच्या तांत्रिकांमार्फत ज्या कारवाया केल्या जातात त्यांचा प्रभाव पडणार नाही. याच चंद्रस्वामीमहाराजांनी चरणसिंग आजारी पडल्यावर त्यांना हॉस्पिटलमधील कोणत्या खोलीत ठेवावे याबाबतचा निर्णय घेतला होता आणि तो मानला गेला. आजारी गृहमंत्र्यांना ज्या वेळी हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले त्या वेळी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेसच्या महत्त्वाच्या व्यक्तींसाठी राखून ठेवलेल्या वॉर्डमधील एका खोलीत एका खासदार रुग्णाची सोय करण्यात आली होती. तथापि गृहमंत्र्यांच्या तांत्रिक सल्लागारांनी त्याच खोलीत गृहमंत्र्यांवर उपचार करण्यात यावेत असा आग्रह धरला आणि तो मानण्यात आला. याच स्वामीजींच्या सल्ल्यावरून गृहमंत्री दिल्लीपासून वीस मैलांवर असलेल्या सूरजकुंड येथे गेले. रुग्णांनी विश्रांती घ्यावी असे काही हे ठिकाण नव्हे; हे पण येथे नमूद केले पाहिजे. गृहमंत्र्यांचा नेमका आजार काय याबाबतही विलक्षण गुप्तता पाळण्यात येते. त्यांची चित्रेही एका विशिष्ट बाजूने घेतलेली असतात. जाणकारांच्या मते गृहमंत्री हृदयविकार आणि अर्धांग या दोन्हींमुळे संत्रस्त झाले आहेत असे असले तरी त्यांची राजकीय महत्त्वाकांक्षा प्रखर आहे. काहीही कारण नसताना इंदिराजींवरील त्वरित कारवाईबाबत त्यांनी जे पत्रक काढले त्यामागे त्यांचे राजकारण असले तरी, गृहमंत्र्यांनी स्वतःच्याच कक्षेमधील विषयाबाबत टीका करणारे पत्रक काढावे या गोष्टीचे बाहेर जरी हसे झाले तरी मंत्रिमंडळाने विशेषतः पंतप्रधानांनी गृहमंत्र्यांच्या या पत्रकाची गंभीरपणे दखल घेऊन कॅबिनेटची तातडीने बैठक बोलाविली. चरणसिंग आणि राजनारायण या बैठकीला हजर नव्हते; परंतु उपस्थितांनी पंतप्रधानांनी या संदर्भात त्यांना योग्य वाटेल तो निर्णय घ्यावा असा एकमुखी निर्णय दिला. मात्र पंतप्रधान लगेच कठोर झाले आणि चौधरी चरणसिंग यांनी राजीनामा द्यावा अशी विनंती करणारे पत्र त्यांनी चौधरीसाहेबांना पाठविले आहे. जनता पक्षांतर्गत असे एक फार मोठे वादळ उसळले आहे, अशी प्रतिक्रिया एका ज्येष्ठ मंत्र्याने नोंदविली आहे. चौधरीसाहेब काय करतील ते खरे प्रश्नचिन्ह आहे. उत्तर भारतात आणि विशेषतः उत्तर प्रदेशामध्ये ज्याची मिरासदारी आहे अशा नेत्याला हात लावणे वाटते तेवढे सोपे नाही. पंतप्रधानांनी एक निर्णायक धाडसी पाऊल उचलले आहे. चौधरी जनता पक्ष सोडतील असे वाटत नाही. त्याचे मुख्य कारण ज्या भालोदचे नेतृत्व घेऊन ते प्रथम जनता पक्षाचे उपाध्यक्ष आणि नंतर केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये गृहमंत्री झाले त्या भालोदचाही त्यांना पूर्ण पाठिंबा मिळणार नाही. खेरीज देशात रक्तहीन क्रांती घडवून आणणाऱ्या जनता पक्षाच्या संस्थापकांपैकीच चौधरीसाहेब एक आहेत. जनता पक्ष फोडल्याचे पाप स्वतःच्या शिरी ते घेणार नाहीत. तथापि त्यांची प्रबळ महत्त्वाकांक्षा आणि ढासळती तब्येत यांचा मेळ घालीत ते जनता पक्षामध्ये राहूनच काय करतील हे आता पहायचे. या निर्णयाने जनता पक्षाच्या घटकपक्षांचे महत्त्व पुसट होण्याला अप्रत्यक्ष मदत होईल. कारण मंत्रिमंडळामधील जागा जशा पूर्वी घटकपक्षांची ताकद लक्षात घेऊन वाटण्यात आल्या तशा त्या आता वाटण्यात येणार नाहीत असे दिसते. मंत्रिमंडळामध्ये आता कसे बदल होतात ही पण एक लक्ष ठेवून राहण्यासारखी बाब आहे. □

माणूस : १ जुलै : बरसात अंकात हे दोन लेख जागेअभावी समाविष्ट होऊ शकले नाहीत. गेल्या अंकातील लेखात राजकपूरच्या चित्रकारकीर्दीच्या उजळत्या बाजूचा विचार प्रामुख्याने केला आहे. त्याच्या मर्यादा, त्याच्या यशाचे रहस्य इ. गोष्टींचा विचार या दोन लेखांत केला आहे.

# राजकपूर

## भाबडा प्रेक्षकवर्ग आणि चलाख प्रसिद्धितज्ज्ञ यांनी निर्मिलेली दंतकथा

**शिरीष सहस्रबुद्धे**

राजकपूरच्या चाहत्यांमध्ये माझा समावेश नाही, हे शीर्षकावरून स्पष्ट व्हावं. राजकपूर (आणि अर्थातच त्याचा आजवरचा यश–लौकिक) हे एक जबरदस्त कोडं आहे, असं मात्र नेहेमी वाटत आलं आहे. अनेक कारणांनी. उदाहरणार्थ, सामान्य प्रेक्षकांचा अलोट असा पुनरावृत्त प्रतिसाद आणि वृत्तपत्रीय अथवा तदितर टीकाकारांची पसंती–प्रशस्ती ह्या दोन्ही गोष्टी एकसाथ मिळविण्याचं आणि दीर्घकाळ टिकवून धरण्याचं भाग्य फार थोडया कलाकारांना लाभतं. सत्यजित रायना ऐकीकडे त्यांच्या अनुपम दिग्दर्शकीय कर्तृत्वाबद्दल ऑक्सफर्डकडून सन्मान्य डॉक्टरेट दिली जाते आणि दुसरीकडे त्यांचा 'शतरंज के खिलाडी' मुंबई चित्रवर्तुळात वितरित होऊ शकत नाही, यांची सांगड कशी घालायची? सुदैवानं म्हणा किंवा अन्यान्य कारणांनी म्हणा, राजकपूरला पैसा आणि प्रतिष्ठा दोहोंचा लाभ झाला. स्वदेशातच नव्हे तर विदेशांमधूनही त्याच्या चित्रपटांनी महामूर लोकप्रियता मिळविली आणि देशविदेशी पत्रकार–समीक्षकांची मान्यताही प्राप्त केली.

देव आनंद हा राजकपूरचा समकालीन आणि प्रतिस्पर्धी आहे. त्यालाही लोकप्रियता लाभली; पण मानमान्यता? राजकपूर आणि त्याचं यश–लौकिक (आणि राजकपूरला त्याच्या या व्यावहारिक यशधनलौकिकापलीकडे काही दखलपात्र अस्तित्व आहे, असं वाटत नाही.) कोडयासारखे वाटतात ते यामुळेच. अर्थात या कोडयाचं उत्तर देणं मोठंसं अवघड आहे अशातला भाग नाही. लेखाच्या शीर्षकापासूनच हे उत्तर शोधायचाच माझा प्रयत्न आहे आणि 'राजकपूर ही भाबडा प्रेक्षकवर्ग आणि चलाख प्रसिद्धितज्ज्ञ यांनी संयुक्तरीत्या पत्करलेली दंतकथा आहे,' हे विधान हा या उत्तरातला एक महत्त्वाचा टप्पा आहे.

याचं सविस्तर स्पष्टीकरण करायला हवं. राजकपूरनं अमुक करायला हवं होतं आणि तमुक करायला नको होतं, या भाषेत बोलणं निरर्थकच आहे. मात्र त्यानं नेमकं काय केलं याचा परखड पण वास्तव शोध करण्यात काही गैर आहे, असं वाटत नाही. म्हणूनच हा प्रपंच.

धंदा म्हणून राजकपूरनं चित्रपट काढले, तरी त्याचं धंद्याचं गणित इतर काहीजणांसारखं (उदा. देवआनंद) सरळसाधं नव्हतं. सामान्य प्रेक्षकांना आवडतील आणि मनोरंजक वाटतील असे विविध घटक तर राजकपूरनं पेश केलेच (संगीत हे एक ठळक उदाहरण पुरावं.), पण त्याहीपलीकडे जाऊन स्वतःची एक विशिष्ट प्रतिमा प्रेक्षकांच्या मनात उमटविण्याची आणि सतत जपण्या–वाढविण्याची दक्षता त्यानं बिनचूक घेतली. त्याचे समकालीन असलेल्या इतर दोघा बडया नायकांपैकी दिलीपकुमारनं असा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचं दिसत नाही, तर देवआनंदनं आपली प्रतिमा केवळ 'एक देखणा सदाहरित तरुण' एवढयापुरतीच मर्यादित ठेवली. राजकपूरनं मात्र आपल्या त्या प्रतिमेला शारीरिक, बाह्य गुणवैशिष्टयांबरोबरच काही आंतरिक गुणविशेषही बहाल केले; (उदाहरणार्थ, एकीकडे कपडयांचा ढगळपणा तर दुसरीकडे स्वभावाचा अघळपघळपणा) आणि त्याहीवर जाऊन ही आपली प्रतिमा ऊर्फ 'राजू' हजारो सर्वसामान्य भारतीयांपैकी हा एक आहे, असा आभास प्रेक्षकांच्या मनावर सतत ठसवीत ठेवला आहे. किंबहुना 'राजू' ही राजकपूरची प्रतिमा नसून त्याच्या हजारो प्रेक्षकांपैकी कुणाही एखाद्याचीच प्रतिमा आहे, असा दृढ विश्वास प्रेक्षकांच्या अंतःकरणात निर्माण करण्यात त्यानं यश मिळवलं.

हे यश मिळविण्याचे त्याचे मार्ग दोन होते. एक : सामान्य भारतीय प्रेक्षकाला काबीज करण्याच्या नाना क्लृप्त्या आणि दोन : चलाख प्रसिद्धितज्ज्ञांचा सुयोग्य वापर. या दोहोंबद्दल सोदाहरण–सविस्तर लिहिणे शक्य असले तरी स्थलमर्यादेत इष्ट नाही. यातली एक महत्त्वाची क्लृप्ती म्हणजे भारतीय संस्कृती व धर्म यांनी पवित्र मानलेल्या प्रतीकांचा धंद्यासाठी वापर करणे. 'संगम' हे एक उदाहरण. 'जिस देश मे गंगा बहती है' हे आणखी एक आणि अधिक भयंकर. या चित्रपटाच्या कथानकात वस्तुतः गंगेला काडीइतकेही स्थान असण्याचे कारण नाही. कथा घडते ती चंबळेकाठी. मग उगीचच 'राजू' हा गंगापुत्र असल्याच्या बहाण्याने गंगेविषयीची गाणी, गंगाजी की कसम वगैरे आणाभाका असा भावनाकुल मालमसाला भरला आहे. काय बिशाद भाविक या महापुरात वाहून जाणार नाहीत? सत्यम् शिवम सुंदरम् हे या प्रयत्नमालिकेतलं ताजं उदाहरण; पण त्याबद्दल काही न बोललेलं बरं. 'बॉबी'सारख्या एखाद्याच चित्रपटात त्यानं ही संस्कृतीची 'कास' सोडण्याचा धोका पत्करला.

तर भाबडे भाविक आणि संस्कृतिसंरक्षक कंपू यांना गुंगविण्यासाठी सांस्कृतिक, धार्मिक भावुकतेची अफू चारल्यानंतर उरलेल्या अल्पसंख्यांक परंतु विचारशील प्रेक्षकांवर राजकपूरनं प्रसिद्धितंत्राचं अस्त्र सोडलं. आर. के. फिल्मसइतकी प्रभावी आणि प्रचंड प्रचारयंत्रणा आजवर इतर कुणाला उभारता आली असेल की नाही याबद्दल दाट शंका वाटते! सगळयात कहर म्हणजे त्याची 'शोमनशिप'ही सुद्धा प्रसिद्धिलायक गुणवत्ता ठरली आहे. इतर चित्रसंस्थांची / निर्मात्यांची प्रसिद्धीयंत्रणा आणि राजकपूरची यंत्रणा यात महत्त्वाचा फरक हा, की आर. के.च्या प्रसिद्धितज्ज्ञांनी केवळ गाणी, सेक्स, साहस, मनोरंजन इत्यादी चिल्लर वैशिष्टयांचीच जाहिरात करण्यावर समाधान मानलं

नाही, तर राजकपूरच्या चित्रपटांकडे बघण्याची एक खास दृष्टीच प्रेक्षकवर्गाला देण्याचा खटाटोप केला. आणि काही अंशी तो यशस्वीही झाला. उदाहरण देतो. राजकपूरचे चित्रपट सामाजिक वास्तववादाच्या अंगानं जाणारे आहेत, असा समज आपल्याकडे सर्रास रूढ झालेला दिसतो. वस्तुस्थिती अशी आहे की, राजकपूरनं जसा संस्कृतीचा तसाच समाजवाद वगैरेचाही चोख वापर रोख धंद्यासाठी केला; पण त्याच्या प्रचारकांनी मात्र त्याची प्रतिमा 'सोशॅलिस्ट', 'गरिबांची दु:खं मांडणारा कलाकार' अशी उभी केली. प्रत्यक्षात काय दिसतं तर 'जिस देश में गंगा बहती है' सारख्या एखाद्या चित्रपटात आपले राजूमहाशय डाकूंना 'तुम्ही सोशॅलिस्ट आहात का?' असं विचारतो. (या शब्दाचा खास राजूछाप लाडिक उच्चार चोचलिस्त असा असतो.) या पठ्ठ्याला सोशलिस्ट माहीत आहे; पण आपले परंपरागत डाकूबंधू नक्की काय काम करतात हे म्हणे ठाऊक नाही! अर्थात प्रेक्षक मात्र राजूच्या तोंडी चोचॅलिजम ऐकल्यानंतर करकचून शिट्टी घालतो आणि राजकपूर व त्याच्या प्रसिद्धितज्ज्ञांचं काम सोपं होतं. पुन्हा गंमत अशी आहे की, स्वतः राजकपूरनं आपल्याच प्रसिद्धितज्ज्ञांचा आणि चाहत्यांचा मुखभंग वारंवार केलेला आहे. आपण सामाजिकदृष्टया सतर्क आणि वास्तववादी चित्रपट काढतो असा दावा त्यानं सहसा केलेला नाहीच; पण 'सपनों का सौदागर' प्रदर्शित होण्याच्या सुमारास केव्हा तरी दिलेल्या एका मुलाखतीत तर 'We film-makers are Dream-sellers' अशी आपली स्वप्नरंजनवादी भूमिका त्यानं स्पष्टपणे मांडली होती. आमचा भोळसट प्रेक्षक मात्र त्याच्यापेक्षा त्याच्या प्रचारकांवर अधिक विश्वास टाकून राजकपूरच्या तथाकथित सामाजिक बांधिलकीचं गुणगान गात आला आहे. अर्थात आपल्याला पलायनवादी करमणूक आवडते हे मान्य करण्यापेक्षा राजकपूरचे आपल्याला आवडणारे सिनेमे ही पलायनवादी करमणूक नव्हेच मुळी, असं म्हणून स्वतःची फसवणूक करणं आपल्या प्रेक्षकाला जास्त आवडतं, हेही तितकंच खरं.

राजकपूरच्या प्रसिद्धितज्ज्ञांची चलाखी आणि आपल्या प्रेक्षकवर्गाचा भाबडेपणा (किंवा आत्मवंचनेची वृत्ती) यांच्या संयुक्त कर्तबगारीचं एक उदाहरण देण्यासारखं आहे. सर्वसामान्य धंदेवाईक हिंदी चित्रपटात सेक्सचा जेवढा वापर होतो त्यापेक्षा तो राजकपूरच्या चित्रपटात यत्किंचित कमी होत नाही. उलट त्याच्या चित्रातला सेक्स तत्कालीन प्रथेच्या पुढेच जाणारा असतो आणि दृश्यांची संख्या व लांबीच्या दृष्टीनं कमी असला तरी जास्त धीट व ठोस (bold & concentrated) असल्यानं अधिक प्रक्षोभक असतो. (उदाहरणार्थ, आपल्या नायिकेला बेदिंग सूटमध्ये थोड्या वेळात तपशीलवार दाखविण्याचा त्याचा छंद) आता सर्वसाधारण चित्रनिर्माता आपल्या चित्रपटातल्या 'अशा' दृश्यांची खास जाहिरात करण्याच्या मागे असतो. राजकपूरनं मात्र 'माझ्या चित्रात सेक्ससाठी सेक्स कधीच नव्हतो. माझ्या चित्रातल्या सेक्सला कलात्मक उंची असते आणि म्हणून त्याकडे स्वस्त मनोरंजन या दृष्टीनं न पाहता कलात्मक दृष्टिकोनातून पहा,' अशा स्वरूपाची प्रसिद्धी नेहमी केली आणि करविली. 'सत्यम् शिवम् सुंदरम्'च्या बाबतीत थेट हेच घडून राहिलं आहे. साहजिकच आपण उघडा–वाघडा सेक्स पाहण्यासाठी जात नसून कलात्मक उंची गाठणारा प्रणय वगैरे पहायला जात आहोत अशी स्वतःची समजूत करून घेणं प्रेक्षकाला सोपं जातं आणि चित्रपटाचा लोकाश्रय वाढतो.

असो. चित्रनिर्माता–दिग्दर्शक–अभिनेता म्हणून राजकपूरच्या कारकीर्दीच्या आणखीही अनेक पैलूंवर टीकाटिप्पणी करता येणं शक्य आहे. तथापि तो मोह विस्तारभयास्तव आवरून एवढंच म्हणतो की, राजकपूरच्या या त्रिविध भूमिकांमधली निर्मात्याची भूमिकाच काय ती समाधानकारकरीत्या वठविली गेली आहे. अर्थात समाधानही व्यावसायिकच आहे, कलात्मक नव्हे. म्हणजे एवढंच की, राजकपूरचे धंदेवाईक चित्रपट हे अन्य काही निर्मात्यांच्या धंदेवाईक चित्रपटांच्या तुलनेने काहीसे कमी ओंगळ, कमी ओबडधोबड आणि कमी रासवट होते. धंदा करण्याची त्यांची पद्धत, त्या दृष्टीने झालेली त्यांची जडणघडण इतरांपेक्षा अधिक दर्जेदार, अधिक डौलदार आणि अधिक सभ्य–सुसंस्कृत होती. राजकपूरनं पलायनवादी मनोरंजन द्यायचं ठरविलं तर त्याला आक्षेप कोण आणि कसा घेणार? एवढाच मुद्दा की त्या पलायनवादी मनोरंजनाला सामाजिक वास्तववादाचा किंवा कलात्मकतेचा मुलामा चढविण्याचा प्रयत्न केला जाऊ नये.

दिग्दर्शक आणि अभिनेता म्हणून राजकपूरच्या पदरी फार मोठं श्रेय बांधता येईल, असं वाटत नाही. कारण काटेकोर हाताळणीसारखा एखादा गुण त्याच्यातल्या दिग्दर्शकामध्ये आहे तसाच पुनरावृत्तीचा दोषही आहे. कथेचा ठराविक फॉर्म्युलाच तपशिलात किरकोळ बदल करून अनेक चित्रपटांत मांडण्याचं त्याचं कसब भूषणावह खचितच नाही. निरनिराळ्या विषयांच्या खुंट्या फक्त घेऊन त्यावर त्याच त्या छापाची प्रेमकहाणी लटकावून देण्याचा त्याचा शिरस्ता अजूनही बदललेला दिसत नाही. त्यामुळेच 'मेरा नाम जोकर' ही विदूषकाच्या जीवनाची करुणरम्य शोकांतिका होत नाही तर कुणाही एखाद्या प्रेमवीराच्या तीन प्रेमकहाण्यांची उथळ आणि विस्कळित शोकांतिका ठरते– मग हा प्रेमवीर योगायोगाने विदूषक आहे एवढेच काय ते. ''बॉबी'नं 'बरसात'ची याद आणून दिली,' असं भलेभले गहिवरून सांगतात तेव्हा हसावं की रडावं ते कळत नाही ते यामुळंच. दिग्दर्शक म्हणून, कलाकार म्हणून राजकपूर सतत नवनवीन असं काहीच देऊ शकलेला नाही, हेच यातून सिद्ध होत नाही काय? हीच गोष्ट अभिनयाची. स्वतःला एका ठराविक प्रतिमेच्या चौकटीत जखडून घेतल्यानंतर राजकपूरनं आपले ठरीव हातवारे, मुद्रेवरला अपरंपार बावळटपणाचा–गरीबपणाचा सनातन भाव आणि किंचित बोबडी, लाडिक आणि बहुधा अतिरेकाकडे झुकणारी संवादफेक यामध्ये महत्त्वाचे व मूलभूत बदल करण्याची फिकीर कधी केल्याचे आठवत नाही. भूमिकेच्या मागणीनुसार अभिनय करण्याऐवजी त्यानं आपल्या अभिनयप्रतिभेला जुळतील, झेपतील अशा भूमिकाच बनवून घेतल्या! अभिनयाच्या बाजूनं पाहिलं तर त्याची गरीब, 'अनाडी,' भटक्या, बावळट इमेज ही मला खरं तर एखाद्या idiot किंवा mentally retarded इसमाचीच इमेज वाटत आली आहे! (पहा–जिस देश में गंगा बहती है.)

राजकपूरच्या चित्रपटांची इतर कुणाच्या चित्रपटांशी तुलना केली जाऊ नये, असं आवाहन त्याच्या समर्थक चाहत्यांकडून वारंवार करण्यात येतं आणि त्याला वरकरणी सयुक्तिक दिसणारी कारणंही दिली जातात. माझ्या मते ही आत्मवंचना आहे. राजकपूर, सत्यजित राय, व्ही. शांताराम, इंगमार बर्गमन यांच्या कुठल्याही एकेका चित्रपटाची तुलना एकमेकाशी केली जाऊ नये (उदाहरणार्थ पथेर पांचाली आणि बरसात, किंवा दो आँखे बारह हाथ आणि बॉबी), हा दावा बहुशः समर्थनीय वाटतो. कारण अशा तुलनेला पाया सापडणं कठीण होईल; पण दोन किंवा अधिक कलाकारांच्या मिळकतीचा तुलनात्मक जमाखर्च मांडणं अधिक सहज, अधिक तर्कशुद्ध आणि अधिक व्यावहारिक ठरतं. कारण अशा तुलनेला आधारभूत निकष उपलब्ध असतात. मुख्य म्हणजे ऐतिहासिक-दृष्टया अशी तुलना अपरिहार्यच नव्हे तर आवश्यकही असते. परस्पर तुलना हा दोन

कलाकारांची स्थानं निश्चित करायचा एकमेव मार्ग खासच नव्हे; पण अशा तुलनेचा मर्यादित प्रयत्नही न करता प्रत्येक कलाकाराचा वरीलप्रमाणं वेगळा विचार करायचा झाला तर कलासमीक्षा आणि कलेचा इतिहास या दोन प्रांतांत अराजक माजेल आणि म्हणून, खऱ्या अभ्यासकानं राजकपूर किंवा अन्य कुणाला तुलनेच्या शिक्षेपासून वाचवून 'आपल्यापरीनं मोठा' ठरवायचा उपद्व्याप न करता, तुलनेद्वारा त्या त्या कलेच्या सर्वांगीण विस्तारामधलं त्याचं स्थान ठरविण्याचा प्रयत्न करायला हवा, असं मला वाटतं.

अर्थात राजकपूरच्या चित्रपटकारकीर्दीवरचा माझा सगळ्यात मोठा आक्षेप याहून वेगळाच आहे. त्याची कर्तबगारी चार लोकप्रिय चित्रपट बनविण्यापुरतीच मर्यादित राहिली असती, तरी अशी हरकत घेण्याचा प्रसंग आला नसता. दुर्दैव असं की, पलायनवादी मनोरंजन देऊनच राजकपूर थांबला नाही, तर असं पलायनवादी मनोरंजन म्हणजेच चित्रपट असा घातकी गैरसमज खतपाणी घालून वाढविण्यासही त्यानं हातभार लावला. (हे दुर्दैवी समीकरण प्रचलित करण्याच्या पापाचा सर्व ठपका त्याच्या एकटयाच्याच शिरावर ठेवण्याचा माझा बिलकूल इरादा नाही. देव आनंद, एस्. मुकर्जी, चोप्रा ब्रदर्स, नडियादवाला हाउस इत्यादी निर्मातागण सोवळे नेसून संध्या करीत असताना राजकपूरनं मात्र चित्रपटसृष्टी नासविली असंही मला म्हणायचं नाही.) मात्र फार मोठ्या संख्येच्या भारतीय प्रेक्षकाची चित्रपटाकडे बघण्याची दृष्टीच संकुचित आणि दूषित करण्याचा जो उद्योग स्वातंत्र्योत्तर तीन दशकांत धीरे धीरे केला गेला, त्या 'स्लो पॉयझनिंगच्या' प्रक्रियेतला एक आघाडीचा भागीदार राजकपूर होता, ही गोष्ट त्याचा प्रभाव लक्षात घेता कुणीही नाकारू शकेलसं वाटत नाही. 'राजकपूर जाणीवपूर्वक, हेतुपुरस्सर, उघडपणेच धंदेवाईक चित्रपट काढतो, तेव्हा त्याबद्दल त्याला दोष देणं न्यायाचं नाही', असा दावा जे मांडतात, त्यांना इथं आणि हे उत्तर देता येतं की, राजकपूरला उजळमाथ्यानं धंदा करायचा हक्क नक्कीच आहे आणि तसा तो केल्याबद्दल त्याला कुणीच दोष देत नाही; पण त्याच्या धंदा करण्याच्या पद्धतीचा हा जो प्रत्यक्षाप्रत्यक्ष दुष्परिणाम झाला आहे, तो अमान्य कसा करता येईल? हिंदी चित्रपटसृष्टीचं आजचं भीषण बाजारी स्वरूप हे आकाशातून पडलेलं नाही, तर अलीकडच्या दोन दशकांत चालू असलेल्या कलेच्या घाऊक औद्योगीकरणाची ती एक उन्नत अवस्था आहे. या दुःखद प्रक्रियेतल्या अंशमात्र दोषभागित्वातून स्वतः राजकपूर तरी स्वतःला मुक्त करू शकेल काय? सगळ्या जगाची प्रगती वास्तववादी आणि अतिवास्तववादी कलेकडे, अस्तित्ववादी कलेकडे चालू होती तेव्हा आमचा प्रेक्षक मात्र कालबाह्य ठरलेल्या बेगडी रोमँटिसिझममध्ये, स्वप्नरंजनवादी कलादृष्टीमध्ये संतुष्ट राहायला शिकत होता. आयुष्यातल्या कायमच्या अंधाराला क्षणकाल विसरण्यासाठी चित्रपटगृहातल्या अंधारात तात्पुरती बुडी मारायला त्याला ज्यांनी ज्यांनी शिकविलं त्यांनी त्यांनी भारतीय कलेचंच नव्हे तर माणसाचंही, लवकर भरून न येणारं नुकसान केलं आहे, असं मला प्रामाणिकपणे वाटतं. ☐

# चॅप्लिन : क्लासिक चित्रे देणारा यशस्वी निर्माता
# राजकपूर : चालती चित्रे देणारा यशस्वी व्यापारी

**सदानंद बोरसे**

'राजकपूर म्हणजे भारतीय चित्रसृष्टीतील चार्ली चॅप्लिन', असे म्हणून चार्ली चॅप्लिनचा अपमान करण्याचा मोह बऱ्याच जणांना होतो. कारण चित्रपट-निर्मिती, दिग्दर्शन आणि अभिनय या तिन्ही क्षेत्रांत दोघांनीही कामगिरी केली. त्यातही 'श्री ४२०' मध्ये राजकपूरनं चार्ली चॅप्लिनचं सरळसरळ अनुकरण केलं आहे.

राजकपूर आणि चार्ली चॅप्लिन दोघांनीहि आपापल्या चित्रपटांचं दिग्दर्शन केलं. चॅप्लिनचा जमाना मूकपटांइतक्या जुन्या काळापासून सुरू होत असल्याने तांत्रिकदृष्टया त्याचे चित्रपट अत्यंत ओबडधोबड वाटतात. उदाहरणार्थ-'दि किड्'मध्ये प्रसंग बदलण्यासाठी वापरलेली एकच फेड इन्, फेड आउट्ची पद्धत. कित्येक प्रसंगांमध्ये तर जुन्या नाटकांमध्ये रंगविलेल्या पडद्यांप्रमाणे उभारलेले पडदे चक्क कळून येतात. थोडक्यात चॅप्लिनच्या चित्रपटांमध्ये सेट्स, मेकअप्, कपडे इत्यादी सगळ्यांवरच जुनेपणाची छाप आहे. या सर्व तांत्रिक बाबतीत राजकपूर काळाबरोबर पुढे आलेला. 'आवारा'-तील स्वप्नदृश्य असो वा 'जिस देश में गंगा...'मधील दरोडेखोरांच्या गुहा असोत, सगळे सेट्स अत्यंत काटेकोरपणे उभारलेले. कृष्ण-धवल रंगाच्या छटांचा सुरेख वापर करून आणि प्रकाशाची उत्तम संगती वापरून निरनिराळ्या रंगांचा आभास देणं, हेही त्याच्या तांत्रिक कौशल्यांपैकीच एक; पण या जमेच्या तांत्रिक बाजू मिळूनही राजकपूरचे चित्रपट चॅप्लिनच्या चित्रपटांच्या उंचीपर्यंत पोहोचू शकत नाहीत; कारण चित्रपटाच्या मुळापासूनच दोघांमध्ये अत्यंत फरक पडलेला. मूळ विषयाच्या निवडीपासूनच चॅप्लिनची उंची आणि राजकपूरचं खुरटेपण लक्षात येतं. डान्सिंग हॉलमधील कुत्र्यासारख्या भयाण जिण्यातून सुटण्यासाठी धडपडणाऱ्या तरुणीवरील 'ए डॉग्ज लाइफ', एका अनाथ पोराचे संगोपन करणारा ट्रॅम्प रंगविणारा 'द किड्', पैशाभोवती गरगरणारी दुनिया दाखविणारा 'गोल्ड रश्', यंत्रयुगात यंत्रामुळेच पिळवटला गेलेला माणूस चितारणारा 'मॉडर्न टाइम्स', हुकुमशाहीचा तीव्र उपरोध आणि विडंबन करणारा 'ग्रेट डिक्टेटर', एक विदूषक आणि त्याच्या अंध कन्येची शोकांतिका-'सिटी लाइट्स' असे कित्येक चित्रपट चॅप्लिनच्या विषयांच्या विविधतेची साक्ष देतील. या निकषावर राजकपूरच्या खात्यावर किती चित्रपट जमा होतील? आज देखील आर्. के. चं बॅनर 'बॉबी' वा 'सत्यं शिवं सुंदरम्'मधून आपल्याच जुन्या 'बरसात' वा 'आग'कडे वळतं. शिवाय ही जुनी चौकटही चार बाजूंनी बनलेली नाहीच. एकच एकेरी फॉर्म्युल्यात बंद केलेली ही आपल्या चित्रपटांची चौकटच राजकपूर आजही कलाकार बदलून वापरीत आहे.

आधी उल्लेखिलेल्या चॅप्लिनच्या चित्रपटां-

१ जुलै-बरसात अंकात प्रसिद्ध झालेली जब्बार पटेल यांची मुलाखत (पृष्ठ ९) सदानंद बोरसे यांनी घेतली होती. नजरचुकीने नाव टाकण्याचे राहून गेले. —संपादक.

पैकी काहींचे कालसंदर्भ पाहिले; तर चॅप्लिनची अत्यंत तीव्र सामाजिक जाणीवही प्रत्ययाला येते. उदाहृणार्थ–१९२५ मध्ये यंत्रयुगाचे हातपाय झपाट्याने माणसाच्या आयुष्यात पसरत असताना काढलेला मॉर्डन टाइम्स. हिटलरची हुकुमशाही भरात असतानाच त्याची रेवडी उडविणारा द ग्रेट डिक्टेटर आणि असे कालसंदर्भ असोत अथवा नसोत, माणसाच्या मनापर्यंत, त्यातील सनातन सत्य भावनांपर्यंत पोहचत असल्याने चॅप्लिनचे चित्रपट हे काळाचे बंधन तोडून टाकतात. राजकपूरच्या चित्रपटांमध्ये असलेल्या सामाजिक जाणिवेचा वापरसुद्धा व्यापारासाठी केलेला. त्यामुळे चित्रपटांत, जाहिरातीत समाजवादाचा उद्घोष करूनही प्रत्यक्षात भडक प्रसंगांधून पात्रांना वैयक्तिक सहानुभूती मिळवून देण्याकडेच त्याचा कल जास्त उदाहरणार्थ 'बूटपॉलिश' पाहिल्यानंतर प्रेक्षक कळवळतो तो बूटपॉलिशचा धंदा करणाऱ्या पोरांसाठी नाही, तर रतनकुमार आणि बेबी नाझसाठी. साहजिकच त्या दोघांचं शेवटी भलं होताच 'इतर बूटपॉलिशवाल्या पोरांचं काय ?' हा प्रश्नही त्याच्या मनाला शिवत नाही. 'जिस देश में...'मध्ये दरोडेखोरी, दरोडेखोरांचं परिवर्तन असल्या गोष्टींपेक्षा पद्मिनी, नाच, गाणी याच गोष्टी प्रेक्षकांबरोबर जातात. त्यामुळंच प्रचंड अतिशयोक्ती आणि प्रचंड कल्पनारम्यतेनं भरलेले चॅप्लिनचे चित्रपट कृत्रिम वा खोटे न वाटता प्रेक्षकाच्या मनात घर करून राहतात. त्यात मांडलेली समस्या वा उभं केलेलं व्यक्तिचित्र त्याला स्वतःशी अत्यंत जवळचं वाटू लागतं. याउलट राजकपूरच्या चित्रपटांमध्ये अवास्तव स्वप्नरंजनानं प्रेक्षकाला सुखविण्याचाच प्रयत्न केलेला. म्हणूनच चॅप्लिनचे चित्रपट–Films with a smile and perhaps a tear, असे. हसून–हसून पुरेवाट होताना नकळतच उभा राहिलेला अश्रू प्रेक्षक निपटून टाकतो. उदाहरणार्थ 'गोल्ड रश 'मध्ये प्रचंड भूक लागल्यानंतर खायला न मिळाल्यानं चार्ली आपला एक बूटच कोंबडीसारखा खाऊ लागतो. हा प्रसंग पाहताना प्रेक्षकाची हसून हसून मुरकुंडी वळते; पण त्याच वेळी आतडे जाळणारी ती भूक आणि आयुष्य विझविणारं ते दारिद्र्य प्रेक्षकाचं काळीज कुठे तरी कुरतडत राहतं. राजकपूरनं मात्र हे हसविण्याचे प्रसंग आणि हे रडविण्याचे प्रसंग अशी स्पष्ट विभागणी केलेली. ते प्रसंगही अगदी स्मितस्फोटक, हास्यउद्रेकक किंवा दिलद्रावक, हृदयपिळवटक असे भडक रंगविलेले. दोघांच्या हसविण्याच्या तऱ्हाही किती निरनिराळ्या आहेत ! चॅप्लिनचा बहुतेक विनोद हा आयुष्यातील विसंगतीतून जन्माला आलेला, घटनांना प्राधान्य असलेला, प्रसंगनिष्ठ, त्यामुळेच नेहमी ताजा वाटणारा विनोद. बोल्ट पक्के करण्याचं काम सोपवल्यानंतर मशीनच्या बोल्टबरोबर त्यासारखीच दिसणारी बायकांच्या कपड्यांची बटणं पक्की करायला धावणारा 'मॉडर्न टाइम्स'मधील वाधील कामगार जितका नवा व खळखळून हसविणारा तितकाच 'डिक्टेटर'मधील आपल्या दोन छोट्या हातांनी सारं जग कवेत घेण्याची केविलवाणी धडपड करणारा हुकूमशहा नवीन आणि खदखदविणारा. शिवाय बहुतेक विनोद हा प्रेक्षकाला विचार करायला लावणारा वा एखादा विचार देणारा. याउलट राजकपूरच्या 'राजू'चा सगळा विनोद हा त्याच्या बावळटपणावर आधारित; त्यामुळेच 'श्री ४२०' मधील नाविन्य संपताच 'आवारा' पासून 'जोकर'पर्यंत सगळीकडे तसाच आणि तितकाच बावळट त्यामुळे तितकाच शिळा वाटणारा. त्यातही एक मोठा फरक म्हणजे राजकपूरने या बावळटपणातही चेहऱ्याची सुंदर घडी कायम राहील, ही काळजी कायम घेतली आणि बावळटपणात स्मार्टनेसची झलकही बऱ्याचदा दाखविली. विशेषतः खलनायकाचं कारस्थान उलटविताना हा राजू एकदम स्मार्ट बनतो. याउलट चॅप्लिनचा ट्रॅंप फक्त पोषाखातच गबाळा. वागण्यात तो अतिशय चलाख, चपळ; पण धूर्त वा कावेबाज मात्र नाही. त्यामुळेच त्याची चलाखी कधीकधी अंगलट यायची. हा ट्रॅंप सामान्य माणूस असल्याने वाईट दिसण्याइतके चेहरे वेडेवाकडे करण्यासही तो कधीच लाजत नाही.

'संगीत' या प्रकाराची उत्तम जाण राजकपूर आणि चार्ली चॅप्लिन दोघांनाही असावी. फरक इतकाच की, चॅप्लिनच्या चित्रपटात चित्रपटाचा विषय-आशय हाच चित्रपटाचा प्राण असे. संगीताची कामगिरी पोषक रसाची असे राजकपूरने मात्र आपल्या कित्येक चित्रपटांमध्ये संगीतच चित्रपटाचा प्राण बनविले आणि त्या जोरावर चित्रपट तारून नेले. बरसात, आह, संगम या चित्रपटांमध्ये जर गाणी नसती तर? खुद्द राजकपूरलासुद्धा ही कल्पना असह्य होईल !

चार्ली चॅप्लिनने आपल्या चित्रपटांमध्ये सरळसरळ एक ट्रॅंप ( भटक्या / आवारा ) उभा केल्यामुळे आणि राजकपूरने आपल्या चित्रपटांची एक ठराविक चौकट बनवून टाकल्यामुळे दोघांच्याही अभिनयाला विलक्षण मर्यादा पडल्या होत्या; पण चॅप्लिनचा आवारा हा सगळ्या चित्रपटांमध्ये इतक्या निरनिराळ्या आणि विलक्षण विषयांमधून आणि प्रसंगांमधून प्रवास करतो की, त्याच्या व्यक्तिमत्त्वाला आपोआप अनेक पैलू मिळत जातात. म्हणजे एक सगळीकडे असलेला सारखा पोषाख ( खरे म्हणजे तोसुद्धा सगळ्या प्रसंगांमध्ये सारखा नसतो. ) सोडल्यास हा ट्रॅंप सगळ्या मर्यादा मोडून टाकतो. 'द किड्'मध्ये तो पोरासाठी पोलिस आणि अनाथालयाच्या मग्रूर चालकाशी लढणारा हिकमती बाप असतो; तर 'सिटी लाइट्स'मध्ये धंदेवाईक बॉक्सरशी सामना खेळण्यास तयार झालेला अगतिक, असहाय्य बाप असतो. 'शोल्डर आर्म'मधील सैनिक, 'ट्वेंटी मिनिट्स ऑफ् लव्ह'मधील इरसाल प्रियकर, 'द अॅडव्हेंचर'मधील पुन्हा पुन्हा पकडला जाण्यासाठी पुन्हा पुन्हा जेलमधून पळणारा कैदी, 'डिक्टेटर' अशा किती वेगवेगळ्या भूमिका सांगायच्या ! याउलट राजकपूरनं आपली चित्रपटाची चौकट कधीच न मोडल्यानं वेगळा विषय नाही, वेगळे प्रसंग नाहीत आणि वेगळा 'राजू' तर नाहीच नाही.

थोडक्यात एक कलात्मक उंचीचा मामुली फरक सोडला तर चॅप्लिनलाही 'विदेशी राजकपूर' म्हणायला हरकत नव्हती.

आता हा मामुली फरक आला तो चित्रपटाकडे पाहण्याच्या दोघांच्या दृष्टीमुळे. चार्ली लहानपणापासून अत्यंत कलंदर आयुष्य जगला. हाडापर्यंत पोहोचणारी गरिबी त्यानं अनुभवली. स्वतःसारखे दररोजचे मरण पोरांच्या वाट्याला येऊ नये म्हणून आपल्या पोटच्या गोळ्यांना हाकलून देणारी आई त्याच्या वाट्याला आली आणि हे सगळं वास्तव एखादं भयाण स्वप्न वाटावं असं राजेशाही ऐश्वर्यही त्यानं उपभोगलं. हे सगळं आयुष्य चार्ली चवीनं जगला आणि सिनेमांमधून याच आयुष्यापुढं त्यानं आरसा धरला. चॅप्लिनच्या बहुतेक चित्रपटांची संहिता त्यानं स्वतःच तयार केलेली असे. त्या सर्व चित्रपटांमध्ये अनुभवांच्या मुशीतून ओतलेले चॅप्लिन–तत्त्वज्ञान आहे. त्याने प्रेक्षकांसाठी चित्रपट बनविले नाहीत तर प्रेक्षकांनी त्यानं बनविलेल्या चित्रपटांना डोक्यावर घेतलं. याउलट राजकपूरनं चालतील, प्रेक्षकांना रुचतील असेच चित्रपट दिले. जीवनतत्त्वज्ञान असे कडू काढे प्रेक्षकाला पाजण्याऐवजी नाच, गाणी, स्वप्नरंजन अशी मधाची बोटं त्याला चाटविण्याकडेच त्याचा कटाक्ष राहिला. म्हणूनच चॅप्लिन हा क्लासिक चित्रपट देणारा यशस्वी चित्रनिर्माता ठरला तर राजकपूर चालणारी चित्रं देणारा यशस्वी व्यापारी ठरला. □